वार्षिक अहवाल

२०१४– २०१५

महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी – ४१३ ७२२, जिल्हा – अहमदनगर (महाराष्ट्र)
www.mpkv.ac.in

संपादक : **डॉ. किरण कोकाटे**
संचालक, विस्तार शिक्षण,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी - ४१३ ७२२, जिल्हा - अहमदनगर (महाराष्ट्र)

संपादकीय मंडळ :
डॉ. प्रकाश तुरबतमठ
डॉ. गोरक्ष ससाणे
डॉ. संदिप पाटील
डॉ. सचिन सदाफळ
डॉ. किरण थोरात
श्री. संग्राम काळे

प्रकाशक : **श्री. सुनील वानखेडे**
कुलसचिव,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी - ४१३ ७२२, जिल्हा - अहमदनगर (महाराष्ट्र)

मफुकृवि /विप्र/ क्र. १०६४/२०१५



डॉ. तुकाराम मोरे
कुलगुरु
महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी – ४१३ ७२२, जिल्हा – अहमदनगर (महाराष्ट्र)

प्रस्तावना

महात्मा फुले कृषि विद्यापीठाने सन २०१४-१५ मध्ये केलेल्या शिक्षण, संशोधन अणि विस्तार शिक्षणाचा समग्र अहवाल मी या ठिकाणी मांडत आहे. विद्यापीठातील अधिकारी, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या एकत्रित प्रयत्नांचेच हे फळ आहे. या वर्षात विविध अडचणींवर मात करत विद्यापीठाने नवनवीन शैक्षणिक कार्यक्रम व नवीन योजना, नवीन बांधकामे व सुधारणांबरोबरच अनेक प्रशासकीय निर्णय घेतले .

महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांनी वेळोवेळी केलेल्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. विद्यापीठाचे सन्माननीय प्रतिकुलपती तथा कृषिमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे वारंवार मिळणारे प्रोत्साहन व सहाय्य याबाबतही मी त्यांचा शतशः आभारी आहे. तसेच महासंचालक, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सन्माननीय सदस्य, विद्यापरिषदचे सदस्य आणि विद्यापीठाच्या इतर वैधानिक संस्थांचे सदस्य यांनी वेळोवेळी केलेल्या अनमोल सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो.

सन २०१४-१५ या वर्षात एकुण ८१७८ विद्यार्थ्यांनी पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी संपादन केले. शिवाय १३ विद्यार्थ्यांनी कनिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती व ३ विद्यार्थ्यांनी वरिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती मिळवली आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये व खाजगी सेवेत अनेक विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. काही विद्यार्थ्यांनी स्वंयरोजगाराची निर्मिती केली आहे.

विद्यापीठाच्या संशोधन कार्यामध्ये यावर्षी विविध विभाग, संशोधन प्रकल्प, योजना यांचे मार्फत एकुण ११ नवीन वाण, ३ नवीन अवजारे तसेच ६४ तांत्रिक शिफारशी शेतकरी बांधवांसाठी प्रसारित केल्या आहेत. त्याचबरोबर एकुण १०७५५ क्विंटल बियाण्यांचे उत्पादन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या विस्तार कार्यामध्ये एकुण २१० प्रशिक्षण कार्यक्रम, १३९ कार्यशाळा व चर्चासत्रे, शेतकरी, तरूण, महिला शेतकरी व कर्मचारी यांचेसाठी विविध प्रकाशने त्यामध्ये कृषिदर्शनी (३०,००० प्रती), श्रीसुगी (७,६९० प्रती) तसेच विविध प्रकारच्या घडीपत्रिका व पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ शेतकऱ्यांसाठी एक विश्वसनीय स्त्रोत असल्याने विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रावर हजारो शेतकऱ्यांनी भेटी दिल्या, भेटी दरम्यान शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विद्यापीठातील अधिकारी, शास्त्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांकडुन नियमीतपणे मार्गदर्शन दिले गेले.

विद्यापिठाचा हा अहवाल सर्व शेतकरी आणि ग्रामीण समाजासाठी समर्पित आहे.

(तुकाराम मोरे)

अनुक्रमणिका

अ. क्र		तपशील	पृष्ठ क्र.
१.		विद्यापीठ उपलब्धी	१
	१.१	शिक्षण	१
	१.२	संशोधन	४
	१.३	विस्तार शिक्षण	४
२.		शिक्षण	५
३.		संशोधन	१७
४.		विस्तार शिक्षण	३१
५.		प्रमुख घडामोडी	३७
६.		पारितोषिके / पुरस्कार / नियुक्ती	६०
७.		मनुष्यबळ	६२
	७.१	कार्यकारी अधिकारी	६२
	७.२	कार्यकारी परिषद सदस्य	६२
	७.३	विद्या परिषद सदस्य	६४
	७.४	विद्याविषयक अधिकारी	६६
	७.५	विभाग प्रमुख व पीक विशेषज्ञ	६६
	७.६	इतर अधिकारी	६७
	७.७	विद्यापीठ मनुष्यबळ	६८
८.		पायाभुत सुविधा निर्मिती	७६
९.		विद्यापीठाचे आर्थिक समालोचन	७८

१. विद्यापीठ उपलब्धी

महात्मा फुले कृषि विद्यापीठाची स्थापना २० ऑक्टोबर १९६८ मध्ये झालेली असुन राज्य तसेच देशाकरीता कृषि क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने निर्माण करण्याचे हे एक प्रमुख केंद्र आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या कार्यक्षेत्रामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापुर, नाशिक, धुळे, सांगली, सातारा, सोलापुर, पुणे, अहमदनगर, जळगाव व नंदुरबार या दहा जिल्ह्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील नऊ कृषि हवामान विभागापैकी चार कृषि हवामान विभाग विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतात. महाराष्ट्र राज्याच्या एकुण जमीन क्षेत्रापैकी ३७.५ टक्के जमीन क्षेत्र विद्यापीठाच्या अखत्यारितील दहा जिल्ह्यांमध्ये (११६.१२ लाख हेक्टर) आहे. यापैकी ७२.४५ लाख हेक्टर जमीन लागवडी योग्य असुन बागायती क्षेत्र १३.१७ लाख हेक्टर (८० टक्के) आहे.

कृषि शिक्षण, कृषि संशोधन व विस्तार शिक्षण या तिनही क्षेत्रातील अहवाल वर्षातील ठळक वैशिष्ट्ये.

१.१ शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठ कृषि पदविकेपासून पदव्युत्तर अभ्यासक्रम घटक व विना अनुदानित तंत्र विद्यालये व महाविद्यालयातून देत असून दरवर्षी साधारणपणे ६००० प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण केले जाते. हे मनुष्यबळ सरकारी ,निमसरकारी व खाजगी संस्था तसेच कृषि निगडीत व्यवसाय व शेतीमध्ये समाविष्ट होत असते. शिक्षण क्षेत्रातील प्रमुख उपलब्धी पुढील प्रमाणे-

१. महात्मा फुले कृषि विद्यापीठ सात घटक महाविद्यालयातून पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण विद्यार्थ्यांना देते. यामध्ये कृषि महाविद्यालय पुणे, धुळे, कोल्हापूर, नंदुरबार व कराड येथे असून डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी येथे तर उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे येथे आहेत. या सर्व घटक महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ७२४ विद्यार्थ्यांची आहे.

२. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रात ६१ विनाअनुदानीत महाविद्यालयांना मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये, बी.एस्सी. (कृषि) २६, बी.एस्सी, (उद्यान) ०४, बी. एस्सी. (अन्नशास्त्र व तंत्रज्ञान) ०८, कृषि व्यवसाय व्यवस्थापन ०८, कृषि जैवतंत्रज्ञान ०६, बी. टेक (कृषि अभियांत्रिकी) ०८ व पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र ०१ या महाविद्यालयांचा समावेश आहे.

३. विनाअनुदानीत महाविद्यालयात बी.एस्सी. (कृषि) पदवी अभ्यासक्रमासाठी २३४०, बी.एस्सी. (उद्यानविद्या) २००, बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी) ४४०, कृषि जैवतंत्रज्ञान ३६०, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान ४४०, कृषि व्यवसाय व्यवस्थापन ४००, व पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र ३० असे एकुण ४२१० विद्यार्थ्यांना प्रथम वर्षात प्रवेश देण्यात आलेला आहे.

४. पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी येथे आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी ८१ व एम.एस्सी. (कृषि) अभ्यासक्रमासाठी १८८, उद्यानविद्या ७०, ८ कृषि जैवतंत्रज्ञान, ३० एम.एस्सी. कृषि व्यवसाय व्यवस्थापन, ६ बी.एस्सी. कृषि व्यवसाय व्यवस्थापन, १६ कृषि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.

५. या महाविद्यालयात इतर राज्यातील १४ विद्यार्थी व परदेशातील २ विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतलेला होता.

६. पदव्युत्तर महविद्यालयात सन २०१४-१५ मध्ये विद्यार्थ्यांना कनिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती १३ व ३ विद्यार्थ्यांना वरिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

७. डॉ. सचिन परब, वैद्यकिय संशोधक यांचे स्पर्धा परिक्षांकरिता वेळ व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

८. डॉ. सचिन परब, वैद्यकिय संशोधक यांचे ताण निवारण व कृतीशील विचार या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

९. मा. श्री. विजय चोरमारे, निवासी संपादक, महाराष्ट्र टाईम्स, कोल्हापूर यांचे बदलती राजकीय परिस्थिती : महाराष्ट्र व भारत या विषयावर नानासाहेब पवार सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले.

१०. मा. श्री. सुरेश खानापूरकर, प्रकल्प संचालक, जलसंधारण, शिरपूर, जि. धुळे यांचे महाराष्ट्राचा दुष्काळ आणि शिरपूर पॅटर्न : एक प्रयोग या विषयावर नानासाहेब पवार सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले.

११. मा. श्री. अभय टिळक, संचालक, भारतीय अर्थ विज्ञान वर्धिनी, पुणे यांचे आजचे अर्थमित्र आणि उद्याची आव्हाने या विषयावर नानासाहेब पवार सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले.

१२. मा. श्री. इंद्रजीत देशमुख, उपायुक्त विकास पुणे यांचे राष्ट्रीय प्रश्नांतील युवकांची बांधिलकी या विषयावर नानासाहेब पवार सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले.

१३. डॉ. एस. सी. कोतूर प्रमुख, शास्त्रज्ञ, इंडीयन इन्स्टीट्युट ऑफ हॉर्टिकल्चर रिसर्च, बेंगलोर यांचे नॅशनल मॅनेजमेंट ऑफ बनाना या विषयावर मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग, पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी यांनी व्याख्यान आयोजित केले.

१४. डॉ. बी. आर. विश्वास प्रमुख शास्त्रज्ञ, मृदशास्त्र व कृषि रसायन विभाग भारतीय कृषि अनुसंस्थान परिषद, नवी दिल्ली यांचे कम्पोस्ट खताची संपन्नावस्था वाढविण्यासाठी पौष्टीक अन्नाचा पुरवठा या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

१५. विद्यापीठात आयोजित ३० व्या पदवीदान समारंभामध्ये एकूण ५१२५ विद्यार्थ्यांना विविध पदवी प्रदान करण्यात आलेली आहे. ३० व्या पदवीदान समारंभमध्ये विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे सुवर्णपदक वितरीत करण्यात आले आहेत.

अ. क्र.	पारितोषिकाचे नाव व विभाग	विद्यार्थ्यांचे नाव
१	प्राचार्य व्ही.जी. गोखले सुवर्णपदक कृषि विद्या विभागात प्रथम	कु. पाटील प्रियंका चंद्रकांत
२	हेझामर फॉऊंडेशन सुवर्णपदक वनस्पती रोगशास्त्र विभागात प्रथम	कु. टेकाळे मुक्ताबाई विश्वनाथ
३	कै. राजाराम ग.पाटील, नाशिक सुवर्णपदक बीयाणेशास्त्र व तंत्रज्ञान विभागात प्रथम	श्री. जगताप संदीप जनार्दन
४	जिंदाल जुबली सुवर्णपदक मृदशास्त्र व कृषि रसायन विभागात प्रथम	श्री. गायकवाड अभय अर्जुन
५	कृषिभूषण हिरालाल ओंकार पाटील सुवर्णपदक कृषि वनस्पती रोगशास्त्र विभागात प्रथम	श्री. पवळ सखाराम निवृत्ती
६	बी.एस.एस सुरेश अगरवाल सुवर्णपदक भाजीपालाशास्त्र विभागात प्रथम	कु. शिंदे अंजनी मधुकर
७	बिग्रेडर अनिल अडलाखा सुवर्णपदक कोषाणुवंशकीय व रोप पैदासशास्त्र	श्री. भोसले अमित अशोक
८	कै. वत्सला भास्कर पवार सुवर्णपदक कोषाणुवंशकीय व रोप पैदासशास्त्र	श्री. भोसले अमित अशोक
९	सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सुवर्णपदक दुग्धशास्त्र विभागात प्रथम	श्री. व्हील्हेकर चंद्रशेखर प्रभाकर
१०	कै. माधवराव बळवंत पवार सुवर्णपदक पशुविज्ञान विभागात प्रथम	श्री. अरगडे सागर भागवत

१६. कृषि महाविद्यालय, पुणे येथे विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी श्री. श्रीकर परदेशी, आय.ए.एस., पुणे तसेच अर्चना भोर यांचे Success in your hands या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

१७. युके येथील कृषि आणि व्यापार क्षेत्रातील आठ अधिकाऱ्यांच्या समूहाने कृषि महाविद्यालय, पुणे येथील विविध विभागांना भेटी दिल्या.

१८. जर्मनी येथील कृषी क्षेत्रातील २५ अधिकाऱ्यांच्या समूहाने कृषि महाविद्यालय, पुणे येथील विविध विभागांना भेटी दिल्या.

१९. कृषि महाविद्यालय, पुणे येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि राष्ट्रीय कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था (MANAGE), हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या प्रशिक्षणामध्ये ४० अधिकारी सहभागी झाले होते.

२०. कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथील श्री. आबासाहेब देशमुख यांना State Level NSS Best Volunteer या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

२१. कृषि संशोधनातील संधी या विषयावर कृषि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. योगेश थोरात, शास्त्रज्ञ कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी डॉ. जी. जी. खोत, सहयोगी अधिष्ठाता, अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात श्री. संदिप कदम यांनी कृषि व्यवसायातील संधी या विषयावर व्याख्यान दिले.

२२ कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे दोन दिवसीय व्यक्तीमत्व विकास, कार्यशाळेचे आयोजन डॉ. जी. जी. खोत यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. ५०० विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेतला होता.

२३. कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथील २९ विद्यार्थी जे. आर. एफ. परिक्षेत यशस्वी झाले तर ३ पदव्युत्तर विद्यार्थींनी एस. आर. एफ. परिक्षेत यशस्वी झाल्या.

२४. सत्र २०१४-१५ वर्षात कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथील ३ विद्यार्थी नायब तहसिलदार, ७ विद्यार्थी पोलिस उपनिरीक्षक, ५ विद्यार्थी संजय नर्सरी लि. पुणे, ११ विद्यार्थी DU-Pont Crop Production, LTD, Pune व २१ विद्यार्थी एस. आर. एफ. व २१ विद्यार्थी बँकसेवा परिक्षेत असे एकूण ६७ विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

२५. डॉ. अन्वर अलम यांच्या नेतृत्वाखालील पीर रिव्ह्यु टीमने कोल्हापूर कृषि महाविद्यालयात भेट देऊन विविध उपक्रम, प्रशासन, शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याची पाहणी केली.

२६. पीर रिव्ह्यु टीमने कृषि महाविद्यालय, धुळे येथे भेट देऊन महाविद्यालयातील विविध उपक्रम, प्रशासन, शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याची पाहणी केली.

२७. डॉ. के. डी. कोकाटे, संचालक विस्तार शिक्षण, डॉ. आर. एस. पाटील, संचालक संशोधन, म. फु. कृ. वि., राहुरी व डॉ. जे. व्ही. पाटील, संचालक, केंद्रिय ज्वारी सुधार प्रकल्प, हैद्राबाद यांनी कृषि विज्ञान केंद्र व कृषि महाविद्यालय, धुळे येथे भेट दिली.

२८. पदव्युत्तर महाविद्यालय तसेच डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे/धुळे/कोल्हापूर/कराड/नंदूरबार येथे स्वच्छ भारत अभियान राबविले. याप्रसंगी विद्यार्थी फेरी काढण्यात आली. विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात येऊन वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा इ. चे आयोजन करण्यात आले.

२९. कृषि क्षेत्रात शिक्षणासाठी प्रवेश घेण्याविषयीचे महत्व पटवून देण्यासाठी बारावी पास विद्यार्थी व पालकांसाठी कृषि शिक्षण दिन पदव्युत्तर महाविद्यालय तसेच डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे/धुळे/कोल्हापूर/कराड/नंदूरबार यांनी आयोजीत केला.

३०. कृषि महाविद्यालय, कराड येथे योगाचे महत्व या विषयावर योगाच्या प्रात्यक्षिकासह योग तज्ञ यांचे व्याख्यान आयोजीत केले.

३१. कृषि महाविद्यालय, कराड यांनी विद्यार्थ्यांसाठी १० दिवसांची महाराष्ट्र शैक्षणिक सहल आयोजीत करुन महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठास भेटी दिल्या.

३२. मा. श्री. तुषार पवार, कार्यकारी परिषद सदस्य, मा. डॉ. टी. ए. मोरे, कुलगुरु, डॉ. बी. आर. उल्मेक, अधिष्ठाता (कृषि), मफुकृवि, राहुरी यांनी कृषि महाविद्यालय, कराड येथे भेट देऊन शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला.

३३. कृषि महाविद्यालय, नंदूरबार येथे राष्ट्रीय मलेरिया अभियान राबविण्यात आले.

३४. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले संघ खालील प्रमाणे

अ. क्र.	खेळ प्रकार	दिनांक	आयोजक विद्यापीठ
०१	बुध्दीबळ	२७ ते ३० ऑक्टोबर २०१४	गुजरात स्पोर्ट विश्वविद्यालय, गांधीनगर
०२	क्रिकेट (पुरुष)	२२ नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर २०१४	बराकतुल्ला विश्वविद्यालय, भोपाळ
०३	बॅडमिंटन (मुले)	०६ ते ०९ नोव्हेंबर २०१४	राजीव गांधी प्राद्योगिक विश्वविद्यालय, भोपाळ
०४	मल्लखांब	१५ ते १९ डिसेंबर २०१४	लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फिजीकल एज्युकेशन, ग्वाल्हेर
०५	फुटबॉल	२२ ते २७ डिसेंबर २०१४	लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फिजीकल एज्युकेशन, ग्वाल्हेर
०६	शरीर सौष्ठव व वजन उचलने स्पर्धा	०६ ते ०९ जानेवारी २०१५	पंजाब टेक्निकल विश्वविद्यालय, जालंदर पंजाब

३५. ११ वी आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य - २०१४ सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा (युवक महोत्सव)

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा संघ इंद्रधनुष्य सामाजिक सांस्कृतिक स्पर्धेसाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दिनांक ५ ते ९ नोव्हेंबर २०१४ रोजी सहभागी होण्यासाठी पाठविण्यात आला. सदर स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थी विद्यार्थींनींनी वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमात चांगल्या प्रकारे सहभाग नोंदवुन विद्यापीठाचे नाव लौकीकात भर टाकण्याचा प्रयत्न केला. श्री प्रेमराज चव्हाण या विद्यार्थ्याने वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

३६. १८ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव (अश्वमेध) २०१४-१५

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे दिनांक २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१४ या कालावधीत १८ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या खालील संघानी या स्पर्धेत सहभाग घेतला.

१) खोखो (मुले) २) खोखो (मुली) ३) व्हॉली बॉल (मुले) ४) व्हॉलीबॉल (मुली) ५) कब्बड्डी (मुले) ६) कब्बड्डी (मुली) ७) बास्केट बॉल (मुले) ८) बास्केट बॉल (मुली) ९) मैदानी स्पर्धा (मुले) १०) मैदानी स्पर्धा (मुली) ११) तलवारबाजी (मुले) १२ तलवारबाजी (मुली) या सर्व खेळाडूंनी या स्पर्धेत अतिशय चांगली कामगीरी केली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या तलवारबाजी मुलींच्या संघातील कु. अस्मिता अशोक दुधारे आणि कु. ऐश्वर्या रमेश पोटे या विद्यार्थीनीने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले त्याचप्रमाणे मुलींच्या संघाने सांघिक तृतीय क्रमांकाचे पारितोषिक संपादन केले.

कृषि तंत्र विद्यालय

खो - खो मुले

विजेता क्रमांक	विजेता संघाचे नांव
विजयी	सोलापूर जिल्हा
उपविजयी	कोल्हापूर जिल्हा

खो - खो मुली

विजेता क्रमांक	विजेता संघाचे नांव
विजयी	पुणे जिल्हा
उपविजयी	सोलापूर जिल्हा

व्हॉलीबॉल मुले

विजेता क्रमांक	विजेता संघाचे नांव
विजयी	अहमदनगर जिल्हा
उपविजयी	कोल्हापूर जिल्हा

व्हॉलीबॉल मुली

विजेता क्रमांक	विजेता संघाचे नांव
विजयी	सोलापूर जिल्हा
उपविजयी	पुणे जिल्हा

१.२ संशोधन

१. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने अहवाल वर्षात विविध पिकांचे अकरा सुधारित वाण प्रसारित केले. प्रसारित वाण रब्बी ज्वारी- फुले रोहिणी, रब्बी ज्वारी- फुले मधुरा, खरीप ज्वारी- फुले वसुंधरा, बाजरी- आदिशक्ती, वरई- फुले एकादशी, चवळी- फुले विठाई, हुलगा- फुले सकस, सूर्यफूल- फुले भास्कर, डाळिंब- फुले अनारदाणा, अंजिर- फुले राजेवाडी, लेट्युस- फुले पद्मा.

२. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने अहवाल वर्षात तीन कृषि यंत्रे, औजारे प्रसारण व नोंदणी केलेली आहे. यात विद्युत चलित फुले कडबा कुट्टी यंत्र, फुले पीव्हीसी भात लावणी चौकट, ट्रॅक्टर चलित ऊस बांधणी यंत्र, पीक उत्पादनामध्ये पीक पद्धती, खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, पीक पद्धती, पीक संरक्षण या बाबींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. याबाबत विद्यापीठाने ६४ शिफारशी अहवाल वर्षात शेतकरी बांधवांसाठी प्रसारित केल्या आहेत.

३. शेतकऱ्यांना सुधारित बियाणाचा सुरळीत पुरवठा होण्याकरिता विद्यापीठात मोठ्या प्रमाणावर बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला. अहवाल वर्षात २७७६.०१ क्विंटल मूलभूत, २६७१.०१ क्विंटल पायाभूत व ५३०७.९९ क्विंटल सत्यप्रत बियाण्याचे उत्पादन करण्यात आले.

४. शुद्ध बियाणे हे प्रति हेक्टरी उत्पादन वाढीकरिता अत्यंत महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन अहवाल वर्षात विविध पिकांचे एकूण १०९४१.८४ क्विंटल बियाण्याचे वितरण करण्यात आले.

५. फळबागांची महाराष्ट्रात जास्त प्रमाणात लागवड होत आहे. याकरिता विद्यापीठातर्फे एकूण १२२९००८ फळझाडे, ३५२०० शोभिवंत झाडे यांची रोपे व कलमे, १८६.८३ क्विंटल भाजीपाला बियाणे पुरविण्यात आले.

६. विद्यापीठातील विविध प्रकल्पांमध्ये ७७०.४७ क्विंटल व ३५१०.५० लिटर जैविक खते, जैविक कीडनाशके व मित्र किडी उत्पादन घेण्यात आले.

१.३ विस्तार शिक्षण

कृषि विद्यापीठाकडे विस्तार शिक्षण कार्यक्रमाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. विस्तार कार्यक्रम सरकारी संस्था, बिगर शासकीय संस्था, सहकारी स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था इत्यादीच्या मदतीने राबविण्यात येतात.

१. विद्यापीठांतर्गत असलेली कृषि महाविद्यालये आणि संशोधन केंद्रे येथे २१० प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

२. अहवाल वर्षात १०८ जिल्हा मासिक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले व त्याचा १९५६ लाभार्थींना फायदा झाला.

३. अहवाल वर्षात ५४२ कृती प्रात्यक्षिक, ४२५ परिणाम प्रात्यक्षिक व शेतकऱ्यांच्या शेतावर १५७५ चाचण्या घेण्यात आलेल्या होत्या. याचा लाभ ५१६० शेतकऱ्यांना झाला.

४. विस्तार शिक्षणाचे ६२४८ कार्यक्रमामध्ये उदा. गटचर्चा, शिवारफेरी, शेतीदिन, शेत आणि घरांना भेटी, शेतकरी मेळावे, शेतीविषयक प्रदर्शन, शेतकऱ्यांची अभ्यास सहल, निदान चमुच्या भेटी, विद्यापीठ शास्त्रज्ञांचे विस्तार शिक्षण कार्यक्रमातून मार्गदर्शनाचा लाभ शेतकऱ्यांना, शेती खात्यातील कर्मचाऱ्यांना, बिगर सरकारी संस्थांना व कर्मचाऱ्यांना झालेला आहे.

५. विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या निदान चमूने १४७ ठिकाणी शेतातत शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन मार्गदर्शन केले.

६. विद्यापीठामार्फत कृषिदर्शनीच्या ३०००० प्रति, श्रीसुगीच्या ७६९० प्रति, घडीपत्रिका १५००० प्रति व शेतीविषयावरील वेगवेगळी पुस्तके, मफुकृवि वार्तापत्र, शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

७. अहवाल वर्षात ५०३६८ प्रतिष्ठित, विद्यार्थी, शेतकरी, अधिकारी यांनी विद्यापीठास भेट दिली तर ७७१४ शेतकऱ्यांनी कृषि संशोधन केंद्र व कृषि महाविद्यालयास भेटी देऊन अहवाल वर्षात शेतीविषयक माहिती मिळवली.

८. एकूण ४१८९३ शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण हेल्पलाईन दूरध्वनीमार्फत करण्यात आले.

९. फिरते पीक चिकित्सालयाद्वारे शेतकऱ्यांच्या शेतावर १२५४ मातीचे नमुने, ३२५ रोगांचे तर ७५३ किडींचे नमुने तपासून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

२. शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठात कृषि संलग्न शिक्षण देण्याकरीता कृषि शाखा व कृषि अभियांत्रिकी अशा दोन प्रमुख शाखा आहेत.

२.१. कृषि शाखा

कृषि शाखेत विविध विषयांबद्दल ज्ञानदान करण्यात येते. यात प्रामुख्याने कृषिविद्या, उद्यानविद्या, कृषि जैवतंत्रज्ञान, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान, कृषि व्यवस्थापन या शाखांचा पदवी अभ्यासक्रम राबविला जातो. कृषि शाखेत बारा विभाग असून त्यांच्यामार्फत पदवी, पदव्युत्तर व आचार्य अभ्यासक्रम राबविले जातात. कृषि शाखेच्या अंतर्गत खालील पदवी अभ्यासक्रम आहेत.

२.१.१ बी. एस्सी.(कृषि)

शाश्वत कृषि विकासासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे तसेच शेतकऱ्यांच्या तांत्रिक व आर्थिक सबळीकरणासाठी कृषि शिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. बी. एस्सी.(कृषि)चार वर्षाचा अभ्यासक्रम आठ सत्रात शिकविला जातो. सदर पदवी अभ्यासक्रमामध्ये १६० क्रेडिट आहे. एकूण १६० क्रेडिट पैकी १२३ क्रेडिट पहिल्या ६ सत्रात पुर्ण होतात. सातव्या सत्रात विद्यार्थ्यांना २० क्रेडिट, ग्रामीण कृषि कार्यानुभवाकरीता राखीव आहेत. या सत्रात विद्यार्थी ग्रामीण भागात शेतक-यांच्या शेतावर राहतात व शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान प्रसार करण्याकरीता शेतक-यांना मार्गदर्शन करतात. तसेच शेती करताना येणा-या अडचणी समजावून घेतात. प्रत्येक विद्यार्थी हा कृषिदूत म्हणून कार्य करतो. आठव्या सत्रात विद्यार्थी कार्यानुभवधिष्ठीत शिक्षणासाठी , प्रशिक्षणार्थी म्हणून पुढील पैकी एका संस्थेत जातो. उदा. बीयाणे / खते/ किटकनाशके/जैवतंत्रज्ञान उद्योग/व्यावसायिक रोपवाटिका / रेशिमउद्योग / अन्नप्रक्रिया संस्था / शेतीविषयक वित्त संस्था/बँक/पतसंस्था इ. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ शिक्षण मंडळ, पुणे मार्फत प्रत्येक सत्राची लेखी परीक्षा घेतली जाते. बी. एस्सी.(कृषि) पदवीकरीता विद्यापीठाची पुणे, धुळे कोल्हापूर, कराड व नंदूरबार येथे ५ घटक कृषि महाविद्यालये व २६ विनाअनुदानीत तत्वावरील कृषि महाविद्यालये कार्यरत आहेत.

२.१.२ बी. एस्सी. (उद्यानविद्या)

सन १९७० पर्यंत उद्यानविद्या हा कृषि अभ्यासक्रमाचा एक भाग होता. उद्यानविद्याचे सुरक्षित जीवनमान, आर्थिक सबलीकरण आणि अन्न सुरक्षा यातील महत्व लक्षात घेता, उद्यानविद्या ही एक स्वतंत्रशाखा म्हणून उदयास आली. विद्यापीठ अंतर्गत पहिले उद्यानविद्या महाविद्यालय १९८४ साली कृषि महाविद्यालय, पुणे येथे स्थापन करण्यात आले. बी. एस्सी. (उद्यान) चार वर्षाचा अभ्यासक्रम आठ सत्रात उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरीता १६५ क्रेडिटची आवश्यकता असते. सातव्या व आठव्या सत्रात विद्यार्थ्यांना १४ आठवडे व ६ आठवडे कृषि उद्योग समुहात प्रशिक्षणार्थी म्हणून रोपवाटीका व्यवस्थापन व संरक्षित लागवड या विषयांमध्ये प्रशिक्षण घेतात. उद्यानविद्या पदवी घेऊन विद्यार्थी, फळे, भाजीपाला लागवड, बगीचा सुशोभिकरण, काढणी पश्चात तंत्रज्ञान आदी क्षेत्रांमध्ये तज्ञ म्हणून कार्य करतात. बी. एस्सी. (उद्यान) अभ्यासक्रम कृषि महाविद्यालय, पुणे येथे चार विना अनुदानित महाविद्यालयात सुरु आहे.

२.१.३ बी. टेक. (अन्नशास्त्र व तंत्रज्ञान)

बी. टेक. (अन्नशास्त्र व तंत्रज्ञान) हा चार वर्षाचा अभ्यासक्रम आठ सत्रात शिकविला जातो. एकूण १८० क्रेडिट पैकी, १२५ क्रेडिट हे ६ व्या सत्रात पूर्ण होतात. ७ व्या सत्रात २५ (१५+१०) क्रेडिट हे ट्रेनिंगमधून त्यातील १५ क्रेडिट हे विद्यापीठाच्या प्रक्षेत्राबाहेरील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान महाविद्यालयातून पूर्ण करावे लागतात. स्थानिक गरजा व औद्योगिक मागणीवर आधारित कमीत कमी दोन कार्यानुभव प्रशिक्षण महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना देऊ केले जातात. आठव्या सत्रामध्ये ३० क्रेडिट करिता, विद्यापीठ प्रक्षेत्राबाहेर ६ महिन्यांसाठी अन्नप्रक्रिया उदयोग किंवा संस्थामध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. व त्याची पडताळणी त्याच अन्नप्रक्रिया उदयोगाकडून केली जाते.

याचा मुख्य उद्देश व्यावसायिक अन्नप्रक्रिया उदयोग संशोधन आणि विकास विभाग, संशोधन व शिक्षण संस्था आणि दर्जा नियंत्रण विभाग यांना प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविणे आणि नवीन अन्नप्रक्रिया उद्योग स्थापन करुन युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे. हा कार्यक्रम विद्यापीठांतर्गत आठ विना अनुदानित महाविद्यालयामध्ये चालविला जातो.

२.१.४ बी. बी.एम. (कृषि)

बी. एस्सी. (कृषि व्यवसाय व्यवस्थापन) चार वर्षांच्या अभ्यासक्रम आठ सत्रात उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रम, विविध संस्थातील कृषि निगडीत गरजा लक्षात घेऊन, विशेष करुन कृषि व्यवस्थापन या क्षेत्राचा जास्तीत जास्त अंतर्भाव अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यास कृषि अर्थशास्त्र, विपणन व व्यवसाय व्यवस्थापन या मध्ये प्राविण्य मिळेल. एकूण १६० क्रेडिट पैकी, १२० क्रेडिट हे ६ व्या सत्रात पूर्ण होतात. ७ व्या सत्रात २० क्रेडिट कार्यानुभव शिक्षणाकरीता आहेत. यात एकूण पाच मोड्युल तयार करण्यात आले असून, प्रत्येक मोड्युलमध्ये पाच ते वीस विद्यार्थी दिले जातात. मोडूल प्रामुख्याने कृषि निगडीत उद्योगसमूह, कृषि निगडीत उद्योगसमूह, व्यवस्थापन, काढणी पश्चात व्यवस्थापन, किंमती पिकांचे प्रकल्प तयार करणे, त्याची अंमलबजावणी व मूल्यमापन व कृषि विपणन व्यवस्थापन या विषयांवर आधारित आहेत. आठव्या सत्रात विद्यार्थी खेडेगावात प्रगतशील शेतकऱ्यांबरोबर राहुन शेतीशी निगडीत माहिती घेतात, नंतर प्रकिया उद्योग/बाजार/विपणन संस्था यात प्रत्यक्ष माहिती घेतात. यात एक आठवडा शैक्षणिक सहल आयोजित केली जाते. सदर अभ्यासक्रम विद्यापीठांतर्गत आठ विना अनुदानित महाविद्यालयामध्ये राबविला जातो.

२.१.५ बी. एस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान)

बी. एस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान)चार वर्षाच्या अभ्यासक्रम आठ सत्रात प्रदान करण्यात आलेला आहे. सदर पदवी अभ्यासक्रम १६० क्रेडिट आहे. जैवतंत्रज्ञान हा विषय इतर कृषि विभागांशी निगडीत असून, पदवी अभ्यासक्रम पाच विभाग उदा. जीवरसायनशास्त्र, पीक जैवतंत्रज्ञान, काढणी पश्चात व अन्न जैवतंत्रज्ञान, पशु जैवतंत्रज्ञान व पिकशास्त्रामध्ये उपलब्ध आहे. एकूण आठ सत्रापैकी, पहिले सहा सत्रामध्ये विद्यार्थी शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करतात. सातव्या सत्रात प्रात्यक्षिक आधारित अभ्यासक्रम देण्यात येतो. तर आठव्या सत्रात प्रत्येक विद्यार्थ्यास जैवतंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प तयार करुन त्याचे सादरीकरण करावे लागते. सध्या काळाची गरज विचारात घेऊन कृषि जैवतंत्रज्ञान अभ्यासक्रम सहा विना अनुदानित महाविद्यालयात कार्यरत आहे.

२.२ शैक्षणिक संस्था (घटक महाविद्यालय)

२.२.१ कृषि महाविद्यालय, पुणे



भारतातील पहिल्या पाच कृषि महाविद्यालयापैकी, कृषि महाविद्यालय, पुणे हे एक आहे. त्याची स्थापना १९०७ ला झाली. आद्य समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी ब्रिटीश सरकारकडे देशात कृषि संशोधन आणि शिक्षण देणारी संस्था सुरु करण्याची भूमिका मांडली. त्याला अनुसरुन विज्ञान महाविद्यालयात १८७९ साली कृषि विभाग सुरु करण्यात आला. याच विभागाचे पुढे रूपांतर स्वतंत्र कृषि महाविद्यालयात १९०७ मध्ये झाले. १९६८ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे कृषि महाविद्यालय विद्यापीठाकडे हस्तांतरीत झाले. या महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश क्षमता १९० व शेतजमीन ९० हेक्टर आहे. महाविद्यालयात शिक्षण व संशोधनाकरीता अनेक प्रकल्प कार्यरत असून त्यात प्रामुख्याने उच्च तंत्रज्ञान फुले व भाजीपाला उत्पादन प्रकल्प आहे तसेच, आळिंबी संशोधन प्रकल्प, एकात्मिक कीड नियंत्रण, लोकरी मावा नियंत्रण, अखिल भारतीय समन्वयित कापूस मररोग प्रकल्प, अणुजैविक प्रकल्प, बाजरी रोग नियंत्रण प्रकल्प, संकरीत फुलांचे वाण निर्मिती प्रकल्प, मस्त्य प्रकल्प कार्यरत आहेत. तसेच कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र व अत्याधुनिक रोपवाटिका आहे. महाविद्यालयामध्ये एम.बी.एम. (कृषि) अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आलेला आहे.

२.२.२ कृषि महाविद्यालय, कोल्हापूर



प्रगतशील शेती, शेतीपुरक उद्योग आणि सरकारी संस्था यामध्ये अग्रेसर असणा-या भारतातील अनेक जिल्ह्यांपैकी कोल्हापूर हा एक दक्षिण महाराष्ट्रातील जिल्हा आहे. या महाविद्यालयाची स्थापना शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १९६३ मध्ये झालेली आहे. १९६८ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीची स्थापना झाल्यानंतर कृषि महाविद्यालय, कोल्हापूर विद्यापीठाकडे हस्तांतरीत झाले. महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता १९० आहे. महाविद्यालयाचे एकूण जमीन क्षेत्र २४१.०८ हेक्टर आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण व संशोधनाकरीता गांडूळ खत प्रकल्प, जैविक खत प्रकल्प, जैविक किडनाशके उत्पादन प्रकल्प,फुले ड्रिंक्स, माती व पाणी पृथक्करण, बिजोत्पादन, रोपवाटिका, जमीन व पाणी अभियांत्रिकी शेतावर, प्रयोगशाळा, क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्प इत्यादी प्रकल्प कार्यरत आहे. सदर महाविद्यालय २०१३ मध्ये सुवर्ण महोत्सव वर्ष साजरे करत आहे.

२.२.३ कृषि महाविद्यालय, धुळे



मुंबई – आग्रा आणि सुरत– नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर कृषि महाविद्यालय, धुळे आहे. १९६० मध्ये या कृषि महाविद्यालयाची स्थापना झाली. प्रशस्त इमारत, नयनरम्य परिसर ही या महाविद्यालयाची वैशिष्ठये आहेत. उत्तर महाराष्ट्रातील कृषि शिक्षण, संशोधन व कृषि विस्तार करीता महाविद्यालय कार्यरत आहे. कोरडवाहू शेती, कापूस आणि भुईमूग यावर येथे जास्त प्रमाणात संशोधन केले जाते. महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता १२८ आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता प्रशस्त

प्रयोगशाळा, वाचनालय बरोबरच माती व पाणी पृथःकरण प्रयोगशाळा, गांडूळ खत प्रकल्प, सेंद्रीय शेती प्रात्यक्षिके, जैविक खत प्रकल्प, जैविक किडनाशके उत्पादन प्रकल्प, बिजोत्पादन कार्यक्रम, रोपवाटीका, पाणलोट क्षेत्र विकास, प्रात्यक्षिक युनिट, शेळी -मेंढी व पशुधन प्रकल्प, पाणी व्यवस्थापन प्रात्यक्षिक प्लॉट कार्यरत आहेत.

२.२.४ उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे



उद्यानविद्या अंतर्गत फळे, भाजीपाला, मसाल्याची पिके, शोभिवंत झाडे, सुगंधी वनस्पती, काढणी पश्चात तंत्रज्ञान इ. बाबींचा समावेश होतो. परंपरागत शेतीला चांगला पर्याय याव्दारे उपलब्ध झाला आहे. महाराष्ट्र राज्य मुख्यतः पश्चिम महाराष्ट्र विभाग हा उद्यान विद्यामध्ये भारतात सर्वोच्च स्थानी आहे. कृषि महाविद्यालयाच्या परिसरात १९८४ साली उद्यानविद्या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. १९९५ मध्ये ते स्वंतत्र इमारतीमध्ये सुरू झाले. सर्वसोयी सुविधांनी परिपूर्ण असणारी प्रशस्त इमारत हे या महाविद्यालयाचे वैशिष्टये म्हणता येईल. सर्व विभागांकरीता प्रयोगशाळा, संगणक, इंटरनेट आदी सुविधा महाविद्यालयात उपलब्ध आहे. महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ३२ आहे.

२.२.५ कृषि महाविद्यालय,कराड

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, यांचे जन्मशताब्दी वर्ष २०१२-१३ साजरे करण्याच्या निमित्ताने शासनाने निर्णय क्रमांक मकृवि २०११/प्र क. १०/७ अे दिनांक १६.०७.२०१३ कराड येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय मंजूर केले. या महाविद्यालयाचे अभ्यासक्रमांचे कामकाज हे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून कृषि संशोधन केंद्र कराड येथे दिनांक १६.०८.२०१५ पासून नियमीतपणे सुरु झाले.

२.२.६ कृषि महाविद्यालय, नंदुरबार

नंदूरबार जिल्ह्याची निर्मिती दिनांक ०१.०७.१९९८ रोजी धुळे जिल्ह्यातून झाली आहे. नंदूरबार जिल्ह्यामध्ये एकूण सहा तालुके आहेत. महाराष्ट्राच्या उत्तरेला आदिवासी भागामध्ये नंदूरबार जिल्हा वसलेला आहे. नंदूरबार जिल्ह्यातील २८.३० टक्के जमिन ओलीताखाली आहे. कृषि महाविद्यालय, नंदूरबारची स्थापना सन २०१३-१४ साली होऊन विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता ६० इतकी आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये जमातीतील विद्यार्थ्यांसाठी ८० टक्के प्रवेश राखीव आहेत.

२.२.७ विना अनुदानित कृषि महाविद्यालये

कृषि क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेऊन सन २००१ पासून महाराष्ट्र शासनाने विना अनुदानित तत्वावर कृषि व संलग्न पदवी महाविद्यालयांना मान्यता दिलेली आहे. अहवाल वर्षात विद्यापीठांतर्गत कृषि- २६, उद्यानविद्या -०४, अन्नशास्त्र व तत्रज्ञान -०८, कृषि व्यवसाय व्यवस्थापन -०८, कृषि जैवतंत्रज्ञान -०६, कृषि अभियांत्रिकी -०८, पशुसंवर्धन महाविद्यालय ०१ असे एकूण ६१ विना अनुदानित कृषि व कृषि संलग्न पदवी महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

२.३ पदव्युत्तर शिक्षण कार्यक्रम

महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तर कार्यक्रम राहुरी, पुणे, धुळे व कोल्हापूर येथे आहे. विद्यापीठात एम. एस्सी. (कृषि) व आचार्य (पीएच.डी) अभ्यासक्रम उपलब्ध आहे. एम.एस्सी. (कृषि) प्रवेशाकरीता महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परीक्षा मंडळ, पुणे मार्फत सामुदायिक प्रवेश परीक्षा घेतली जाते.

२.३.१ एम. एस्सी.(कृषि)

एम. एस्सी.(कृषि) दोन वर्षाचा अभ्यासक्रम असून चार सत्रात विभागलेला आहे. एम. एस्सी.(कृषि) करीता एकूण ५५ क्रेडिट आहेत. यातील ३५ क्रेडिट विषय अभ्यासक्रमाकरीता व २० क्रेडिट संशोधना करीता आहेत. या अभ्यासक्रमात प्रत्येक विद्यार्थी त्यास मिळालेल्या विषयात प्राविण्य मिळवतो. प्रत्येक विद्यार्थ्याकरीता ४-५ प्राध्यापकांची एक विद्यार्थी सल्लागार समिती असून ती विद्यार्थ्यांना संशोधनाचा विषय निवडण्यास व संशोधनाकरीता मार्गदर्शन करते. सर्व क्रेडिट पूर्ण केल्यानंतर व संशोधन प्रबंध सादर केल्यानंतर विद्यार्थी एम. एस्सी.(कृषि) पदवीकरीता पात्र ठरतो. एम. एस्सी. पदवी पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी येथे १८ विषयात, कृषि महाविद्यालय, पुणे येथे १० विषयात, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे ४ विषयात व कृषि महाविद्यालय, धुळे येथे ५ विषयात, एम.एस्सी पदवी कार्यक्रम घेण्यात येतो.

२.३.२ आचार्य (पी.एच.डी)

आचार्य पदवी अभ्यासक्रम ३ वर्षाचा असून सहा सत्रात विभागलेला आहे. पी.एच.डी. करीता एकूण ७५ क्रेडिट आहेत. यातील ३० क्रेडिट विषय अभ्यासक्रमाकरीता व ४५ क्रेडिट संशोधना

करीता आहेत. आचार्य पदवी मध्ये संशोधन हा मुख्य गाभा असून विद्यार्थी प्रयोगशाळेत, शेतावर विविध पिकांवर संशोधन कार्य हाती घेतात तसेच काही विषयात शेतक-यांच्या शेतावर सर्वेक्षण करुन माहिती जमा करतात. विद्यार्थ्यास मार्गदर्शन करण्याकरीता पाच प्राध्यापकांची एक विद्यार्थी सल्लागार समिती असते. विद्यार्थ्याचा संशोधन प्रबंध भारतातील कृषि विद्यापीठातील संबंधित विषयातील दोन कृषि तज्ज्ञांकडे मुल्यांकनासाठी पाठविण्यात येतो. पी.एच.डी. अभ्यासक्रम पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी येथे १८ विषयात, कृषि महाविद्यालय, पुणे येथे ०१ विषयात उपलब्ध आहे.

२.४ पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी



पदव्युत्तर महाविद्यालयाची स्थापना १९७२ मध्ये झाली. या संस्थेत कृषि संलग्न १८ विषयांमध्ये एम.एस्सी. (कृषि) अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्याचबरोबर पी.एच.डी. अभ्यासक्रम उपलब्ध आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रम कृषि विद्या, अनुवंश व रोप पैदास शास्त्र, वनस्पती शरीर क्रिया शास्त्र , बियाणे शास्त्र व तंत्रज्ञान, कृषि जैवतंत्रज्ञान, मृदशास्त्र व कृषि रसायन, कृषि अर्थशास्त्र, विस्तार शिक्षण, कृषि कीटकशास्त्र, उद्यानविद्या, (फळशास्त्र, भाजीपालाशास्त्र) वनस्पती रोगशास्त्र, कृषि अनुजीवशास्त्र, पशुविज्ञान, दुग्धशास्त्र, अन्नशास्त्र, जीवरसायन शास्त्र, आंतरविद्याशाखा जलसिंचन या विषयात उपलब्ध आहे. प्रत्येक विषयाकरीता सोयी सुविधा युक्त प्रशस्त प्रयोगशाळा आहे. विद्यार्थी संशोधनाकरीता जैवतंत्रज्ञान संशोधन केंद्र, सुक्ष्म अन्नद्रव्य प्रयोगशाळा, अखिल भारतीय उर्वरित कीडनाशक अंश पृथःकरण प्रयोगशाळा, काढणी पश्चात प्रयोगशाळा, बेकरी प्रकल्प, जैविक कीडनाशक उत्पादन प्रकल्प, ऊतीसंवर्धन, जैविक खत उत्पादन प्रयोगशाळा, गोठीत वीर्य प्रयोगशाळा इत्यादींचा वापर करतात. या व्यतिरिक्त शेतावर संशोधन करण्याकरीता संस्थेकडे ५६.२१ हेक्टर क्षेत्र आहे. तसेच उद्यानविद्या, औषधी व सुगंधी वनस्पती, जलसिंचन व्यवस्थापन प्रक्षेत्राचा उपयोग संशोधनाकरीता विद्यार्थी करतात.

२.५ कृषि महाविद्यालय, पुणे

कृषि महाविद्यालय, पुणे येथे पदव्युत्तर अभ्यासक्रम दहा विषयामध्ये उपलब्ध आहे. तर पी.एच.डी अभ्यासक्रम एक विषयात उपलब्ध आहे. कृषि विद्या, अनुवंश व रोप पैदास शास्त्र, मृदशास्त्र व कृषि रसायन, विस्तार शिक्षण, कृषि कीटकशास्त्र, उद्यानविद्या, वनस्पती रोगशास्त्र, कृषि अनुजीवशास्त्र, पशुविज्ञान व कृषि हवामानशास्त्र या विषयात उपलब्ध आहे. पी.एच.डी अभ्यासक्रम कृषि हवामानशास्त्र विषयात उपलब्ध आहे.

२.५ कृषि महाविद्यालय, धुळे

कृषि महाविद्यालय, धुळे येथे २००९-१० पासून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. अनुवंश व रोप पैदास शास्त्र, फळशास्त्र, पशुविज्ञान, मृदशास्त्र व रसायनशास्त्र , कृषि कीटकशास्त्र, वनस्पती रोगशास्त्र या चार विषयात धुळे महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहे

२.६ कृषि महाविद्यालय, कोल्हापूर

कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे २००९-१० पासून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. सध्या कृषि विद्या, अनुवंश व रोप पैदास शास्त्र, विस्तार शिक्षण, कृषि अर्थशास्त्र, कृषि अनुजीवशास्त्र, मृदशास्त्र व रसायनशास्त्र व कृषि कीटकशास्त्र या सात विषयात कोल्हापूर महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

२.८ कृषि अभियांत्रिकी शाखा

कृषि अभियांत्रिकी शाखामार्फत विविध क्षेत्रातील शैक्षणिक गरज भागविली जाते. यात प्रामुख्याने सुक्ष्म जलसिंचन, कृषि यंत्रे व शक्ति, मृद व जलसंधारण, कृषि प्रक्रिया, फळे व भाजीपाला साठवणूक व प्रक्रिया, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, हरितगृह, पॉलिहाऊस उभारणी व देखभाल, संगणकाचा कार्यक्षम वापर, रिमोट सेन्सींग, इत्यादी बाबींवर ज्ञानदान करण्यात येते. या शाखेअंतर्गत एक घटक व तीन विनाअनुदानित महाविद्यालय कार्यरत आहेत. या सर्व महाविद्यालयात चार वर्षाचा बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) अभ्यासक्रम उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रम १८३ क्रेडिटचा आहे. या व्यतिरिक्त घटक महाविद्यालयामध्ये चार शाखांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम एम. टेक. (कृषि अभियांत्रिकी) उपलब्ध आहे.

२.८.१ डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी



कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी १९६९ मध्ये स्थापन झाले. कृषि अभियांत्रिकी हा अभ्यासक्रम चार वर्षाचा असून तो आठ सत्र पध्दतीमध्ये घेतला जातो. सन १९९६ मध्ये या महाविद्यालयास माजी केंद्रीय राज्यमंत्री, कृषि व हरित क्रांतीचे शिल्पकार कै. डॉ. अण्णासाहेब शिंदे याचे नाव देण्यात आले. सुरुवातीस या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता २० होती. कृषि अभियांत्रिकी, मृद व जलसंधारण विभाग, पाणी व्यवस्थापन, शेतीचे यांत्रिकीकरण, काढणी पश्चात तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रातील मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेऊन विद्यार्थी संख्या ३२ करण्यात आली व सध्या विद्यार्थी प्रवेश क्षमता ६४ आहे. या व्यतिरिक्त सन १९८२ पासून कृषि यंत्रे व शक्ती विभाग, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग, व कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी हा चार विभागांमध्ये एम.टेक. (कृषि अभियांत्रिकी) पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता खालील प्रकल्पांचा उपयोग होतो. अखिल भारतीय जमिनीखालील पाण्याचा विहिरी व पंपसेट व्दारे वापर, कृषि यंत्रे व औजारे प्रकल्प, रिमोट सेन्सींग प्रयोगशाळा, ट्रॅक्टर प्रशिक्षण प्रयोगशाळा, शाश्वत शेती सुधार प्रकल्प इत्यादी.

२.८.२ विना अनुदानित कृषि अभियांत्रिकी महाविद्यालये

बी. टेक.(कृषि अभियांत्रिकी) पदवी अभ्यासक्रम विद्यापीठ कार्यक्षेत्रात आठ कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात उपलब्ध आहे.

२.८.३ कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम

कृषि क्षेत्रात झपाटयाने होत असलेल्या स्थित्यंतरामुळे कृषि पदविका अभ्यासक्रमामध्ये आमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. त्यामुळे विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये मुलभुत बदल करण्यात आले. पीक संरक्षण, कृषि अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान व कृषि व्यवसाय व्यवस्थापन या नवीन विषयांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. या शिक्षणामधून उत्कृष्ट शेती करण्यासाठी खते, बियाणे, औषधे यांच्या कारखानदारीसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ तयार होत आहे. तसेच स्वयंरोजगार निर्मिती साठीच्या आत्मविश्वास या कृषि पदविकाधारकांमध्ये निर्माण झाला आहे. या विद्यापीठ अंतर्गत १० जिल्हयांमध्ये ९ घटक व ८५ विनाअनुदानीत संलग्न अशी एकूण ९४ कृषि तंत्र विद्यालये आहेत. त्यामध्ये एकूण प्रवेश क्षमता ५६४० आहे. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ५१७४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. तसेच ३६९० विद्यार्थ्यांनी कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम, मे २०१४ मध्ये पुर्ण केलेला आहे.

२.८.४ प्रमाणपत्र अभ्यासक्रम

एक वर्षाचा माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठांतर्गत चार ठिकाणी शिकविला जात असुन त्याची एकूण प्रवेश क्षमता १६० आहे.

कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीच्या कार्यक्षेत्रात मध्यवर्ती परिसर, घटक कृषि महाविद्यालय व संशोधन केंद्र येथे व्ही - सॅट व लिज लाईन १ जी.बी. क्षमतेची संचार सेवा उपलब्ध आहे. यामध्ये ई- पुस्तकालय सेवा आठरा तास विद्यार्थ्यांना चारशे नोट्स मधून अव्याहत पणे टेबल सेवा उपलब्ध आहे. तसेच मध्यवर्ती परिसर येथे व्हीडीओ कॉन्फरन्सिंग ३ व इतर ८ ठिकाणी (कृषि महाविद्यालय, पुणे, धुळे, कोल्हापूर विभागीय कृषि संशोधन केंद्र इगतपूरी व सोलापूर व कृषि संशोधन केंद्र कसबे डिग्रज, पाडेगाव व जळगाव) उपलब्ध आहे. संपूर्ण प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथून कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्रातील एकात्मीक संगणकाने नियंत्रित केला जातो. कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र पूर्णत: विद्यापीठ आख्यारित असल्याने कोणत्याही वेळी ५०० शास्त्रज्ञ / शेतकरी प्रशिक्षीत करता येतात. याच केंद्रामधून विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण व संशोधनात्मक उपयोगिता वाढविता येते. वरील सर्व सेवा अद्ययावत, गतिमान व प्रसारमाध्यमात सांगड घालणाऱ्या आहेत. या सर्व सेवा भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथून विशेष अनुदान प्राप्त आहे.

विद्यापीठ ग्रंथालय



विद्यार्थ्यांच्या व वाचकांच्या शिक्षण, संशोधन व प्रसारण कार्यामध्ये ज्ञानदान व माहिती पुरविण्याचे महत्वाचे कार्य ग्रंथालय करते. वाचकांच्या गरजा पुरविण्यासाठी सन १९७१ पासून मध्यवर्ती परिसरात ग्रंथालय कार्यरत झाले. गेल्या चार दशकापासून मा. अध्यक्ष, ग्रंथालय सल्लागार समिती यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालयाची समृध्दी होत असून शास्त्रज्ञ, वाचक, शिक्षक यांना अविरत सेवा देत आहे. सध्याच्या माहिती व तंत्रज्ञान युगात ग्रंथालयाच्या सेवेमध्ये आमुलाग्र बदल झालेले आहेत. पारंपारिक सेवेसोबत सध्या ग्रंथालयात इंटरनेट, ई-मेल सेवा, सीडी रोम शोध सेवा, ई-नियतकालीके, सेरा, माहिती व तंत्रज्ञानावर आधारित सेवा देण्यात येतात.

ग्रंथालय अनुदान

मध्यवर्ती परिसर राहुरी येथील ग्रंथालयासाठी सन २०१४-१५ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून वेतनासाठी रु. ४४.४० लक्ष व आकस्मिक खर्चासाठी रु. ६.७२ लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले. तसेच कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांच्याकडून २५.०० लक्ष. असे एकूण रु. ७६.१२ लक्षचे अनुदान ग्रंथालयास अहवाल वर्षात उपलब्ध झाले.

नियतकालीके व पुस्तक खरेदी

अहवाल वर्षात ११३५ पुस्तके, १८१ प्रबंधे यांची ग्रंथसंग्रहात भर पडली आणि ३१.०३.२०१५ रोजी एकूण ग्रंथसंख्या १,१६,१०७ इतकी झाली. ग्रंथालयाने १२६ भारतीय नियकालिकांची वर्गणी भरली. जर्नल ऑफ महाराष्ट्र ॲग्रीकल्चरल युनिव्हरसिटीच्या अदलाबदल कार्यक्रमांतर्गत १८ नियतकालीके प्राप्त झाली आहेत. तसेच ४० नियतकालीके भेट म्हणून प्राप्त झाली आहेत.

ग्रंथालय सेवा

मुक्तद्वार पध्दत

ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दत अवलंबिली असून त्यामध्ये वाचकांना ग्रंथसंग्रह हाताळण्यास संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

वाचनासाठी पुस्तके

अहवाल वर्षात ७०६९ पुस्तके वाचकांना घरी वाचनासाठी देण्यात आली. तसेच ग्रंथालयात ५७,८३० पुस्तके हाताळण्यात आली.

आंतर ग्रंथालयीन आदान-प्रदान

आंतर ग्रंथालयीन पुस्तकांची देवाण-घेवाण, सुविधा उपलब्ध करण्यात आली. त्या अंतर्गत उपलब्ध नसलेली पुस्तके दुसऱ्या ग्रंथालयाकडून तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेता येतात.

पुनआलेख सेवा (झेरॉक्स)

विद्यापीठ ग्रंथालयात गरजूंना सवलतीच्या दरात झेरॉक्स सेवा उपलब्ध करुन देण्यात येते. अहवाल वर्षात १९,२८६ छायांकित प्रती काढून देण्यात आल्या व त्यापोटी रु. ६,७४४ महसूली रक्कम जमा करण्यात आली.

वाचन कक्ष

विद्यार्थ्यांनी वाचनकक्ष सेवेस चांगला प्रतिसाद दिला अहवाल वर्षात १,१८,९६४ वाचकांनी वाचनकक्षास भेट देऊन या सेवेचा लाभ घेतला.

महिती तंत्रज्ञान सेवेअंतर्गत खालील सुविधा उपलब्ध आहेत.

* इंटरनेट सेवा
* सीडी रोम डेटाबेसेस
* सेरा (कॅन्सॉरशियम ऑफ ई-रिसोर्ससेस इन ॲग्रीकल्चर)
* ई-जर्नल्स, ऑनलाईन ई-जर्नल्स
* सांख्यिकी डेटाबेस
* ई-थेसीस ॲब्स्ट्रॅक्टस डेटाबेस
* दुरदर्शन संच/व्हि. सी. आर.
* कृषि प्रभा
* कृषिकोश : एक संस्थात्मक भांडार

ओपॅक (ऑनलाईन सार्वजनिक प्रवेश पुस्तिका)

विद्यापीठ ग्रंथालयात दोन ओपॅक मशिनची मांडणी करण्यात आली असून विद्यार्थी व संशोधक यांना हवी असलेली ग्रंथ शोधण्याकरिता ती उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

ग्रंथालयाच्या वेळा

ग्रंथालय दररोज सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत उघडे ठेवण्यात आले. वाचनकक्ष मात्र रात्री ११.०० पर्यंत उघडे ठेवण्यात येते. ग्रंथालय रविवारी तसेच दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सकाळी ७.०० ते ४.०० वाजेपर्यंत उघडे ठेवण्यात येते.

व्हिजीटर्स

अहवाल वर्षात ६२,२५१ वाचकांनी तसेच २,८५६ एकूण (६५,१०७) कर्मचाऱ्यांनी ग्रंथालयास भेट दिली. इतर विद्यापीठे व संस्था मधून आलेल्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन संदर्भ संकलनासाठी ग्रंथालय सेवेचा लाभ घेतला.

विद्यापीठाच्या शैक्षणिक संस्था

अ. क्र.	संस्थेचे नाव	अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता
अ) घटक महाविद्यालये			
१.	पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी	पी.एच.डी. (कृषि)	७२
		एम.एस्सी. (कृषि)	१६८
		एम.एस्सी. (उद्यानविद्या)	१२
		एम.एस्सी. (जैव तंत्रज्ञान)	८
२.	कृषि महाविद्यालय, पुणे	एम.एस्सी. (कृषि)	५४
		एम.एस्सी. (उदयानविद्या)	६
		एम.एस्सी. (कृषि व्यवसाय व व्यवस्थापन)	३०
		एम. बी. ए. (कृषि व्यवसाय व्यवस्थापन	३०
		बी.एस्सी. (कृषि)	१९०
३.	कृषि महाविद्यालय, कोल्हापूर	एम.एस्सी. (कृषि)	४८
		एम.एस्सी. (उद्यानविद्या)	४
		बी.एस्सी. (कृषि)	१९०
४.	कृषि महाविद्यालय, धुळे	एम.एस्सी. (कृषि)	२४
		एम.एस्सी. (उद्यानविद्या)	४
		बी.एस्सी. (कृषि)	१२८
५.	कृषि महाविद्यालय, कराड	बी.एस्सी. (कृषि)	६०
६.	कृषि महाविद्यालय, नंदुरबार	बी.एस्सी. (कृषि)	६०
७.	उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे	बी.एस्सी. (उद्यानविद्या)	३२
८.	डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी	पी.एच.डी. (कृषि अभियांत्रिकी)	९
		एम.टेक (कृषि अभियांत्रिकी)	१६
		बी.टेक (कृषि अभियांत्रिकी)	६४
ब) विना अनुदानीत महाविद्यालये			
१.	कृषि महाविद्यालय, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर	बी.एस्सी.(कृषि)	१२०
२.	कृषि महाविद्यालय, कृषि विकास प्रतिष्ठान, बारामती, मु.पो. शारदानगर, ता. बारामती, जि. पुणे	बी.एस्सी.(कृषि)	१२०
३.	कृषि महाविद्यालय, भारती विद्यापीठ, कडेगांव, जि.सांगली.	बी.एस्सी.(कृषि)	१२०
४.	कृषि महाविद्यालय, कर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील मराठा विद्या प्रसारक, नाशिक,शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक	बी.एस्सी.(कृषि)	१२०
५.	कृषि महाविद्यालय, कृष्णा सहकारी साखर कारखाना लि.रेठरे बु.।।, मु.पो. शिवनगर, ता. कराड, जि.सातारा	बी.एस्सी.(कृषि)	१२०

६.	कृषि महाविद्यालय, मूळा एज्यूकेशन सोसायटी, सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर	बी.एस्सी.(कृषि)	१२०
७.	कर्मवीर काकासाहेब वाघ कृषि महाविद्यालय, अमृतधाम, पंचवटी, नाशिक	बी.एस्सी.(कृषि)	१२०
८.	कृषि महाविद्यालय, राजमाची, ता.कराड, जि.सातारा.	बी.एस्सी.(कृषि)	१२०
९.	डॉ. उल्हास पाटील कृषि महाविद्यालय, जळगांव, जि. जळगांव	बी.एस्सी.(कृषि)	१२०
१०.	डॉ. डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कृषि महाविद्यालय, आंबी, ता. मावळ, जि.पुणे	बी.एस्सी.(कृषि)	१२०
११.	कृषि महाविद्यालय, पुज्य साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ, शहादा, ता.शहादा, जि.नंदूरबार	बी.एस्सी.(कृषि)	१२०
१२.	कृषि महाविद्यालय, श्रीराम ग्रामीण व विकास प्रतिष्ठाण, मु.पो.वडाळा, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर	बी.एस्सी.(कृषि)	१२०
१३.	डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कृषि महाविद्यालय, तळसंदे ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर	बी.एस्सी.(कृषि)	१२०
१४.	कृषि महाविद्यालय, फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण, जि. सातारा	बी.एस्सी.(कृषि)	६०
१५.	कृषि महाविद्यालय, नवलभाऊप्रतिष्ठाण, नवलनगर, मु.पो. अमळनेर, जि. जळगांव	बी.एस्सी.(कृषि)	६०
१६.	कृषि महाविद्यालय, सेवा संस्कार संस्था, श्रमीक प्रतिष्ठाण, मु.पो. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर	बी.एस्सी.(कृषि)	६०
१७.	कृषि महाविद्यालय, श्री. संत गजानन महाराज ग्रामिण विकास प्रतिष्ठाण, मु.पो. मिरजगांव, ता. कर्जत, जि. अहमदनगर	बी.एस्सी.(कृषि)	६०
१८.	कृषि महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे	बी.एस्सी.(कृषि)	६०
१९.	कृषि महाविद्यालय, बाभुळगाव, ता.येवला, जि. नाशिक	बी.एस्सी.(कृषि)	६०
२०.	कृषि महाविद्यालय, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर	बी.एस्सी.(कृषि)	६०
२१.	साईकृपा कृषि महाविद्यालय, घारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर	बी.एस्सी.(कृषि)	६०
२२.	कृषि महाविद्यालय, जैनापूर, जि. कोल्हापूर	बी.एस्सी.(कृषि)	६०
२३.	कृषि महाविद्यालय, पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर	बी.एस्सी.(कृषि)	६०
२४.	डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि महाविद्यालय, विळद घाट, जि. अहमदनगर	बी.एस्सी.(कृषि)	६०
२५.	रोशनजी शमनजी कृषि महाविद्यालय, नेसरी, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर	बी.एस्सी.(कृषि)	६०
२६.	कृषि महाविद्यालय, मालेगांव, जि. नाशिक	बी.एस्सी.(कृषि)	६०
२७.	उद्यानविद्या महाविद्यालय, फलटण एज्यूकेशन सोसायटी ता.फलटण, जि.सातारा	बी.एस्सी. (उद्यानविद्या)	८०
२८.	उद्यानविद्या महाविद्यालय, कडेगाव, जि. सांगली	बी.एस्सी. (उद्यानविद्या)	४०
२९.	क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक	बी.एस्सी. (उद्यानविद्या)	४०
३०.	मुरलीधर स्वामी उद्यानविद्या महाविद्यालय, मालेगांव, जि. नाशिक	बी.एस्सी. (उद्यानविद्या)	४०

३१.	कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, गोदावरी फौंडेशन जळगांव, गोदावरी हॉस्पिटल बिल्डींग, ता.जि. जळगांव	बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी)	८०
३२.	कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, पद्मश्री डॉ.डी.वाय. पाटील एज्यूकेशन सोसायटी, तळसंदे ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.	बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी)	८०
३३.	कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, कर्मवीर काकासाहेब वाघ एज्यूकेशन सोसायटी, नाशिक, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक	बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी)	८०
३४.	सह्याद्री कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, यशवंतनगर, कराड, जि. सातारा	बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी)	४०
३५.	कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय,मिरजगांव, ता कर्जत. जि. अहमदनगर	बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी)	४०
३६.	कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर	बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी)	४०
३७.	कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, सेवा संस्कार संस्था, श्रमीक प्रतिष्ठाण, मु.पो. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर	बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी)	४०
३८.	कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय,राजमाची, ता कराड. जि. सातारा	बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी)	४०
३९.	मीराज एम आय टी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, लोणी काळभोर, जि.पुणे	बी.टेक. (अन्न व तंत्रज्ञान)	८०
४०.	मोकाशी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, राजमाची, ता. कराड, जि.सातारा	बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान)	८०
४१.	अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, के.के. वाघ एज्युकेशन सोसायटी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक	बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान)	८०
४२.	अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, सेवा संस्कार संस्था, श्रमीक प्रतिष्ठाण, मु.पो. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर	बी.टेक. (अन्न व तंत्रज्ञान)	४०
४३.	डॉ. उल्हास पाटील अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, जळगांव. जि. जळगांव.	बी.टेक. (अन्न व तंत्रज्ञान)	४०
४४.	अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, दिवानमळा (लळींग), धुळे, जि. धुळे	बी.टेक. (अन्न व तंत्रज्ञान)	४०
४५.	अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, वाघोली, ता. मोहळ, जि.सोलापूर	बी.टेक. (अन्न व तंत्रज्ञान)	४०
४६.	अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, घारगांव, ता.श्रीगोंदा,जि. अहमदनगर	बी.टेक. (अन्न व तंत्रज्ञान)	४०
४७.	जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर	बी.टेक. (जैवतंत्रज्ञान)	८०
४८.	जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, के.के. वाघ शिक्षण संस्था, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, जि. नाशिक	बी.टेक. (जैवतंत्रज्ञान)	८०
४९.	कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, श्रीराम ग्रामीण व विकास प्रतिष्ठाण, मु.पो. वडाळा, जि. सोलापूर	बी.टेक. (जैवतंत्रज्ञान)	४०
५०.	कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, मु.पो. पौड, ता. मुळशी, जि. पुणे	बी.टेक. (जैवतंत्रज्ञान)	४०
५१.	कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, राजलक्ष्मी फाउंडेशन, मदडगाव, पो. भातोडी, जि. अहमदनगर	बी. टेक. (जैवतंत्रज्ञान)	८०
५२.	कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, विद्या प्रतिष्ठाण, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती, जि.पुणे	बी.टेक. (जैवतंत्रज्ञान)	४०
५३.	कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, डॉ.डी.वाय. पाटील प्रतिष्ठान, आकुर्डी, जि. पुणे	बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन)	८०
५४.	कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु.पो. नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे	बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन)	८०

५५.	कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, विलींगडन कॉलेज कॅम्पस, विश्राम बाग, सांगली	बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन)	४०
५६.	कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर	बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन)	४०
५७.	कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर	बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन)	४०
५८.	कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, के.के. वाघ शिक्षण संस्था, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक	बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन)	४०
५९.	कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, श्रीराम ग्रामीण व विकास प्रतिष्ठाण वडाळा, जि. सोलापूर	बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन)	४०
६०.	कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, बारामती, जि. पुणे	बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन)	४०
६१.	पशुसंवर्धन महाविद्यालय, बारामती जि.पुणे	बी.एस्सी. (पशुसंवर्धन)	३०
क) कृषि पदविका			
१.	घटक कृषि तंत्र विद्यालय, मांजरीफार्म (पुणे), कोल्हापूर, धुळे, बोरगांव (सातारा), सोलापूर, डिग्रस (सांगली), पुणतांबा (अहमदनगर), मालेगांव (नाशिक), जळगांव	कृषि पदविका	६० (प्रत्येकी)
२.	कृषि तंत्र विद्यालय, मांजरी (पुणे) (मुलींचे)	कृषि पदविका	६०
३.	मान्यता प्राप्त खाजगी कृषि तंत्र निकेतने, (एकूण-८७)	कृषि तंत्रज्ञान पदविका	६० (प्रत्येकी)
४.	माळी प्रशिक्षण केंद्र, गणेशखिंड, पुणे	प्रमाणपत्र	४०
५.	मान्यताप्राप्त माळी प्रशिक्षण केंद्र (एकूण-४)	प्रमाणपत्र	४० (प्रत्येकी)

सन २०१४-१५ मध्ये अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी

अ. क्र.	पदवी अभ्यासक्रमाचे नांव	सन २०१४-१५ मध्ये अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी
		शासकीय व संलग्न
अ. पदवी अभ्यासक्रम		
१	बी. एस्सी. (कृषि)	----
२	बी. एस्सी. (उद्यानविद्या)	----
३	बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी)	----
४	बी. टेक. (अन्नशास्त्र)	----
५	बी. एस्सी. (जैव तंत्रज्ञान)	----
६	बी. एस्सी. (कृषि व्यवसाय व्यवस्थापन)	----
	एकूण	*
ब. पदव्युत्तर अभ्यासक्रम		
१	एम. एस्सी. (कृषि)	----
२	एम. एस्सी. (उद्यानविद्या)	----
३	एम. टेक. (कृषि अभियांत्रिकी)	----

४	पी. एच. डी.	----
५	एम. बी. एम. (कृषि)	----
६	एम. एस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान)	----
	एकूण	*

* २०१४-१५ मधील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ होणे बाकी आहे.

पदव्युत्तर महाविद्यालय वर्गनिहाय विद्यार्थी संख्या २०१४-१५

अ. क्र.	विभागाचे नांव	एम. एस्सी. कृषि				पी. एच. डी.				एकूण
		प्रथम		द्वितीय		प्रथम		द्वितीय		
		नियमीत	सेवांतर्गत विद्यार्थी	नियमीत	सेवांतर्गत विद्यार्थी	नियमीत	सेवांतर्गत विद्यार्थी	नियमीत	सेवांतर्गत विद्यार्थी	
१	कृषि विद्या	३१	–	३१	–	६	–	६	–	७४
२	अनुवंश व रोप पैदास शास्त्र	३१	–	३१	–	६	–	६	–	७४
३	रोप शरीर शास्त्र	६	–	६	–	४	–	४	–	२०
४	बीज तंत्रज्ञान	९	–	९	–	४	–	४	–	२६
५	कृषि अर्थशास्त्र	२१	–	२१	–	४	–	४	–	५०
६	विस्तार शिक्षण	३१	–	३१	–	४	–	४	–	७०
७	पशुसंवर्धन	१५	–	१५	–	४	१	४	१	४०
८	दुग्धशास्त्र	६	–	६	–	४	–	४	–	२०
९	कृषि किटकशास्त्र	३१	–	३१	–	६	–	६	–	७४
१०	वनस्पती रोगशास्त्र	२१	–	२१	–	६	–	६	–	५४
११	कृषि सुक्ष्म जीवशास्त्र	१८	–	१८	–	४	–	४	–	४४
१२	मृदशास्त्र व कृषि रसायन शास्त्र	३१	–	३१	–	४	१	४	१	७२
१३	जैव रसायन शास्त्र	९	–	९	–	–	–	–	–	१८
१४	अन्न व तंत्रज्ञान	९	–	९	–	२	–	२	–	२२
१५	सिंचन जलव्यवस्थापन	९	–	९	–	२	–	२	–	२२
१६	कृषि हवामानशास्त्र	६	–	६	–	२	–	२	–	१६
१७	फळशास्त्र	६	–	६	–	४	–	४	–	२०
१८	भाजीपाला शास्त्र	६	–	६	–	४	–	४	–	२०
१९	फुल शेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन	६	–	६	–	–	–	–	–	१२
२०	कृषि प्रक्रिया व अभियांत्रिकी	४	–	४	–	३	–	३	–	१४
२१	कृषि यंत्रे आणि शक्ती	४	–	४	–	३	–	३	–	१४
२२	सिंचन निचरा व अभियांत्रिकी	४	–	४	–	३	१	३	१	१६

२२	मृद व जलसंधारण अभियांत्रिकी	४	–	४	–	३	–	३	–	१४
	एकूण	३१४	–	३१४	–	८२	३	८२	३	७९८

पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थी संख्या

अ. क्र.	विभागाचे नाव	एम. एस्सी. सन २०१२-१३ मधील विद्यार्थी	पीएच. डी. सन २०११-१२ मधील विद्यार्थी	एकूण
		पदव्युत्तर महाविद्यालय	पदव्युत्तर महाविद्यालय	
१	कृषि विद्या	१८	६	२४
२	कोषाणुवंशकीय व रोप पैदास शास्त्र	१३	६	१९
३	वनस्पती शरीर क्रिया शास्त्र	४	२	६
४	बियाणे शास्त्र व तंत्रज्ञान	८	४	१२
५	मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र	११	८	१९
६	कृषि कीटकशास्त्र विभाग	१२	४	१६
७	विस्तार शिक्षण विभाग	१३	३	१६
८	कृषि अर्थशास्त्र विभाग	२०	५	२५
९	वनस्पती रोगशास्त्र	१८	९	२७
१०	कृषि अणुजीवशास्त्र विभाग	८	३	११
११	पशुविज्ञान	१५	–	१५
१२	दुग्धशास्त्र विभाग	४	१	५
१३	अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग	६	–	६
१४	जीवरसायनशास्त्र विभाग	३	१	४
१५	आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग	९	–	९
१६	फळशास्त्र	५	१	६
१७	भाजीपालाशास्त्र	३	३	६
१८	जैवतंत्रज्ञान विभाग	२	–	२
	एकूण	१७२	५६	२२८

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थी संख्या

	शासकीय	संलग्न
कृषि पदविका अभ्यासक्रम	५७५	५२४
माळी प्रशिक्षण केंद्र, गणेशखिंड, पुणे	२१	–
मान्यता प्राप्त माळी प्रशिक्षण केंद्र (एकूण - ४)	–	७२

३. संशोधन



पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्हे हे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असून ते कोकणालगतचा पश्चिम घाट, पूर्वेकडील डोंगरउताराचा उपपर्वतीय विभाग, मैदानी विभाग आणि सोलापूरपासून धुळ्यापर्यंत विखुरलेला अवर्षणप्रवण विभाग असे चार कृषि हवामान विभाग आहेत. शिवाय मध्यवर्ती पठारी विभागातील हमखास पावसाचा जळगांव जिल्हा या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतो. या दहा जिल्ह्यातील जमीन, हवामान, पीक पद्धती, पशुधन आणि शेतीशी निगडीत इतर जोडधंद्यांसंबंधीच्या समस्यांवरील कृषि हवामान विभागातील २७ संशोधन केंद्रांवर संशोधन केले जाते, या विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसराशिवाय चार विभागीय कृषि संशोधन केंद्रे, इगतपूरी, पुणे, कोल्हापूर व सोलापूर, ४ राज्यस्तरीय विषय विशेषज्ञ जळगाव-तेलबिया, पाडेगांव-ऊस, निफाड-गहू आणि सोलापूर-मृद आणि इतर १८ संशोधन केंद्रे आणि कृषि महाविद्यालये येथे राज्य शासन अनुदानित ७६ योजनेतर योजना राबविल्या जात आहेत. तसेच अखिल भारतीय समन्वीत योजनेअंतर्गत एकूण ४८ संशोधन प्रकल्प विद्यापीठात कार्यरत आहेत. शिवाय भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडून १०० टक्के अनुदान मिळणारे २ नेटवर्क संशोधन प्रकल्प व पंढरपूरी म्हैस नेटवर्क प्रकल्प, केंद्र पुरस्कृत १०० टक्के अनुदानीत ५ संशोधन प्रकल्प राबविले जात आहेत. याशिवाय स्थानिक समस्यांवर आधारीत व मुख्य संशोधन प्रकल्पांस पूरक असे एकुण २५ तदर्थ योजना, राष्ट्रीय नावीन्यपूर्ण प्रकल्प (२), विज्ञान तंत्रज्ञान विभाग (१), आंतरराष्ट्रीय परस्पर सहकार्याद्वारा (४), राष्ट्रीय हवामान बदलावर आधारित कृषि संशोधन प्रकल्प (NICRA) (६), खाजगी संस्थांच्या अर्थसहाय्यातून (२), शासकीय (१), प्रकल्प या विद्यापीठात चालू आहेत.

गेल्या ४६ वर्षात महात्मा फुले कृषि विद्यापीठाने भरीव संशोधन करुन विविध अन्नधान्ये, कडधान्ये, गळीतधान्ये या पिकांचे तसेच कापूस, ऊस, भाजीपाला, फळे, फुले आणि चारा पिकांचे अनेक वाण (२३७ पेक्षा जास्त) विकसीत केले आहेत. यापैकी अनेक वाण राज्यातच नव्हे तर राज्याबाहेरही प्रसारित करण्यात आले. मृद व जलसंधारण, विविध पिके आणि पीक लागवड पध्दती, खते आणि पाणी व्यवस्थापन, आंतरमशागत, तण,रोग आणि किडींचे एकात्मिक व्यवस्थापन, सुधारीत औजारे, हरीतगृहातील शेती, प्रक्रिया आणि विपणन याविषयी सखोल संशोधन करुन अनेक शिफारशी देण्यात आल्या. राज्यातील मर्यादित सिंचन सुविधा लक्षात घेऊन कोरडवाहू शेती तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात आला. मृद आणि जलसंधारणाच्या पध्दती, जमीन, पाऊसमान आणि हंगामानुसार पीक व्यवस्थापन, मध्य हंगाम दुरुस्ती, पडणाऱ्या पाऊस पाण्याचा अधिक कार्यक्षमतेने वापर करणाऱ्या पिकांचे सुधारित वाण आणि पीक पध्दती विकसित करणे आणि पाणलोट क्षेत्रातील पाणी आडवून त्याचा उत्पादन वाढीसाठी जास्तीत जास्त क्षमतेने वापर करणे याविषयी बहुमोल संशोधन करण्यात आले.

विद्यापीठाने जैवतंत्रज्ञान क्षेत्रात भरीव कार्य केले असून वनस्पती ऊती संवर्धन, अणुजीवशास्त्र, जैविक कीड नियंत्रण व जीवाणू खते यामध्ये जैवतंत्रज्ञानाचा वापर करण्याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

अहवाल वर्षात विद्यापीठाने विकसीत केलेले निरनिराळया ११ पिकांचे वाण व ३ कृषि औजारे प्रसारीत केले असून शेतकऱ्यांकरीता वेगवेगळया पिकांवर पीक पध्दतीवर, संरक्षण आणि प्रक्रियावर आधारित ६४ सुधारीत तंत्रज्ञानाच्या शिफारशी दिल्या.

विद्यापीठात कार्यरत विभागीय, राज्य पातळीवरील प्रमुख कृषि संशोधन केंद्रे व तपासणीसाठीची संशोधन केंद्रे

अ. क्र.	कृषि संशोधन केंद्र	मुख्य कार्य	तपासणी कार्य
	अ) पश्चिम घाट विभाग		
१.	विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपूरी, जि. नासिक	भात, कारळा, वनीय कुरण, मृद व जलसंधारण	रबी कडधान्ये, फलोद्यान, रागी, कॉफी, हळद
२.	कृषि संशोधन केंद्र, लोणावळा, जि. पुणे	भात (रोग व निदान)	-
३.	कृषि संशोधन केंद्र, महाबळेश्वर, जि. सातारा	गहू (तांबेरा रोग)	भाजीपाला

४.	कृषि संशोधन केंद्र, राधानगरी, जि.कोल्हापूर	कोरडवाहू भात	गहू, वाल
ब.	उप-पर्वतीय विभाग		
१.	विभागीय कृषि संशोधन केंद्र, कोल्हापूर	ऊस, मका, पंढरपुरी म्हैस	गवत, कोरडवाहू फळे, भाजीपाला, सोयाबीन, भुईमूग, सेंद्रीय भाजीपाला शेती
२.	विभागीय ऊस व गुळ संशोधन केंद्र, कोल्हापूर	ऊस, गूळ	ऊस आधारीत पीक पध्दती
३.	कृषि संशोधन केंद्र, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर	सेंद्रीय शेती, बासमती भात	खरीप ज्वारी, कडधान्य, मिरची व गळीत धान्य
४.	कृषि संशोधन केंद्र, कराड, जि. सातारा	एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, पिक पध्दती	कडधान्य, मका, खरीप ज्वारी, सोयाबीन, सुर्यफुल, भुईमूग
५.	कृषि संशोधन केंद्र, वडगांव मावळ, जि. पूणे	भात	भात आधारीत पीक पध्दती
क.	मैदानी प्रदेश विभाग		
१.	विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे	फळे, भाजीपाला, फुले, राजमाबीन, मसाल्याचे पदार्थ	कडधान्य, गळीत धान्य, गहू
२.	कृषि संशोधन केंद्र, डिग्रज, जि. सांगली	हळद, सोयाबीन, भुईमूग, पानवेल,खारवट जमीन सुधारणा	खरीप ज्वारी, कडधान्य, ऊस, शर्करा कंद
३.	कृषि संशोधन केंद्र, निफाड, जि. नासिक	गहू, गहू आधारीत पीक पध्दती	बाजरी, कडधान्य व तेलबिया
४.	कृषि संशोधन केंद्र, पिंपळगांव बसवंत, जि. नासिक	द्राक्षे, कांदा व लसूण	डाळिंब, भाजीपाला
ड.	अवर्षण प्रवण विभाग		
१.	विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर	कोरडवाहू शेती, सुर्यफुल, करडई व कृषि हवामान शास्त्र	रबी ज्वारी, कडधान्य, बाजरी
२.	कृषि संशोधन केंद्र, मोहोळ, जि. सोलापूर	रबी ज्वारी	कडधान्य व तेलबिया
३.	कृषि संशोधन केंद्र, जेऊर, जि. सोलापूर	सेंद्रीय शेती पध्दती	रबी ज्वारी, कडधान्य
४.	कृषि संशोधन केंद्र, पंढरपूर, जि.सोलापूर	कडधान्य व तेलबिया	कोरडवाहू फळपिके
५.	कृषि संशोधन केंद्र, चास, जि.अहमदनगर	-	बाजरी, कडधान्य (खरीप), रबी ज्वारी व कोरडवाहू शेती
६.	मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव, जि. सातारा	ऊस व ऊस आधारीत शेती आणि पीक पध्दती	शर्करा कंद
७.	मध्यवर्ती परिसर, राहुरी	ज्वारी, कडधान्य, बागायती कापूस, चारा पिके, गवत, उन्हाळी भुईमूग, फळे, भाजीपाला, पिक पध्दती, पाणी व्यवस्थापन, सेंद्रीय शेती, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, जैवतंत्रज्ञान, काढणी पश्चात तंत्रज्ञान, शेती औजारे, शेळी, मेंढी, गाय	-

८.	कृषि संशोधन केंद्र, सावळविहीर फार्म, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर	सुर्यफुल	बाजरी, कडधान्य, सोयाबीन, कापूस व गहू
९.	कृषि संशोधन केंद्र, श्रीरामपूर, जि.अ.नगर	लिंबूवर्गीय फळे	-
१०.	कृषि संशोधन केंद्र, धुळे	कोरडवाहू शेती, बाजरी, गवत	खरीप ज्वारी, कडधान्य, तेलबिया, जिरायती कापूस, कोरडवाहू फळ पिके
११.	अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, जि. पुणे	अंजीर व सिताफळ	अंजीर व सिताफळ
१२.	डाळिंब संशोधन प्रकल्प, लखमापूर ता. सटाणा जि. नासिक	डाळिंब	डाळिंब
इ.	मध्य महाराष्ट्र पठारी विभाग		
१.	तेलबिया संशोधन केंद्र, जळगांव	तेलबिया, केळी, पानवेल व जिरायती कापूस	कडधान्य, ज्वारी खरीप, सोयाबीन, सुर्यफुल

भौगोलिकदृष्टया महाराष्ट्र राज्य, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या चार विभागात विभागले आहे. हे चारही विभाग जमीन, पाऊस, हवामान आणि पर्यायाने पीकपध्दतीनुसार वेगवेगळे आहेत. वास्तविक पाहता, जमीन व कृषि हवामानानुसार राज्याचे नऊ विभाग पडतात. उत्तर कोकण, दक्षिण कोकण, पर्वतीय विभाग, उपपर्वतीय विभाग, मैदानी प्रदेश, अवर्षणप्रवण विभाग, मध्य पठारीप्रदेश, पश्चिम विदर्भ आणि पूर्व विदर्भ असे हे विभाग आहेत. या विभागांतर्गत विविध कृषि हवामान गटांचा अंतर्भाव होतो. हया कृषि हवामान विभागानुसार आणि पाट पाण्याच्या उपलब्धतेनुसार त्या त्या भागातील शेती विकसित करणे विशेषत: अल्प आणि अत्यल्प भूधारकास शेती करणे किफायतशीर ठरावे या दृष्टीने त्या त्या विभागातील नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग आणि विकास करुन कृषि संबंधी नियोजन करणे गरजेचे आहे.

शाश्वत शेती उत्पादनासाठी शेती पध्दतीमध्ये शेळी-मेंढी, कुक्कुट, मधुमक्षिका, ससे आणि मत्स्य पालन, रेशिम उद्योग इत्यादींचा अंतर्भाव करुन त्यास चालना देणे आवश्यक आहे.

अधिक उत्पादकता असलेल्या पिकांची लागवड जास्त क्षमता असलेल्या विभागात घेणे फायदेशीर आहे. उदा. ऊस लागवड - कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर, द्राक्षे -नाशिक, सांगली, पुणे, सोलापूर, फळपिके- पुणे, अहमदनगर, सांगली, सोलापूर याच भागात घेतल्यास आर्थिक मोबदला जास्त मिळू शकेल.

शेती उत्पादन वाढीमध्ये शुध्द व चांगली गुणवत्ता असणाऱ्या बियाण्याच्या वापरास अनन्य साधारण महत्व असून तो हमखास असा उपाय आहे. पिकांच्या संकरीत व सुधारीत वाणांचे बीजोत्पादन मोठया प्रमाणात घेऊन शेतकऱ्यांना रास्त दरात वितरीत करणे आवश्यक आहे.

प्रसारीत वाण : शेतपिके

१. रब्बी ज्वारी : फुले रोहिणी (आर. पी. ए. एस. ३)



फुले रोहिणी (आर. पी. ए. एस. ३) या रब्बी ज्वारीच्या वाणाची विशेषत: पापडाकरिता पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

२. रब्बी ज्वारी : फुले मधुर (आर. एस. एस. जी. व्ही. ४६)



फुले मधुर (आर. एस. एस. जी. व्ही. ४६) या रब्बी ज्वारीच्या वाणाची विशेषत: हुरड्याकरीता पश्चिम मराहाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

३. खरीप ज्वारी : फुले वसुंधरा (आर. एस. एस. एच. ५०)



फुले वसुंधरा (आर. एस. एस. एच. ५०) या गोड ज्वारीच्या संकरीत वाणाची पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

४. बाजरी : आदीशक्ती (डी. एच. बी. एच. ९०७१)



अधिक उत्पादन देणारा आणि गोसावी रोगास प्रतिकारक्षम बाजरीचा आदीशक्ती (डी. एच. बी. एच. ९०७१) हा संकरीत वाण महाराष्ट्रात बाजरी पिकविणाऱ्या क्षेत्रासाठी प्रसारीत केला आहे.

५. वरई : फुले एकादशी (केओपीएलएम ८३)



फुले एकादशी (केओपीएलएम ८३) हा वरईचा वाण महाराष्ट्रातील उपपर्वतीय व घाट विभागात लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

६. चवळी : फुले विठाई (सी. पी. ०५०४०)



चळवळीचा फुले विठाई (सी. पी. ०५०४०) हा वाण पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

७. हुलगा : फुले सकस : (एस. एच. जी. ०६२८-४)



हुलग्याच्या फुले सकस (एस. एच. जी. ०६२८-४) या वाणाची पश्चिम महाराष्ट्रतील अवर्षणप्रवण भागात हलक्या ते मध्यम जमिनीवर लागवडीसाठी प्रसारित केला आहे.

८. सुर्यफुल : फुले भास्कर (एस. एस. ०८०८)



सुर्यफुलाचा फुले भास्कर (एस. एस. ८०८) हा अधिक उत्पादन (१८.१३ क्विं./हे.) आणि तेलाचे अधिक प्रमाण (३६.२०%) असणारा वाण महाराष्ट्र राज्यातील कोरडवाहू क्षेत्रासाठी खरीप हंगामामध्ये लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

अ) प्रसारीत वाण : उद्यानविद्या पिके

१. डाळिंब : फुले अनारदाना



डाळिंबापासून अनारदाना तयार करण्यासाठी फळातील गर्द लाल रंगाचे दाणे, जास्त आम्लता (४.१८%), दाण्याचा कठिणपणा व अधिक उत्पादन (१६.०२ टन/हे.) अशी वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म असलेला डाळिंबाचा 'फुले अनारदाना' हा वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

२. अंजिर : फुले राजेवाडी (जे. डब्लू. एफ. ० ६)



मोठ्या आकाराची फले, अधिक उत्पादन आणि गराचे अधिक प्रमाण तसेच फळांचा आकर्षक गडद अंजिरी रंग या गुणधर्मामुळे फुले राजेवाडी (जे. डब्लू. एफ. - ६) हा अंजिराचा वाण सुधारीत तंत्रज्ञानासह महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

३. लेटयुस : फुले पद्मा (जी. के. एल.-२)



सॅलड पानांचे अधिक उत्पादन, आकर्षक हिरव्या रंगाची कुरकुरीत पाने आणि समृध्द पोषणमुल्ये अशी वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म असलेला फुले पद्मा (जी. के. एल. - २) हा लेट्यूस पिकाचा वाण पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारीत केला आहे.

कृषि यंत्रे औजारे प्रसारण


अ) प्रसारीत औजारे

१. विद्युत चलित फुले कडबा कुट्टी यंत्र



अल्प व मध्यम दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या १ अश्वशक्ती सिंगल फेजवर चालणाऱ्या विद्युत चलित फुले कडबा कुट्टी यंत्राची शिफारस केली आहे.

२. फुले पीव्हीसी भात लावणी चौकट



भात पिकाच्या चार सुत्री लागवड तंत्रज्ञानांतर्गत, पुनर्लागवड (१५ से. मी. x २५ सें. मी. अंतरावर) व ब्रिकेट खते वापरण्याची सुलभता (६२,५०० प्रति हेक्टर) आणि अधिक उत्पादनासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसीत १.२० मीटर x ०.४० मीटर आकाराच्या फुले पीव्हीसी भात लावणी चौकटीची शिफारस केली आहे.

३. ट्रॅक्टरचलित ऊस बांधणी यंत्र

ऊस पिकात ४ किंवा ५ फुटाची वलग लागवड तसेच २.५ x ५ फुट जोड ओळ लागवड पध्दतीत ऊसाची मोठी बांधणी करण्याकरीता वसंत दादा शुगर इन्स्टिट्युटने विकसित केलेल्या ५० अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरचलित ऊस बांधणी यंत्राची शिफारस केली आहे.

पिक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशी

नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन

१. महाराष्ट्रातील मध्यम खाल काळ्या जमिनीत केळीचे हेक्टरी ११०-१२० टन अपेक्षित उत्पादनासाठी व जमिनीचे आरोग्य टिकविण्यासाठी १० टन शेणखत प्रति हेक्टरी मात्रेबरोबर उत्पादन उद्दिष्ट समिकरणानुसार नत्र, स्फुरद आणि पालाश खतमात्रांची शिफारस केली आहे.

शेणखतासोबत अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(१०.०२ x अपेक्षित उत्पादन, टन/हे.)-(१.३४ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि./हे.)-(१.७६ x शेणखत टन/हे.)

खतामधून द्यावयाचे स्फुरद ऑक्साईड कि/हे. =
(२.०९ x अपेक्षित उत्पादन, टन/हे)-(२.९७ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि/हे.)-(१.४७ x शेणखत टन/हे.)

खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे =
(७.५२ x अपेक्षित उत्पादन, टन/हे)-(०.४९ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.)-(१.२८ x शेणखत टन/हे.)

शेणखत विरहित अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(१६.९७ x अपेक्षित उत्पादन, टन/हे.)-(२.२७ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि/हे.)

खतामधून द्यावयाचे स्फुरद आक्साईड कि/हे. =
(२.९१ x अपेक्षित उत्पादन, टन/हे)-(४३.१४ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि/हे.)

खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे. =
(१३.९७ x अपेक्षित उत्पादन, टन/हे)-(०.९१ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.)

२. महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत खरीप मका हेक्टरी ६०-७० क्विंल अपेक्षित धान्य उत्पादनासाठी १० टन शेणखत प्रति हेक्टरी मात्रेबरोबर उत्पादन उद्दिष्ट समिकरणानुसार नत्र, स्फुरद आणि पालाश खतमात्रांची शिफारस केली आहे.

शेणखतासोबत अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(३.८८ x अपेक्षित उत्पादन, कि/हे.)-(०.५६ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि./हे.)-(३.१९ x शेणखत टन/हे.)

खतामधून द्यावयाचे स्फुरद ऑक्साईड कि/हे. =
(१.९१ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(०.९९ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि/हे.)-(१.४६ x शेणखत टन/हे.)

खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे =
(२.०९ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(०.१३ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.)-(१.०८ x शेणखत टन/हे.)

शेणखत विरहित अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(४.५१ x अपेक्षित उत्पादन, कि/हे.)-(०.६५ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि/हे.)

खतामधून द्यावयाचे स्फुरद आक्साईड कि/हे. =
(१.९३ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(१.०५ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि/हे.)

खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे. =
(२.५७ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(०.१६ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.)

३. महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत झेंडू फुलांचे हेक्टरी १२०-१४० क्विंटल अपेक्षित उत्पादनासाठी १० टन शेणखत प्रति हेक्टरी मात्रेबरोबर उत्पादन उद्दिष्ट समिकरणानुसार नत्र, स्फुरद आणि पालाश खतमात्रांची शिफारस केली आहे.

शेणखतासोबत अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(१.७९ x अपेक्षित उत्पादन, कि/हे.)-(०.५४ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि./हे.)-(१.८७ x शेणखत टन/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फुरद ऑक्साईड कि/हे. =
(०.९० x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(२.२६ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि/हे.)-(३.७७ x शेणखत टन/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे =
(१.०८ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(०.१५ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.)-(१.८९ x शेणखत टन/हे.)

शेणखत विरहित अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(२.६१ x अपेक्षित उत्पादन, कि/हे.)-(०.७८ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फुरद आक्साईड कि/हे. =
(१.०६ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(२.६६ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे. =
(१.४१ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(०.२० x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.)

४. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागातील मध्यम खोल काळ्या जमिनीत कोरडवाहू रब्बी ज्वारीच्या हेक्टरी १५-१८ क्विंटल अपेक्षित धान्य व ४०-५० क्विंटल कडब्याच्या उत्पादनासाठी २.५ टन शेणखत प्रति हेक्टरी मात्रेबरोबर उत्पादन उद्दिष्ट समिकरणानुसार नत्र, स्फुरद आणि पालाश खतमात्रांची शिफारस केली आहे.

शेणखतासोबत अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(९.२७ x अपेक्षित उत्पादन, कि/हे.)-(०.२७ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि./हे.)-(४.४२ x शेणखत टन/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फुरद ऑक्साईड कि/हे. =
(४.५८ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(२.४८ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि/हे.)-(०.८९ x शेणखत टन/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे =
(४.०२ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(०.०३ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.)-(२.१५ x शेणखत टन/हे.)

शेणखत विरहित अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(१०.५५ x अपेक्षित उत्पादन, कि/हे.)-(०.३१ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फुरद आक्साईड कि/हे. =
(५.४४ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(२.९४ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे. =
(५.२४ x अपेक्षित उत्पादन, कि/हे)-(०.०४ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.)

५. महाराष्ट्राच्या उप-पर्वतीय विभागात नाचणीच्या अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी प्रति हेक्टर ५ टन शेणखत, नत्र ६० किलो आणि पालाश ३० किलो या खतमात्रेसोबत जिवाणू संवर्धनाची बिजप्रक्रिया (प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अझोस्पिरिलम ब्रासेलीस आणि ऑस्परजिलस अवामोरी) वापरण्याची शिफारस केली आहे.

६. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागातील मध्यम खोल काळ्या जमिनीची सुपिकता, अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी कोरडवाहू तूर पिकास २५ किलो स्फुरद १ टन कुजविलेल्या प्रेसमडमधून एक महिना पेरणीपूर्वी आणि २५ ग्रॅम रायझोबियम व स्फुरद विरघळविणारे जिवाणू प्रत्येकी १ किलो बियाण्यास बिजप्रक्रिया करुन हेक्टरी २५ किलो स्फुरद व २५ किलो नत्र रासायनिक खतामधून पेरणीच्यावेळी देण्याची शिफारस केली आहे.

७. महाराष्ट्रातील मैदानी प्रदेशातील मध्यम खोल काळ्या जमिनीची सुपिकता, अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी केलेल्या सोयाबीन पिकाकरीता ५ टन शेणखताबरोबर ५०:७५:४५ किलो नत्र : स्फुरद : पालाश प्रति हेक्टरी या सुधारीत खतमात्रेची शिफारस केली आहे.

८. पश्चिम महाराष्ट्र विभागात खरीप बागायती सुर्यफुलापासून अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळण्यासाठी शिफारशीत उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे. तथापि, उपलब्ध साधनसामग्रीची कमतरता असल्यास संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञानापैकी शिफारशीत खत मात्रा देणे, विरळणी आणि खुरपणी करणे व पिक संरक्षण या घटकांची शिफारस केली आहे.

९. अवर्षणप्रवण विभागात (पर्जन्य गट क्र. ३ व ४ उशिरा पाऊस झाल्यास खालीलप्रमाणे सुधारीत आपत्कालीन पीक व्यवस्थापन करण्याची शिफारस केली आहे.

पावसाचे आगमन	पेरणी करावयाची पिके
जुलैचा पहिला पंधरवडा	चाऱ्यासाठी मका (आफ्रिकन टॉल), कापूस (जेएलए ७९४),तूर (विपुला), भुईमुग (जेएल ५०१), सोयाबीन (जेएल ३३५)
जुलैचा दुसरा पंधरवडा	चाऱ्यासाठी मका (आफ्रिकन टॉल), तूर (विपुला) व एरंडी (अरुणा)
ऑगस्टचा पहिला पंधरवडा	तूर (विपुला) किंवा एरंडी (अरुणा)

१०. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण क्षेत्रामधील मध्यम खोल काळ्या जमिनीतून हळदीचे अधिक उत्पादन, निविष्ठांची बचत आणि वापर क्षमतेत वाढ तसेच आर्थिक फायद्यासाठी २५ टन शेणखत व २ टन निंबोळी पेंड हळद लागवडी अगोदर जमिनीत मिसळून गादी वाफ्यावर (९० सें. मी.) ठिबक सिंचनाखाली बाष्पोपर्णत्सर्जनाच्या ७० टक्के पाणी दिवसाआड देऊन शिफारशीत खताच्या विद्राव्य स्वरुपातील ७५ टक्के मात्रा (१५०:७५:७५ नत्र, स्फुरद आणि पालाश कि. प्रति हेक्टर) सोबत दिलेल्या तक्त्यानुसार देण्याची शिफारस केली आहे.

हळद पिकास विद्राव्य स्वरुपातील खते देण्याची अवस्था, कालावधी व प्रमाण

अ. क्र.	पिकाच्या वाढीची अवस्था	कालावधी (आठवडे)	खतांची गरज (%)			खताचीमात्रा (कि/हे.)		
			नत्र	स्फुरद	पालाश	नत्र	स्फुरद	पालाश
१.	लागवड ते उगवणी	२	१०	२०	१०	१५	१५	७.५
२.	शाखीय वाढीची अवस्था	१०	५०	३०	२०	७५	२२.५	१५
३.	कंद तयार होण्याची अवस्था	१२	२५	३०	३०	३७.५	२२.५	२२.५
४.	कंद पक्व होण्याची अवस्था	६	१५	२०	४०	२२.५	१५	३०
	एकूण खते		१००	१००	१००	१५०	७५	७५

११. महाराष्ट्रातील खोल काळ्या जमिनीत बागायती बीटी कपाशी पासून अधिक उत्पादन, आर्थिक फायदा, पाण्याची बचत, पाने लाल होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी बीटी कपाशीची लागवड ठिबक सिंचनाखाली करुन शिफारशीत नत्र खताची मात्रा (१२५ कि प्रति हे.) खालील तक्त्याप्रमाणे सहा हप्त्यांमध्ये झाडाभोवती देण्याची शिफारस केली आहे.

हप्ता क्र.	नत्र खत देण्याचा आठवडा	नत्र खत मात्रा	नत्र खताची मात्रा (कि. हे.)
१.	पहिला आठवडा	२०% लागवडी बरोबर	२५
२.	चौथा आठवडा	१६% लागवडीनंतर ३० दिवसांनी	२०
३.	सहावा आठवडा	१६% लागवडीनंतर ४५ दिवसांनी	२०
४.	आठवा आठवडा	१६% लागवडीनंतर ६० दिवसांनी	२०
५.	दहावा आठवडा	१६% लागवडीनंतर ७५ दिवसांनी	२०
६.	बारावा आठवडा	१६% लागवडीनंतर ९० दिवसांनी	२०
स्फुरद (६२.५ कि/हे.) व पालाश (६२.५ कि/हे.) शिफारशी मात्रेप्रमाणे			

१२. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागातील मध्यम खोल जमिनीत उन्हाळी भुईमुगाची लागवड ठिबक सिंचनाखाली करुन १०० टक्के बाष्पोपर्णोत्सर्जनाइतके पाणी दिवसाआड देण्याची शिफारस केली आहे.

अ. क्र.	महिने	पाण्याची गरज लि. / दिवसाआड प्रति तोटी
१.	फेब्रुवारी	२.१९
२.	मार्च	४.५८
३.	एप्रिल	७.५०
४.	मे	८.५०
५.	जून	४.४४

१३. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागातील मध्यम खोल जमिनीत उन्हाळी भुईमुगाचे अधिक उत्पादन, निविष्ठा वापर क्षमता व फायदेशीर उत्पन्न मिळविण्यासाठी शिफारशीत (२५:५०:२५ नत्र : स्फुरद : पालाश, कि/हे.) विद्राव्य स्वरुपातील खते खालील तक्त्याप्रमाणे १२ आठवड्याच्या हप्त्यामधून ठिबक सिंचनाद्वारे देण्याची शिफारस करण्यात येत आहे. त्याचबरोबर पेरणीनंतर ३०,४५ व ६० दिवसानंतर २ टक्के १७:४४ (युरिया फॉस्फेट) च्या तीन फवारण्या द्याव्यात.

तक्ता : ठिबक सिंचनातून भुईमुगास १२ हप्त्यातून अन्नद्रव्ये देण्याचे प्रमाण

लागवडी नंतरचा कालावधी (आठवडे)	नत्राचे प्रमाण		स्फुरदचे प्रमाण		पालाशचे प्रमाण	
टक्के	कि. प्रति हे.	टक्के	कि. प्रति हे.	टक्के	कि. प्रति हे.	
१-३ आठवडे	२५	६.२५	२०	१०	१०	२.५
४-७ आठवडे	३०	७.५०	३०	१५	२०	५
८-१० आठवडे	३०	७.५०	३०	१५	४०	१०
११-१२ आठवडे	१५	३.७५	२०	१०	३०	७.५
एकूण	१००	२५	१००	५०	१००	२५

१४. महाराष्ट्रातील मध्यम खोल जमिनीत खरीप मक्याचे अधिक उत्पादन, निविष्ठा वापर क्षमता व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर उत्पन्न मिळविण्यासाठी मक्याची लागवड ठिबक सिंचनाखाली करुन शिफारशीत खताच्या ८०% (९६:४८:३२ नत्र, स्फुरद, पालाश कि/हे.) विद्राव्य स्वरुपातील खते खालील तक्त्याप्रमाणे १२ आठवड्याच्या हप्त्यातून देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तक्ता : ठिबक सिंचनातून मका पिकास १२ हप्त्यातून अन्नद्रव्ये देण्याचे प्रमाण

लागवडी नंतरचा कालावधी (आठवडे)	नत्राचे प्रमाण		स्फुरदचे प्रमाण		पालाशचे प्रमाण	
	टक्के	कि. प्रति हे.	टक्के	कि. प्रति हे.	टक्के	कि. प्रति हे.
१-३ आठवडे	३०	२९	२५	१२	२५	८
४-६ आठवडे	४०	३८	३५	१७	४०	१३
७-९ आठवडे	२०	१९	२०	१०	२०	६
१०-१२ आठवडे	१०	१०	२०	९	१५	५
एकूण	१००	९६	१००	४८	१००	३२

१५. महाराष्ट्रातील मध्यम खोल जमिनीत रब्बी बटाट्याचे अधिक उत्पादन, पाण्याचा कार्यक्षम वापर व आर्थिक फायद्यासाठी बटाट्याची लागवड सरी वरंबा पध्दतीने ६० x २० सें. मी अंतरावर ठिबक सिंचनाखाली करुन, १२० सें. मी. अंतरावरील लॅटरलद्वारे १००% बाष्पोपर्णोत्सर्जनाइतके पाणी दिवसाआड देण्याची शिफारस केली आहे.

१६. मध्यम खोल जमिनीत रब्बी वांग्याचे अधिक उत्पादन, निविष्ठा वापर क्षमता तसेच आर्थिकदृष्ट्या फायदेशीर उत्पन्न मिळविण्यासाठी शिफारशीत खत मात्रा (१५०:७५:७५ किलो नत्र : स्फुरद : पालाश प्रति हेक्टर) विद्राव्य स्वरुपातील खतांमधून सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे २१ आठवड्याच्या हप्त्यामधून व १००% बाष्पोपर्णोत्सर्जनाइतके पाणी दिवसाआड ठिबकद्वारे देण्याची शिफारस केली आहे.

तक्ता : ठिबक सिंचनातून वांग्यास २१ हप्त्यातून अन्नद्रव्ये देण्याचे प्रमाण

लागवडी नंतरचा कालावधी (आठवडे)	नत्राचे प्रमाण		स्फुरदचे प्रमाण		पालाशचे प्रमाण	
	टक्के	कि. प्रति हे.	टक्के	कि. प्रति हे.	टक्के	कि. प्रति हे.
१-४ आठवडे	३०	४५.०	३०	२२.५	१०	७.५
५-७ आठवडे	१५	२२.५	३०	२२.५	२०	१५.०
८-११ आठवडे	१५	२२.५	२०	१५.०	२०	१५.०
१२-२१ आठवडे	४०	६०.०	२०	१५.०	५०	३७.५
एकूण	१००	१५०	१००	७५	१००	७५

१७. महाराष्ट्रातील हमखास पावसाच्या विभागातील मध्यम काळ्या जमिनीत उन्हाळी भुईमुगाचे अधिक उत्पादन, निविष्ठा वापर क्षमता तसेच अधिक फायद्यासाठी ५ टन शेणखत प्रति हेक्टर शिफारस मात्रेच्या १०० टक्के खते (२५:५०:०० नत्र, स्फुरद, पालाश किलो प्रति हेक्टर) विद्राव्य स्वरुपात ठिबक सिंचनातून ९ समान हप्त्यात व पीक बाष्पोपर्णात्सर्जनाच्या ८० टक्के पाणी दिवसाआड देण्याची शिफारस केली आहे.

१८. महाराष्ट्राच्या उप-पर्वतीय विभागात पेरभात शेतीमध्ये प्रभावी तणनियंत्रण व आर्थिक फायद्यासाठी पेरणीनंतर दोन ते तीन दिवसांत ६४० मि.ली. ऑक्झीफ्ल्युरोफेन २३.५ ई. सी. (०.१५० किलो क्रियाशील घटक) प्रति हेक्टर पेरणीनंतर २५ दिवसांनी मेटॅसल्फ्युरॉन मिथाईल १० टक्के + क्लोरीम्युरॉन इथाईल १० टक्के यांचे २० ग्रॅम विद्राव्य तयार मिश्रण (०.००४ किलो क्रियाशील घटक) प्रति हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारण्याची शिफारस केली आहे.

१९. महाराष्ट्राच्या उप-पर्वतीय विभागात लागवड पध्दतीच्या भात शेतीमध्ये प्रभावी तण नियंत्रण व आर्थिक फायद्यासाठी पुनर्लागवडीनंतर १५ ते २० दिवसांनी मेटॅसल्फ्युरॉन मिथाईल १० टक्के + क्लोरीम्युरॉन इथाईल १० टक्के यांचे २० ग्रॅम विद्राव्य तयार मिश्रण (०.००४ किलो क्रियाशील घटक) प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारण्याची आणि ४५ दिवसांनंतर एक खुरपणी करण्याची शिफारस केली आहे.

२०. सोयाबीन (खरीप) - कांदा (रब्बी) या पिक पध्दतीमध्ये सेंद्रिय शेतासाठी नत्र व स्फुरदयुक्त जिवाणू खताची बिजप्रक्रिया करुन हेक्टरी ५० किलो आणि कांदा पिकास १०० किलो नत्राची मात्रा प्रत्येकी १/३ नत्र अन्नद्रव्य आधारीत प्रमाणानुसार शेणखत, गांडुळखत आणि निंबोळी पेंड या सेंद्रिय खताद्वारे देण्याची शिफारस केली आहे.

१. सेंद्रिय खतांची मात्रा (पेरणी/लागवडीवेळी)

सेंद्रिय खतांची मात्रा (किलो/हेक्टर)	सोयाबीन	कांदा
शेणखत	२५००	५०००
गांडुळखत	१०००	२०००
निंबोळी पेंड	४००	८००
रायझोबियम	२५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे	-
स्फुरद विरघळणारे जिवाणू	२५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे	४ किलो २५ किलो शेणखतासोबत
ॲझेटोबॅक्टर	-	४ किलो २५ किलो शेणखतासोबत

२१. एक हेक्टर बागायती क्षेत्रातील अल्पभुधारक शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्यासाठी पिकपध्दतीकरीता ७२ टक्के, फलोत्पादनासाठी २३.६ टक्के आणि पशुपालनासाठी ४.४ टक्के याप्रमाणे घटक निहाय शेतीपध्दती प्रारुप वापरण्याची शिफारस केली आहे. या प्रारुपात पिकापासून २३ टक्के, पशुपालनापासून २७ टक्के आणि फलोत्पमादनापासून ४३ टक्के निव्वळ फायदा मिळतो. त्याचा तपशील पुढिलप्रमाणे.

क्षेत्र (हे.)	क्षेत्र(%)	हंगाम		
		खरीप	रब्बी	उन्हाळी
पिक पध्दती (७२%)				
०.३०	३०	सोयाबीन	गहू	हिरव्या पालेभाज्या
०.२०	२०	मका	कांदा	मूग
०.१०	१०	बाजरी	हरभरा	चवळी
०.१०	१०	लसूण घास	लसूण घास	लसूण घास
०.०२	२	संकरीत नेपिअर	संकरीत नेपिअर	संकरीत नेपिअर
फलोत्पादन (२३.६%)				
०.२०	२०	आंबा फळबाग : ४० झाडे (५ मी. x ४ मी.)		
०.०३६	३.६	संरक्षित शेती : प्रथम आणि तृतीय वर्ष - टोमॅटो - काकडी द्वितीय आणि चतुर्थ वर्ष - ढोबळी मिरची - काकडी		
पशुपालन (४.४%)				
०.०४४	४.४	मुक्त गोठा पध्दत - संकरीत गाई - २, गांडुळखत निर्मिती आणि कुक्कुटपालनासाठी रोड आयलन्ड रेड १०० पक्षी पाच टप्प्यांत (५०० पक्षी प्रति वर्ष)		

टिप : फळ बागेमध्ये आंबा फळबागेऐवजी डाळिंब/पेरु/केळी ही पर्यायी फळझाडे घेता येतील.

२२. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधण्यासाठी, एक हेक्टर कोरडवाहू क्षेत्रातील एकात्मिक शेतीमध्ये पिकासाठी ५० टक्के, फळबागेसाठी ४० टक्के, पशुपालनासाठी ५ टक्के आणि शेततळ्यासाठी ५ टक्के याप्रमाणे एकात्मिक शेती पध्दती प्रारुपाची शिफारस करण्यात येत आहे. या प्रारुपात पिकापासून ११ टक्के, फलोत्पादनापासून १० टक्के आणि पशुपालनापासून ७९ टक्के निव्वळ फायदा मिळतो. त्याचा तपशील पुढिलप्रमाणे.

क्षेत्र (हे.)	क्षेत्र (टक्के)	हंगाम		
		खरीप	रब्बी	उन्हाळी
पीक पध्दती (५०%)				
०.३०	३०	चवळी	ज्वारी	पड जमीन
०.१०	१०	मका चारा	ज्वारी चारा	पड जमीन
०.१०	१०	पड जमीन	हरभरा	पड जमीन
फलोत्पादन (४०%)				
०.४०	४०	कोरडवाहू फळबागमध्ये आंतरपिक (बाजरी + तूर २:१)		
पशुपालन (५%)				
०.०५	५	दुग्ध व्यवसाय - १ म्हैस पंढरपुरी, परस कोंबडी पालन - ३० पक्षी पाच टप्प्यांत प्रती वर्षी (गिरीराज), शेळी पालन - १० शेळी + १ नर (उस्मानाबादी)		
शेततळे (५%)				
०.०५	५	आकार १५ x १५ x ३ मीटर		

२३. महाराष्ट्राच्या उप-पर्वतीय विभागात मध्यम खोल जमिनीत जिरायत शेतीतून अधिक उत्पादन व फायद्यासाठी जूनमध्ये सोयाबीन किंवा भुईमुगाची जोड ओळ पध्दतीने ३०-६० x ४० सें. मी. अंतरावर पेरणी करुन जोड ओळीत तंबाखु या साखळी पिकाची ९० x ९० सें. मी अंतरावर ऑगस्टमध्ये लागवड करण्याची शिफारस केली आहे.

उद्यानविद्या

२४. हवामान बदलाच्या संदर्भात, शरद सिडलेस जातीपासून दर्जेदार फळाचे अधिक उत्पादन, रोगाचा कमी प्रादुर्भाव व जास्त आर्थिक फायद्यासाठी सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून ते आक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत ६ ते ८ डोळ्यांवर गोडी छाटणी करण्याची शिफारस केली आहे.

२५. पेरुच्या घनलागवड पध्दतीमध्ये (२२ मी. आणि ३२ मी.) पहिल्या साडेतीन वर्षानंतर, झाडांच्या योग्यवाढीसाठी आणि अधिक उत्पादनासाठी, मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात झाडाच्या मागील दोन हंगाम वाढीच्या ठिकाणी पुनर्छाटणीची शिफारस केली आहे.

२६. खरीप कांदा वाणांची बिजोत्पादन क्षमता परिणामकारक वाढविण्यासाठी, चिंगळी तंत्रज्ञानाद्वारे उत्पादित करुन अडिच महिने साठवण केलेल्या कांदा गोटाची १५ नोव्हेंबरला लागवड करुन, ६० दिवसांनी सेंद्रिय पदार्थाचे (ऊसाचे पाचट ०.५ कि.ग्रॅ/मी^{2}) आच्छादन करण्याची शिफारस केली आहे.

पशु व मत्स्य विज्ञान विभाग

२७. फुले त्रिवेणी गाईच्या पहिल्या वितातील आठवडानिहाय चाचणी दिवसाचे दूध उत्पादन निश्चितीसाठी मिक्स लॉग प्रारुपाचा ($Yt=१२.७२+(-२.४९)\ x\ t^{१/२}+२.५९\ logt+et$) वापर करण्याची शिफारस केली आहे.

मूलभूत शास्त्रे, अन्नशास्त्रे आणि तंत्रज्ञान

२८. पाण्याचा ताण सहन करण्यास उपयुक्त जैवरासायनिक विकारांची क्रियाशिलता, विजय या हरभऱ्याच्या वाणात व या वाणाचा नर वाण म्हणून वापर केलेल्या संकरात अधिक आढळल्यामुळे या वाणाचा पाण्याचा ताण सहन करणाऱ्या हरभरा पैदास कार्यक्रमात जनुकीय स्त्रोत म्हणून प्राधान्याने वापरण्याची शिफारस केली आहे.

२९. गव्हाच्या पर्ण तांबेरा रोगासाठी प्रतिकारक जुनक Lr३४ चे त्वरीत निदान करण्यासाठी गहू सुधार कार्यक्रमात cvLV३४ व cssfr५ या रेणवीय चिन्हांचा उपयोग स्वतंत्रपणे किंवा एकत्रितपणे करावा अशी शिफारस केली आहे.

३०. ऊसाच्या वाणामधील चाबूक काणी रोग प्रतिकारक्षमतेस कारणीभूत विकारांची अंगभूत व जीवाणूंच्या सान्निध्यातील क्रियाशिलता तसेच एन. के. एस. - ११ या चिन्हांकित जनुकाचा वापर ऊसाच्या चाबूक काणी रोगप्रतिकारक वाणांची निवड करण्यासाठी शिफारस केली आहे.

३१. झांथामोनास आक्झिनोपोडिस पीव्ही प्युनिकीमुळे डाळिंबावर होणाऱ्या तेल्या रोगाचे निदान लवकर व अचूक करण्यासाठी स्कार-झॅप प्रायमरचा १५२ बी. पी. (आर. पी. पी. - २) या रेणवीय चिन्हांचा एकत्रीत वापर करावा अशी शिफारस केली आहे.

३२. सोयाबीन पिकावरील तांबेरा रोग प्रतिकारक वाण निवडीसाठी एकमेकास पूरक प्रतिकारक जनुकांकरीता सॅट १९१-२२२ बी. पी. (आर. पी. पी. - १ब) व सॅट २१५-१२३ बी. पी. (आर. पी. पी. - २) या रेणवीय चिन्हांचा एकत्रीत वापर करावा अशी शिफारस केली आहे.

३३. पानातील पाण्याचे प्रमाण, हरिद्रव्याचे प्रमाण, पानातील तापमानाचा फरक, प्रकाश संश्लेषण, बाष्पोत्सर्जन, पर्णरद्यातील वहन, काढणी निर्देशांक आणि मुळांचे गुणधर्म या वनस्पती शरीरप्रक्रिया निकषांवर रब्बी ज्वारीचा आर. एस. व्ही. १०९८ हा वाण अवर्षण प्रतिकारक्षम दाता म्हणून पिक सुधारणा कार्यक्रमामध्ये वापरण्यासाठी शिफारस केली आहे.

३४. प्रयोगशाळेत वाल बियाण्यांची उगवणक्षमता तपासण्यासाठी, वाल बियाणे १२ तास ओल्या गोणपाटात ठेवल्यानंतर २ तास पाण्यात भिजवून व त्यानंतर पहिल्या इतका ओलावा (१०%) येईपर्यंत सावलीत वाळवून चार टॉवेल पेपर पध्दतीमध्ये २५० सें. ग्रे. तापमान वापरण्याची शिफारस केली आहे.

३५. डाळिंबाच्या भगवा वाणाची फळे सामान्य तापमानात (२३.३ + ४० से. ५५.६ + १४% सापेक्ष आर्द्रता) १२ दिवस, शून्य

ऊर्जेवर आधारत शीतकक्षामध्ये (१७.४५+३० से. ८७.७५ +४% सापेक्ष आर्द्रता) ३२ दिवस आणि शीतगृहामध्ये (८० से ९२.५+२.५% सापेक्ष आर्द्रता) ५२ दिवसांपर्यंत टिकविण्यासाठी फळांना २०% एस. एच. ०३ लाखयुक्त मेणाच्या आवरणाची पूर्व प्रक्रिया करण्याची शिफारस केली आहे.

३६. पेरुची बर्फी तयार करण्यासाठी खाली नमूद केलेल्या पध्दतीची शिफारस केली आहे.

अ) सामान्य उपयोगासाठी

पेरुचा गर १ किलो, ५५० ग्रॅम साखर, ५० ग्रॅम बेसन पीठ, ५० ग्रॅम गाईचे तूप, ५० ग्रॅम दुधाची भुकटी, ५ ग्रॅम मीठ, २ ग्रॅम सायट्रीक आम्ल आणि १ टक्का पेक्टीन हे मिश्रण एकूण विद्राव्य घटक ८२° ब्रिक्स येईपर्यंत उष्णता देण्याची प्रक्रिया करावी.

ब) उपवासासाठी

पेरुचा गर १ किलो, ५५० ग्रॅम साखर, ५० ग्रॅम शिंगाडा पीठ, १० ग्रॅम गाईचे तूप, ५० ग्रॅम दुधाची भुकटी, ५ ग्रॅम मीठ, २ ग्रॅम सायट्रीक आम्ल आणि १ टक्का पेक्टीन हे मिश्रण एकूण विद्राव्य घटक ८२० ब्रिक्स येईपर्यंत उष्णता देण्याची प्रक्रिया करावी.

पीक संरक्षण

३७. ऊसाच्या दर्जेदार बेण्याचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी आणि २५% नत्र आणि २५% स्फुरद या अन्नद्रव्यांच्या बचतीसाठी खालीलप्रमाणे जैविक खत वापराची शिफारस केली आहे.

* बेणेमळा लागवडीपूर्वी ऊसाचे बेणे हेक्टरी १० किलो असेटोबॅक्टर + १.२५ किलो स्फुरद विरघळविणारे जीवाणू १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवावे अथवा मागील वर्षी असेटोबॅक्टरची बेणेप्रक्रिया करुन लागवड केलेल्या ऊसाचे बेणे वापरावे.
* या बेणे मळ्यास हेक्टरी २० टन शेणखत ४५० किलो नत्र, १७२ स्फुरद आणि ११५ किलो पालाश या अन्नद्रव्यांचा वापर करावा.

३८. सुरु ऊसाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी आणि जमिनीची सुपिकता टिकविण्यासाठी तसेच ५०% नत्र आणि २५% स्फुरद या अन्नद्रव्यांच्या बचतीसाठी खालीलप्रमाणे जैविक खत वापराची शिफारस केली आहे.

* लागवडीपूर्वी ऊसाचे बेणे हेक्टरी १० किलो असेटोबॅक्टर अथवा १ लिटर द्रवरुप असेटोबॅक्टर + १.२५ किलो स्फुरद विरघळविणारे जीवाणू १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवावे. किंवा
* लागवडीपूर्वी बेणेप्रक्रिया केली नसेल तर लागवडीनंतर ६० दिवसांनी हेक्टरी १ लिटर द्रवरुप असेटोबॅक्टर जीवाणूची ५०० लिटर पाण्यात मिसळून सकाळच्या वेळेस फवारणी करावी आणि १.२५ किलो स्फुरद विरघळविणारे जीवाणू १०० किलो कंपोस्ट खतात मिसळून सरीमधून द्यावे.
* या ऊसासाठी हेक्टरी २० टन शेणखत, १२५ किलो नत्र, ८६ किलो स्फुरद आणि ११५ किलो पालाश या अन्नद्रव्यांचा वापर करावा.

३९. द्राक्षावरील केवडा, भुरी व करपा रोगाचे प्रभावी व्यवस्थापन व अधिक उत्पादनासाठी बागांची फळछाटणी सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवडा व ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी अशी शिफारस केली आहे.

४०. कपाशीवरील रस शोषणाऱ्या किडींच्या (मावा, तुडतुडे, फुलकिडे व पांढरीमाशी) नियंत्रणासाठी ब्युप्रोफेजिन २५% एससी २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आर्थिक नुकसान पातळीनुसार १५ दिवसाच्या अंतराने दोन ते तीन फवारण्या करण्याची शिफारस केली आहे.

४१. बिगर बीटी कपाशीवरील रस शोषणाऱ्या किडी व बोंडअळ्यांच्या नियंत्रणासाठी संयुक्त किटकनाशकाची (क्लोरपायरीफॉस ५०%+सायपरमेथ्रिन ५% ईसी) किंवा (सायपरमेथ्रिन ३%+क्विनॉलफॉस २०% ईसी) २० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून किडीच्या आर्थिक नुकसान पातळीनुसार पंधरा दिवसाच्या अंतराने तीन फवारण्या करण्याची शिफारस केली आहे.

४२. वांग्यावरील शेंडे व फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी संयुक्त किटकनाशक डेल्टामेथ्रीन १%+ट्रायझोफॉस ३५% ईसी २० मि. ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फुले लागणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने गरजेनुसार फवारण्या करण्याची शिफारस केली आहे.

कृषि अभियांत्रिकी

४३. पावसाच्या वाहणाऱ्या पाण्याचे (अपधाव) आकारमान व तीव्रता अनुमानीत करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या 'फुले रन ऑफ इस्टीमेटर' या संगणकीय प्रणालीची शिफारस केली आहे.

४४. रब्बी ज्वारीच्या मुळांच्या अभ्यासासाठी १० मी. लांबी, २ मी. रुंदी व १.० मी. उंची असलेली 'फुले रुट बॉक्स स्ट्रक्चरची' शिफारस केली आहे.

४५. नाशिक जिल्ह्यातील तालुकानिहाय भूपृष्ठीय निचरा प्रणालीचे आरेखन करण्याकरीता महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीने विकसीत केलेल्या निचरा गुणांकाचा वापर करण्याची शिफारस केली आहे. याला पर्याय म्हणून भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय. एस.) मध्ये विकसीत केलेले नकाशे वापरण्याची शिफारस केली आहे.

४६. सातारा जिल्ह्यातील तालुकानिहाय भूपृष्ठीय निचरा प्रणालीचे आरेखन करण्याकरीता महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीने विकसीत केलेले नकाशे वापरण्याची शिफारस केली आहे.

४७. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागातील मध्यम खोल जमिनीत पाण्याची कमी उपलब्धता असतांना रब्बी कांद्याचे उत्तम प्रतीचे

अधिकतम उत्पादन घेण्यासाठी पुनर्लागवडीनंतर ५१ ते ७५ दिवसांच्या कालावधीत (गोट वाढीची सुरुवातीची अवस्था) सिंचनाच्या नियमिक गरजेपेक्षा २० टक्के कमी पाणी देण्याची शिफारस केली आहे.

४८. कांदा पिकाची पाण्याची गरज निश्चित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या पीक गुणांकाचा वापर करण्याची शिफारस केली आहे.

पेरणीनंतरचा आठवडा	पीक गुणांक
१	०.६३
२	०.६९
३	०.७३
४	०.७९
५	०.८५
६	०.९२
७	१.००
८	१.०८
९	१.१५
१०	१.२०
११	१.२३
१२	१.२१
१३	१.१४
१४	१.०१
१५	०.८१
१६	०.५४

वरील तक्त्याला पर्याय म्हणून खालील सुत्राची शिफारस करण्यात येते.

$$\text{पीक गुणांक} = -८.०४२ \left[\frac{ट}{ठ}\right]^{५} -२४.३१ \left[\frac{ट}{ठ}\right]^{४} +२०.१५$$

$$\left[\frac{ट}{ठ}\right]^{३} -५.७६९ \left[\frac{ट}{ठ}\right]^{२} +१.४९८ \left[\frac{ट}{ठ}\right] +०.५६१$$

ट – दिवस

ठ – पीक कालावधी

४९. पाण्याची कमतरता असतांना रब्बी हंगामात वेगवेगळ्या सिंचन नितीअंतर्गत कांद्याचे अपेक्षित उत्पादन अंदाजित करण्यासाठी खालील उत्पादन प्रतिसाद गुणांकांची शिफारस केली आहे.

१) हंगामी उत्पादन प्रतिसाद गुणांक (Ky) (डुरेन्बास आणि कासम सुत्रासाठी) = १.५९

२) पीक वाढीच्या अवस्थेनुसार उत्पादन प्रतिसाद गुणांक (स्टेवार्ट सुत्रासाठी)

शाकीय अवस्था (Ky1) (१-५० दिवस) = ०.६५४

कांदा वाढीची सुरुवातीची अवस्था (Ky2) (५१-७५ दिवस) = ०.५४२

कांदा पोसण्याची अवस्था *Ky3) (७६-१०० दिवस) = ०.३०५

५०. विविध पिकांच्या अपेक्षित उत्पादन व उत्पन्न यावर आधारित कार्यक्षम पाणी व्यवस्थापनासाठी निर्णय घेण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेली 'फुले डीएसएस-आयडब्लूएम' संगणक प्रणाली वापरण्याची शिफारस केली आहे.

५१. मधुमका पिकाची पाण्याची गरज निश्चित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या 'पीक गुणांकाचा' वापर करण्याची शिफारस केली आहे.

पेरणीनंतरचा आठवडा	पीक गुणांक
१	०.६१
२	०.५८
३	०.६३
४	०.७१
५	०.८०
६	०.८७
७	०.९१
८	०.९१
९	०.८९
१०	०.८३
११	०.७७
१२	०.७०
१३	०.६३
१४	०.६०
१५	०.५९

वरील तक्त्याला पर्याय म्हणून खालील सुत्राची शिफारस करण्यात येते.

$$\text{पीक गुणांक} = -८.५२३ \left[\frac{ट}{ठ}\right]^{५} +३१.२१ \left[\frac{ट}{ठ}\right]^{४} -३८.३९$$

$$\left[\frac{ट}{ठ}\right]^{३} +१७.८२ \left[\frac{ट}{ठ}\right]^{२} -२.१७४ \left[\frac{ट}{ठ}\right] +०.६५९$$

ट – दिवस

ठ – पीक कालावधी

५२. शेडनेटगृहामध्ये कांद्याच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होत असल्याने शेडनेटगृहात कांदा लागवड न करण्याबद्दल शिफारस केली आहे.

५३. कूपनलिकेच्या पुनर्भरणासाठी अधिक गाळण कार्यक्षमता मिळविण्यासाठी खालीलप्रमाणे चार थरांच्या गाळण यंत्रेणेची शिफारस केली आहे.

चार थरांची गाळण यंत्रणा

थर क्रमांक	थरांची जाडी (से.मी.)	साहित्य व आकारमान (मि.मी.)
१	२५	विटांचे तुकडे (२४ ते २८)
२	२५	बारीक वाळू (०.६ ते २.००)
३	२५	खडी (९.५ ते १५.५)
४	२५	दगडगोटे (२० ते २४)

५४. महाराष्ट्राच्या मैदानी प्रदेशातील मध्यम काळ्या जमिनीमध्ये हळदीच्या अधिक उत्पादनासाठी आणि पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी हळदीची लागवड ७५ सें. मी. रुंद सरी वरंब्याच्या दोन्ही बाजूस ३७.५ x ३० सें. मी. अंतरावरुन ठिबक सिंचनाद्वारे दिवसाआड बाष्पीभवनाच्या ४०% पाणी देण्याची शिफारस केली आहे.

५५. महाराष्ट्राच्या मैदानी प्रदेशातील मध्यम काळ्या जमिनीमध्ये हळदीच्या अधिक उत्पादसासाठी शिफारशीत खतमात्रेच्या ७५% मात्रा (१५०:७५:७५ अनुक्रमे नत्र, स्फुरद आणि पालाश किला/हेक्टर) विद्राव्य खताद्वारे ठिबक सिंचन पध्दतीतून खालील तक्त्याप्रमाणे देण्याची शिफारस केली आहे.

पीक वाढीच्या अवस्था	हळद लागवडी पासूनचा कालावधी	अन्नद्रव्यांची मात्रा (किलो/हेक्टर)			अन्नद्रव्यांची मात्रा (किलो/आठवडा)		
लागवड ते उगवण अवस्था	३ ते ४ आठवडे (२ समान हप्ते)	१५	१५	७.५	७.५००	७.५००	३.७५०
शाखीय वाढ	५ ते १४ आठवडे (१० समान हप्ते)	७५	२२.५	१५	७.५००	२.२५०	१.५००
कंद वाढीची सुरुवात	१५ ते २६ आठवडे (१२ समान हप्ते)	३७.५	३७.५	२२.५	३.१२५	३.१२५	१.८७५
कंद तयार होण्याची अवस्था	२७ ते ३२ आठवडे (६ समान हप्ते)	२२.५	१५	३०	३.७५०	२.५००	५.००
एकूण	३० आठवडे	१५०	७५	७५			

सामाजिक शास्त्रे

५६. ऊसातील एकात्मीक अन्नद्रव्य व्यवस्थापन तंत्रज्ञानाच्या अभ्यासामध्ये असे आढळून आले की, ऊस पिकात सिलीकॉन, संयुक्त जीवाणू खते, स्फुरद विरघळविणारे जीवाणू, युरियामध्ये निंबोळी पेंड, सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि पाचट कुजविणारे जीवाणू यांच्या वापराबाबत शेतकऱ्यांचे ज्ञान व अवलंबन अति अल्प आहे. त्याकरीता राज्याच्या कृषि विभागाने साखर कारखान्यांच्या सहकार्याने ऊस उत्पादकांची ज्ञान पातळी वाढविण्यासाठी छापील व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मोहिमा आयोजित कराव्यात. तसेच, अवलंबन पातळी वाढविण्यासाठी प्रशिक्षणे व कृति प्रात्याक्षिके आयोजित करावीत अशी शिफारस केली आहे.

५७. डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांमध्ये विद्यापीठ शिफारशीत तेलकट डागरोग (बॅक्टेरियल ब्लाईट) नियंत्रण तंत्रज्ञानातील रोपवाटीका व्यवस्थापन, भौतिक, रासायनिक आणि जैविक पीक संरक्षण व तेलकट डागरोग (बॅक्टेरियल ब्लाईट) ग्रस्त बागेचे पुनरुज्जीवन या घटकांसंबंधाचे अवलंबन वाढविण्याच्या दृष्टीने शासनाच्या कृषि विभागाने, कृषि विज्ञान केंद्राच्या व कृषि विद्यापीठांच्या विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्र यांच्या सहकार्याने जनजागृती व प्रबोधन करण्याची शिफारस केली आहे.

५८. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने राबविलेल्या हुमणीच्या मेटारायझमद्वारा जैविक नियंत्रण तंत्रज्ञानाचे अवलंबन वाढविण्यासाठी कृषि विभागाने कृषि विद्यापीठाच्या समन्वयाने सामुहिक प्रात्यक्षिके मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्याची तसेच मेटारायझमची उपलब्धता गावपातळीवर करुन देण्याची शिफारस केली आहे.

५९. शेतकऱ्यांच्या सहभागातून कृति संशोधन प्रकल्पांतर्गत पश्चिम महाराष्टातील ऊसासाठी ठिबक सिंचनाचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनात २५% वाढ, ७०% पाण्याची बचत, ३५% उत्पन्नात वाढ झाल्याचे आढळून आले. त्यामुळे ऊसामध्ये ठिबक सिंचनाचा अवलंब वाढविण्यासाठी शेतकऱ्यांच्या सहभागातून कृति संशोधन प्रकल्प यावेत अशी शिफारस केली आहे.

६०. भुईमुग पिकाच्या उत्पादनात कमीवर मध्यम व मध्यमवर उच्च या दोन अवलंबन गटांमध्ये आढळून आलेली अनुक्रमे ४८ व ७७ टक्क्यांची वाढ आणि उत्पादन खर्चामध्ये झालेली १९ व ३० टक्क्यांची कपात ही शेतकऱ्यांनी विद्यापीठाने शिफारशीत केलेल्या तंत्रज्ञानाच्या अवलंबनामुळे झाली आहे. अशाप्रकारे खरीप भुईमुग पिकासाठी शेणखत, बीजप्रक्रिया, कोळपणी व पीक संरक्षण या तंत्रज्ञानाचा परिपूर्ण अवलंब करावा अशी शिफारस केली आहे.

६१. करडई पिकाच्या उत्पादनात कमीवर मध्यम व मध्यमवर उच्च या अवलंबन गटांमध्ये आढळून आलेली अनुक्रमे ३२ व ५४ टक्क्यांची वाढ आणि उत्पादन खर्चामध्ये झालेली १२ व २४ टक्क्यांची कपात ही शेतकऱ्यांनी विद्यापीठाने शिफारशीत केलेल्या तंत्रज्ञानाच्या अवलंबनामुळे झाली आहे. अशाप्रकारे करडई पिकासाठी शेणखत, पेरणीची वेळ, बीजप्रक्रिया, पालाशयुक्त खते आणि पीक संरक्षण या तंत्रज्ञानाचा परिपूर्ण अवलंब करावा, अशी शिफारस केली आहे.

६२. सूर्यफुल पिकाच्या उत्पादनात कमीवर मध्यम व मध्यमवर उच्च या अवलंबन गटांमध्ये आढळून आलेली अनुक्रमे ३७ व ५० टक्क्यांची वाढ आणि उत्पादन खर्चामध्ये झालेली १४ व २० टक्क्यांची कपात ही शेतकऱ्यांनी विद्यापीठाने शिफारशीत केलेल्या तंत्रज्ञानाच्या अवलंबनामुळे झाली आहे. अशाप्रकारे सूर्यफुल पिकासाठी उत्पादनामधील वाढ आणि खर्चाच्या कपातीसाठी, शेतकऱ्यांनी सूर्यफुल पिकासाठी शेणखत, पेरणीची वेळ, खुरपणी, कोळपणी, स्फुरदयुक्त खते आणि पीक संरक्षण या तंत्रज्ञानाचा परिपूर्ण अवलंब करावा अशी शिफारस केली आहे.

६३. सोयाबीन पिकाच्या उत्पादनात कमीवर मध्यम व मध्यमवर उच्च या अवलंबन गटांमध्ये आढळून आलेली अनुक्रमे ३१ व ४९ टक्क्यांची वाढ आणि उत्पादन खर्चामध्ये झालेली १० व २१ टक्क्यांची कपात ही शेतकऱ्यांनी विद्यापीठाने शिफारशीत केलेल्या तंत्रज्ञानाच्या अवलंबनामुळे झाली आहे. अशाप्रकारे सोयाबीन पिकासाठी उत्पादनामधील वाढ आणि खर्चाच्या कपातीसाठी, शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकासाठी कुळवणी, शेणखत, पेरणीची वेळ, कोळपणी, ओळीतील अंतर, स्फुरदयुक्त खते आणि पीक संरक्षण या तंत्रज्ञानाचा परिपूर्ण अवलंब करावा अशी शिफारस केली आहे.

६४. पाथ विश्लेषणानुसार, कांदा बिजोत्पादन वाढीसाठी, रासायनिक खतांतील अन्नद्रव्यांची उपयुक्तता वाढविण्यासाठी, जमिनीचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी व पिकाद्वारे अन्नद्रस्यांची होणारी उचल कमी करण्यासाठी मध्यम खोल काळ्या जमिनीत माती परिक्षण आधारीत अपेक्षित उत्पादन समीकरणानुसार शेणखतासहीत खतमात्रा देण्याची शिफारस केली आहे.

बियाणे उत्पादन आढावा (२०१४-१५)

अ) बियाणे उत्पादन क्विंटल

वर्ष	बियाणे प्रकार	तृणधान्य	कडधान्य	तेलबिया	तंतुमय पिके	चारापिके	हिरवळीचे पिके	एकूण
२०१४-१५	मुलभूत	६७७.२६	६८९.४२	१३२२.७८	२.३३	८४.२२		२७७६.०१
प्रक्रिया पुर्व	पायाभूत	२०३३.०	२०७.३७	४३०.६०				२६७१.०१
	प्रमाणित/सत्यप्रत	२६९९.५९	१८१८.३१	७२२.२१	११.२०	५२.६८	४.००	५३०७.९९
	एकूण	५७०९.८९	२७१५.१०	२४७५.५९	१३.५३	१३६.९०	४.००	१०७५५.०१

ब) कलमे रोपे व भाजीपाला बियाणे उत्पादन

वर्ष	फळांची कलमे/ रोपे (संख्या)	शोभेची रोपे (संख्या)	एकूण	भाजीपाला बियाणे (क्विंटल)		
				मुलभूत	सत्यप्रत	एकूण (क्विंटल)
२०१४-१५	१२२९००८	३५२००	१२६४२०८	५.७४	१८१.०९	१८६.८३

क) जैविक खते, किडनाशके जैविक खते

तपशिल	लिटर	क्विंटल
जैविक कीडनाशके	३५०	१६५.५०
जैविक खते	३१६०.५०	६०४.९७

४. विस्तार शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या कार्यक्षेत्रात पश्चिम महाराष्ट्रातील १० जिल्हयांचा समावेश होतो. यामध्ये अहमदनगर, पुणे, सोलापुर, सातारा, कोल्हापुर, सांगली, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार हे जिल्हे येतात. विद्यापीठाची कृषि शिक्षण,कृषि संशोधन आणि कृषि विस्तार शिक्षण ही प्रमुख तीन उद्दिष्ट्ये आहेत.

कृषि विद्यापीठामध्ये विकसीत झालेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यापर्यंत परिणामकारकरित्या पोहचविण्यासाठी विस्तार शिक्षण संचालनालयाची स्थापना १९८१ साली करण्यात आले. विद्यापीठात विकसीत झालेल्या कृषि तंत्रज्ञानाच्या विस्ताराची जबाबदारी ही शासनाच्या कृषि खात्याकडे आहे. कृषि विद्यापीठाकडे विस्तार शिक्षणाचा महत्वाचा भाग असुन त्याद्वारे विस्तार कार्यकर्ते, ग्राम विस्तारक, विषय विशेषज्ञ, विविध खात्यातील अधिकारी, शेतकरी आणि शेतकरी महिला यांना प्रशिक्षण दिले जाते. प्रसार माध्यमे, लिखित साहित्य, विविध संपर्क पद्धतीद्वारे प्रशिक्षित करुन त्यांना कृषि विषयक माहिती दिली जाते.

सद्यस्थितीत विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे खालील उद्दिष्टे ठेवून कार्यक्रम राबविले जातात

- विविध कृषि हवामान परिस्थितीत शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी अल्प व दिर्घ मुदतीचे व्यवसायभिमुख प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे
- अत्याधुनिक कृषि तंत्रज्ञानाचे आद्यरेखा प्रात्यक्षिकाद्वारे चाचणी करुन व्यापक क्षेत्रावर तंत्राचा प्रसार करणे.
- विविध विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना कृषि तंत्रज्ञानाबद्दल माहिती उपलब्ध करणे.
- सुधारीत तंत्रज्ञानाचा लाभ आणि त्यापासुन मिळणारे फायदे कृति/परिणाम प्रात्यक्षिकांद्वारे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष समजावून सांगणे
- स्थानिक पातळीवर प्रश्न, संशोधन शिफारशींच्या आधारे सोडविणे आणि संशोधन बळकटीकरण करण्यासाठी प्रत्याभरण करणे. या व्यतिरिक्त विस्तार संचालनालयामार्फत खालील उपक्रम राबविले जातात.
- विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांचे संयोजन व समन्वय साधणे.
- प्रसारण केंद्र, विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्रे आणि कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र यामध्ये समन्वय साधने.
- प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
- शेतकरी मेळावे, कृषि प्रदर्शने आयोजन करणे.
- महात्मा फुले कृषि विद्यापीठात विस्तार शिक्षणाचे कार्य

१) कृषि विज्ञान केंद्र

कृषि विद्यापीठाचे चार कृषि विज्ञान केंद्रे आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत धुळे जिल्ह्यासाठी मे १९८३ मध्ये कृषि विज्ञान केंद्राची स्थापना करण्यात आली. यानंतर सन २०११-१२ ला कृषि विज्ञान केंद्रे मोहोळ (सोलापुर),बोरगाव (सातारा)आणि ममूराबाद फार्म (जळगाव) यांची स्थापना महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत करण्यात आली. या केंद्राची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१. शेतकरी, शेतकरी महिला, ग्रामीण तरुण आणि विस्तार कार्यकर्ते यांच्यासाठी त्यांच्या गरजेवर आधारीत कृषि क्षेत्रात व त्यांच्याशी संबंधीत उद्योगावर प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.

२. जिल्ह्यामधील महत्वाच्या पिकांच्या उत्पादन तंत्रज्ञानावर आद्यरेखा प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर आयोजित करणे.

३. स्थानिक विशेष अडचणीवर आधारीत कृषि क्षेत्रातील चाचणी प्रयोग आयोजित करणे.

४. कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध विस्तार कार्यक्रमांचे आयोजन करणे.

५. इतर जिल्ह्यातील खाजगी कृषि विज्ञान केंद्रांना सुध्दा प्रशिक्षण, मार्गदर्शन व त्यांचा आढावा घेण्यात येतो.

२) कृषि महाविद्यालय विस्तार गट

कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषि विस्तार विषयाचे प्रात्यक्षीकाद्वारे प्रशिक्षण देण्यासाठी कृषि महाविद्यालय पुणे,धुळे,कोल्हापूर यांना प्रत्येकी ६० ते १०० खेड्यांचा एक विस्तार गट जोडलेला आहे. या विस्तार गटाचा उपयोग विस्तार शिक्षणाची प्रयोगशाळा म्हणून करण्यात येतो. विद्यापीठात विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत या विस्तार गटामार्फत पोहचविले जाते. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना क्लिष्ट वाटते का आणि त्याची उपयुक्तता याची पडताळणी या गटामार्फत केली जाते. या गटातील अधिकारी शेतकऱ्यांना वेळोवेळी भेट देतात व शेतीच्या विविध समस्यांवर मार्गदर्शन करतात. या गटात विस्तार कार्यक्रमाचे नियोजन व अमलबजावणी विस्तार प्रशिक्षण अधिकारी, कृषि पर्यवेक्षक यांचे समवेत कृषि सहाय्यकांच्या मदतीने करतात. विस्तार गटातील कार्यामुळे या शेतकऱ्यांच्या सामाजिक व अर्थिक परिस्थितीत काही बदल झाला आहे काय? याचाही अभ्यास केला जातो. विस्तार गटातील विविध कार्यक्रमाचे नियोजन व त्याची अमलबजावणी महाविद्यालयाचे विस्तार शिक्षण विभागातर्फे केली जाते.

३) विभागीय विस्तार शिक्षण केंद्रे/जिल्हा विस्तार केंद्रे

आधुनिक तंत्रज्ञानाची चाचणी घेण्यासाठी व ती ताबडतोब शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठाचे कृषि महाविद्यालयामध्ये विभागीय विस्तार केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत. कृषि महाविद्यालय, पुणे, धुळे, कोल्हापूर आणि मध्यवर्ती परिसर राहुरी येथे ही केंद्रे कार्यन्वीत आहेत. कृषि विद्या, उद्यान विद्या, पशुविज्ञान व पीक संरक्षण या चार विषयांचे विशेषज्ञ या

विस्तार केंद्रामध्ये असतात. या केंद्राचे प्रमुख विस्तार कृषि विद्या वेत्ता असून ते संचालक विस्तार शिक्षण यांच्या तांत्रीक नियंत्रणाखाली काम करत असतात. या व्यतिरिक्त विस्तार शिक्षण कार्यक्रम अधिक परिणामकारक करण्यासाठी या विद्यापीठाने जळगाव,पाडेगांव(सातारा), सोलापूर, डिग्रज (सांगली)आणि निफाड (नाशिक) येथे पाच जिल्हा विस्तार केंद्रे स्थापन केलेली आहेत.

या केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे

१. सद्यस्थितीला अस्तित्वात असलेल्या कृषि कर्मचाऱ्यांची ज्ञान पातळी उंचविण्यासाठी अल्पमुदतीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.

२. शेतकऱ्यांचे शेती विषयक प्रश्न सोडविण्यासाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजीत करणे.

३. संशोधन निष्कर्षाच्या प्रत्याभरणाकरीता शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यामध्ये सुसंवाद घडुन आणने.

४. शेतकऱ्यांचे दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी तालुकानिहाय मासिक सभा अयोजित करणे.

५. कृषि संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

आधुनिक कृषि तंत्रज्ञान त्यांच्या कार्यक्षेत्रात पोहचविण्याचे काम त्या विभागातील संबधित विस्तार केंद्रांचे आणि जिल्हा विस्तार केंद्रांचे कर्मचारी करतात यामध्ये मासिक जिल्हा चर्चासत्र , पंधरवाडा प्रशिक्षण, शेतकऱ्यांच्या शेतावर प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे आणि तांत्रिक मार्गदर्शन यांचा समावेश असतो.

या विभागीय विस्तार व जिल्हा विस्तार केंद्रांचे काम परिणामकारक होण्यासाठी आणि विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठाने या प्रत्येक केंद्रास एक वाहन (फिरते चिकित्सालय) दिले आहे. या फिरत्या चिकित्सालयामध्ये माती आणि पाणी पृथ:करण, रोगांचे निदान किडी आणि रोग या विषयावर शेतकऱ्यांना त्याच ठिकाणी माहिती देण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहे. या फिरत्या चिकित्सालयाचा कार्यक्रम भेट देण्याच्या आगोदर शेतकऱ्यांना प्रसार माध्यमाद्वारे कळविला जातो. आणि त्यानुसार शेतकऱ्यांचे प्रश्न त्याच ठिकाणी सोडविले जातात.

४) प्रसारण केंद्र

कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे वित्तीय पुरवठ्याने १९८२ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठात प्रसारण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. तथापी कृषि अनुसंधान परिषदेचा वित्तीय पुरवठा बंद झाल्यानंतर विद्यापीठाने स्वखर्चाने हे केंद्र चालविली आहे. तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी, प्रसार माध्यमांचा परिणामकारक वापर करण्यासाठी हे केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. हे केंद्र विविध लिखित साहित्ये उदा. घडिपत्रिका, बुलेटींन, कृषिदर्शनी, कृषिवार्ता, श्रीसुगी हे शेतकऱ्यांसाठी आणि विस्तार कार्यकर्त्यांसाठी तयार करुन विक्री करीत असतात. विद्यापीठातील कृषि विषयक कार्यक्रम व घटना यांना विद्यापीठाच्या वार्तापत्रात सातत्याने प्रसिद्धी दिली जाते. शेतीविषयक माहिती संकलन करुन ती दुरदर्शन तसेच आकाशवाणीच्या विविध केंद्रावर, नभोवाणी आणि शेतीशाळा या कार्यक्रमातुन प्रसारीत केली जाते.

५) कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, राहुरी

कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र हे कृषि विद्यापीठातील संशोधनाबद्दल एकाच ठिकाणी माहिती मिळण्याचे एकमेव ठिकाण आहे. हे केंद्र ऑगस्ट २००१ मध्ये सुरु झालेले आहे. संशोधन संस्था व शेतकरी यांच्यामधील दरी कमी करुन कृषि सेवा सल्ला देणे हा या केंद्राचा प्रमुख उद्देश आहे.

१. कृषि माहिती व तंत्रज्ञान मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना सबळ करणे.

२. संशोधन विभाग/गट आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करणाऱ्यांमध्ये सशक्त समन्वय तयार करणे.

३. शेतकऱ्यांना निर्णय घेण्यासाठी आणि त्यांच्या कृषि विषयक समस्या सोडविण्यासाठी योग्य मार्गदर्शन/मदत करणे.

४. प्रत्याभरण यंत्रणा/सक्षक्तिकरण करण्यास चालना देणे.

५. पीक आणि पशुविकास आणि उत्पानातील दरी भरुन काढणे.

६. विक्री व सेवा यांच्या साह्याने आर्थीक फायदा मिळवीणे.

७. शेतकरी मेळावे,शिवार फेरी आणि कृषि प्रदर्शनाद्वारे शेतकऱ्यांपर्यत कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.

कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे नियंत्रण व्यवस्थापक करतात. कृषि विज्ञान, पीक संरक्षण, पशुविज्ञान, उद्यानविद्या व मृदशास्त्र या पाच विषयांचे विशेषज्ञ त्यांना मदत करतात. जनसंपर्क अधिकारी शेतकऱ्यांशी हितगुज साधण्याचे कामी त्यांना सहाय्य करतात.

दूरभाष्य सेवा, किसान कॉल सेंटर (१८००-१८०-१५५१) वेबसाईड हे नवीन उपक्रम केंद्रामार्फत राबविले जातात.

६) शास्त्रज्ञ, प्राध्यापक यांचा विस्तार कार्यक्रमात सहभाग

विद्यापीठातील शास्त्रज्ञ व प्राध्यापक वेळोवेळी स्वतः अथवा गटाने निरनिराळया विषयांवर विस्तार कार्यक्रमात सहभागी होतात. शेती प्रात्यक्षिके,शेतकऱ्यांच्या शेतावरील भेटी, प्रायोगिक शेती प्रयोगास भेटी,गटचर्चा, शेतकरी मेळावे,कृषि प्रदर्शने , शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे,शेतीविषयक मासिकातून लेख, वर्तमानपत्रातून लेख,रेडियो व दूरदर्शन या कार्यक्रमातून शेतकऱ्यांसाठी उपयुक्त माहिती दिली जाते.

७) विभागीय कृषि संशोधन आणि विस्तार सल्लागार समिती

या समिती मध्ये महत्वाचे संशोधन निष्कर्ष व आधुनिक तत्रंज्ञानाबदद्ल शिफारशी शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी चर्चा केली जाते. ही समिती शेतकऱ्यांच्या गरजेनुसार व प्रत्याभरणानुसार संशोधन आराखडा तयार करत असते.

८) इतर खात्याशी समन्वय

कृषि विस्तार विद्यावेत्ता यांनी आयोजित केलेल्या जिल्हा मासिक चर्चासत्र आणि प्रक्षेत्रभेट यात विद्यापीठ शास्त्रज्ञांचा सहभाग असतो. राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प आणि कृषि संशोधन केंद्रामधील शास्त्रज्ञांचा सदरच्या मासिक जिल्हा चर्चासत्रात, संयुक्त प्रक्षेत्र भेटीत आणि चाचणी प्रयोगात प्रामुख्याने सहभाग असतो. मासिक जिल्हा चर्चासत्रात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,कृषि खात्यातील अधिकारी वनविभागाचे अधिकारी,मत्स्यपालन विभागाचे अधिकारी, पाटबंधारे विभागातील अधिकारी उपस्थित असतात. या चर्चासत्रामध्ये शेतकऱ्यांसाठी निविष्ठा, रोपे पुरवठा, पाहणी आणि तपासणी इ.विषयांवर उहापोह केला जातो.

विस्तार शिक्षण कार्यक्रम

संयुक्त संशोधन आढावा बैठक संपन्न

महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठांची ४२ वी संयुक्त संशोधन आढावा बैठक मे २०१४ मध्ये डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली येथे मा. मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या बैठकीत प्रमुख अतिथी मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील,कृषि मंत्री,महाराष्ट्र राज्य तसेच चारही विद्यापीठाचे कुलगुरू उपस्थित होते. सदर आढावा बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे ११ नवीन वाण व २ अवजारे तसेच विद्यापीठाने तयार केलेले सीडीज याचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक – खरीप १४ चे आयोजन

विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठकीचे आयोजन ११ जून २०१४ रोजी यशदा पुणे येथे करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. उमाकांत दांगट कृषि आयुक्त महाराष्ट्र राज्य व अध्यक्ष डॉ. तुकाराम मोरे, कुलगुरू म.फु.कृ.वि. हे होते. डॉ. किरण कोकाटे, संचालक विस्तार शिक्षण यांनी विस्तार उपक्रमांचे सादरीकरण केले.विद्यापीठातील शास्त्रज्ञ,कृषि विभागीय कर्मचारी असे एकूण १८५ शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

आढावा बैठक संपन्न

विद्यापीठातील विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्र,कृषि विस्तार केंद्र यांची गत पाच वर्षातील कार्याचा आढावा व पुढील दिशा ठरविण्यासाठी संचालक विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली दि.३० मे २०१४ रोजी संपन्न झाली सदर बैठकीमध्ये एकूण शास्त्रज्ञ व अधिकारी मिळून ५५ सहभागी झाले होते.

कांदा उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न

कांदा उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र यांनी राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत जुन २०१४ मध्ये आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील हे होते. त्यांनी उपस्थितांना कांदा उत्पादनाची माहिती दिली.

लोकरी मावा व्यवस्थापन मेळाव्याचे आयोजन

लोकरी मावा व्यवस्थापन मेळाव्याचे आयोजन विभागीय विस्तार केंद्र यांनी जुन २०१४ मध्ये कासारवाडी या गावी आयोजित केले होते सदर मेळाव्याचे उद्घाटन संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांनी केले. या कार्यक्रमास मोठया संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

ऊस उत्पादन तंत्रज्ञान मेळाव्याचे आयोजन

ऊस उत्पादन तंत्रज्ञान मेळाव्याचे आयोजन विभागीय विस्तार केंद्र कोल्हापुर यांनी जुन २०१४ मध्ये केले होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन विस्तार शिक्षण संचालक डॉ.किरण कोकाटे यांनी केले या मेळाव्यात मोठया संख्येने ऊस उत्पादक शेतकरी हजर होते.

पीक काढणीसाठी आधुनिक अवजारे यांचा वापर या विषयांवर कार्यशाळा संपन्न

डॉ. आ.शिं.कृ.महाविद्यालय व जॉन डिअर कंपनी यांच्या संयुक्त माध्यमाने पिक काढणीसाठी मध्यवर्ती परिसर,राहुरी आधुनिक अवजारांचा वापर या विषयावर येथे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन जून २०१४ मध्ये करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेत जॉन डिअर कंपनीचे १५ अभियंते यांनी सहभाग घेतला.

विभागीय कृषि संशोधन व विस्तार समिती बैठक रब्बी व उन्हाळी २०१४ संपन्न

रब्बी व उन्हाळी विभागीय कृषि संशोधन व विस्तार समितीची बैठक राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प सोलापुर येथे सप्टेंबर २०१४ मध्ये संपन्न झाली सदर बैठकीचे उद्घाटन डॉ. तुकाराम मोरे,कुलगुरू म.फु.कृ.वि.राहुरी यांनी केले. सदर बैठकीसाठी कृषि विभाग व विद्यापीठातील एकूण १३६ शास्त्रज्ञ अधिकारी उपस्थित होते.

फळे व भाजीपाला प्रक्रीया तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न

अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागात फळे व भाजीपाला तंत्रज्ञान या एक महिन्याचे प्रशिक्षण कार्यक्रमांचे उद्घाटन जुलै २०१४ मध्ये संचालक, विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये एकूण ३१ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

सहभाग ग्रामसर्वेक्षण कार्यशाळा संपन्न

विस्तार शिक्षण विभाग,म.फु.कृ.वि राहुरी व विस्तार शिक्षण संस्था आनंद गुजरात यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यवर्ती परिसर राहुरी येथे कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेत एकूण ५१ विस्तार कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

आधुनिक शेळी पालन कार्यशाळा संपन्न

पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विभागाद्वारे ऑगस्ट २०१४ मध्ये आधुनिक शेळीपालन या विषयावर दोन दिवसांची कार्यशाळा कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, राहुरी येथे संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन संचालक विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे यांच्या हस्ते झाले . या कार्यशाळेत एकूण ५० शेतकरी सहभागी झाले होते.

कृषि विज्ञान केंद्रांची विभागीय कार्यशाळा संपन्न

कृषि विज्ञान केंद्र, बारामती व विभागीय प्रकल्प संचालक, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व तेलंगना या राज्यांतील एकूण ७९ कृषि विज्ञान केंद्रांची कार्यशाळा ऑक्टोबर २०१४ मध्ये झाली.

किसान कॉल सेंटरचे समन्वयक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण संपन्न

कृषि महाविद्यालय पुणे येथे दि ७-८ ऑक्टो २०१४ या कालावधीत किसान कॉल सेंटरचे समन्वयक व पर्यवेक्षक यांचेसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि मॅनेज, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण आयोजीत केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ.किरण कोकाटे उपस्थित होते. प्रशिक्षणात ५० प्रशिक्षणार्थी सहभागी होते.

माहिती तंत्रज्ञानाचा सुधारीत विस्तार कार्यात वापर या विषयांवर कार्यशाळा संपन्न

कृषि महाविद्यालय पुणे येथे दि १८-२१ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि मॅनेज, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने माहिती तंत्रज्ञानाचा सुधारीत विस्तार कार्यात वापर या विषयी कार्यशाळा आयोजीत केली होती. प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ.किरण कोकाटे उपस्थित होते. प्रशिक्षणात ४० प्रशिक्षणार्थी सहभागी होते.

संकरीत जनावरांमध्ये कृत्रीम रेतन पद्धतीचे आधुनिक तंत्रज्ञान विषयी प्रशिक्षण संपन्न

पशु विज्ञान व दुग्धशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांच्या मार्फत डिसेंबर २०१४ मध्ये शेतकऱ्यांसाठी संकरीत जनावरांमध्ये कृत्रीम रेतन पद्धतीचे आधुनिक तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले. प्रशिक्षणाचे उद्घाटन विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ.किरण कोकाटे यांनी केले. या प्रशिक्षणात ५० शेतकरी सहभागी होते.

कोरडवाहु शेती तंत्रज्ञान या विषयावर कार्यशाळा संपन्न

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने कोरडवाहू शेती तंत्रज्ञान या विषयावर कार्यशाळा आयोजीत केली होती. या कार्यशाळेत ७० शेतकरी सहभागी झाले होते.

मागोवा २०१४ संपन्न

मागोवा २०१४ हा कार्यक्रम दि. २९ जाने २०१५ रोजी मध्यवर्ती परीसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून हिवरेबाजारचे माजी सरपंच श्री. पोपटराव पवार उपस्थित होते. या वेळी सन २०१४ मध्ये झालेल्या विविध कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच कृषिदर्शनी २०१५ चे विमोचन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या शिक्षण,संशोधन व विस्तार शिक्षणाच्या कार्याचे छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यावेळी विद्यापीठातील सर्व अधिकारी, शास्त्रज्ञ, प्राज्ञापक, कर्मचारी विद्यार्थी इ. मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषि विज्ञान केंद्रांसाठी कृती आराखडा कार्यशाळा संपन्न

दि १८- १९ मार्च २०१५ या कालावधीत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि विभागीय प्रकल्प संचालक, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी येथे कृषि विज्ञान केंद्रांसाठी कृती आराखडा कार्यशाळा आयोजीत केली होती. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एन. सुधाकरन, विभागीय प्रकल्प संचालक, हैद्राबाद हे उपस्थित होते. या कार्यशाळेत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व १६ कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक, विषय विशेषज्ञ व इतर कर्मचारी सहभागी झाले होते.

विस्तार शिक्षण कार्यक्रम (२०१४-१५)

अ.क्र.		तपशिल	कार्यक्रम	एकुण लाभार्थी संख्या
१.		**प्रशिक्षण कार्यक्रम**		
	अ)	शेतकरी,शेतकरी महिला व युवकांसाठी प्रशिक्षण	१५९	६८९०
	ब)	कृषि व विकास खात्यातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण	२४	१५८६
	क)	शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यामध्ये चर्चासत्र-प्रशिक्षण वर्ग	२७	९५६
२.		**चर्चासत्र/परिसंवाद**		
	अ)	मासिक जिल्हा चर्चासत्र	१०८	१९५६
	ब)	संयुक्त संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक	०२	२०५
	क)	विद्यापीठ शास्त्रज्ञांचा परिसंवाद/चर्चासत्रात सहभाग	२९	१४५६
३.		**प्रात्यक्षिके/चाचणी प्रयोग**		
	अ)	कृषि प्रात्यक्षिके	५४२	३५६०
	ब)	परीणाम प्रात्यक्षिके	४२५	४२५
	क)	आद्यरेखीय प्रात्यक्षिके	१५७५	१५७५
४.		**इतर विस्तार शिक्षण कार्यक्रम**		
	१.	सभा/ गटचर्चा	३६८	४५८०
	२.	प्रक्षेत्र भेटी/शिवार फेरी	५८६	४८१
	३.	शेतीदिन	२१	
	४.	प्रक्षेत्र व गृह भेटी	६४९	७८२
	५.	शेतकरी मेळावे	१७२	--
	६.	कृषि प्रदर्शने	४६	--
	७.	निदान चमुच्या भेटी व रोग आणि किड पहाणी पथक	१४७	--
	८.	विद्यापीठ शास्त्रज्ञांचे कृषि खाते व इतर सेवाभावी संस्थेने आयोजित केलेल्या विस्तार कार्यक्रमात व्याख्याने	४५६	--
	९.	शेतकऱ्यांच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे	२७८९	--
	१०.	विद्यापीठ शास्त्रज्ञांचे विविध विस्तार कार्यक्रमात उपस्थिती व सहभाग	२५८	--
	११.	विद्यापीठ शास्त्रज्ञांचे खरीप/रब्बी चाचणी प्रात्यक्षिके यांना भेटी	६८०	--
	१२.	शेतकरी - शास्त्रज्ञ मंच	७६	१५५६
५.		**प्रसिध्दी व प्रकाशने**		

	अ)	**प्रसिध्दी**		
		१. बातम्या : दैनिक वर्तमानपत्रे/रेडिओ/दूरदर्शन	१६११	--
		२. वर्तमानपत्रात/मासिकात प्रसिध्द झालेले लेख		--
		३. आकाशवाणी कार्यक्रम	२३९	--
		४. दूरदर्शन कार्यक्रम	५९	--
		५. टि.व्ही.च्या इतर वाहिन्यांवर प्रसारीत झालेले कृषिविषयक कार्यक्रम		--
	ब)	**प्रकाशने विक्री**		
		१. कृषीदर्शनी २०१४	३००००	-
		२. श्रीसुगी (खरीप, रब्बी, उन्हाळी)	७६९०	-
		३. इतर प्रकाशने	७८	
		४. घडी पत्रिका	१५०००	-
	ब)	**विद्यापीठ व इतर ठिकाणी झालेल्या भेटी**	मफुकृवि,राहुरी	इतर केंद्रे
		१. शेतकरी	५०३६८	४५२९
		२. विद्यार्थी		२५६४
		३. प्रशिक्षाणार्थी		३५६
		४. अधिकारी		२४२
		५. अति महत्वाच्या व्यक्तिंच्या भेटी		२३
६.		**फिरते पीक चिकित्सालय कार्यक्रम**		
	१.	शेतकऱ्यांचे सोडविलेले प्रश्न	४५६०	४५६०
	२.	पाणी परिक्षण	६१९	६१९
	३.	माती परिक्षण	१२५४	१२५४
	४.	किड नमुने तपासणी	७५३	७५३
	५.	रोग नमुने तपासणी	३२५	३२५
७.		दुरभाष्य/दूरध्वनीव्दारे दिलेली उत्तरे	४१८९३	४१८९३

५. प्रमख घडामोडी

कृषि विद्यापीठाचा तिसावा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न



कृषि विद्यापीठाचा तिसावा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न झाला. या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य आणि कुलपती, मफुकृवि, राहुरी यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून सी.एस.आय.आर., भटनागर फेलो, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे, प्रा. राष्ट्रीय संशोधन व जागतिक संशोधन संघाचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर होते. याप्रसंगी व्यासपीठावर मा.ना. एकनाथराव खडसे, मंत्री महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ कृषि आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य आणि प्रतिकुलपती, कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, अधिष्ठाता (कृषि) डॉ.भीमराव उल्मेक, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, सहयोगी अधिष्ठाता, डॉ. प्रकाश तुरबतमठ उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शन करताना डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले, देशापुढे अनेक आव्हाने आहेत. पीक उत्पादन वाढीबरोबरच हवामान बदल, त्याचप्रमाणे कोरडवाहू शेती, दारिद्रय, कुपोषण ही आव्हाने आहेत. त्यासाठी अभिनव पराकाष्ठांची गरज आहे.

राज्याचे राज्यपाल मा.श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव आणि कुलपती, मफुकृवि, राहुरी यांच्या शुभहस्ते पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये ९२ विद्यार्थ्यांना पी एच डी, ६६८ विद्यार्थ्यांना पद्व्युत्तर पदवी आणि ४३६५ विद्यार्थ्यांना पदवी असे एकूण ५१२५ विद्यार्थ्यांनी पदव्या प्रदान करण्यात आल्या. मा. राज्यपाल श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव यांचे शुभहस्ते सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये बी.एस्स.सी (कृषि)पदवीत प्रथमबी.एस्स.सी (उद्यान विद्या) मध्ये प्रथम आलेला, कृषि अभियांत्रिकी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक व इतर यशस्वी विद्यार्थ्यांना पदके प्रदान करण्यात आली.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी विद्यापीठाचा कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाचा अहवाल सादर केला. समारंभाला विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य ॲड. तानाजीराव धसाळ, माजी खा.श्री. भाऊसाहेब वाकचौरे, श्री. प्रकाश पाटील, डॉ.सुदाम आडसुळ, श्री. तुषार पवार, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील त्याचबरोबर माजी आ.श्री. चंद्रशेखर कदम, संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, विद्या परिषदेचे व विस्तार शिक्षण परिषदेचे सदस्य, मान्यवर, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी शास्त्रज्ञ, प्रगतीशील शेतकरी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती खरीप-२०१४



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा, पुणे येथे विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची खरीप-२०१४ ची बैठक संपन्न झाली. या बैठकीचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री.उमाकांत दांगट होते. या बैठकीचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, संचालक विस्तार व प्रशिक्षण डॉ. सुदाम अडसूळ, आत्माचे संचालक डॉ. कृष्णराव देशमुख, मृदसंधारण व पाणलोट व्यवस्थापन संचालक श्री. सुरेश अंबुलगेकर, अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक, गुणनियंत्रण व निविष्ठा संचालक डॉ. जयंत देशमुख सहयोगी संशोधन संचालक डॉ. शिवाजी गुरव आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, विद्यापीठाच्या तंत्रज्ञानावर आधारीत कोरडवाहू शेती केली तर नक्कीच फायदयाची ठरेल. यावेळी संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवरील कृषि विस्तार संबंधी सद्यस्थिती, आव्हाने व पुढील दिशा यावर सविस्तर सादरीकरण केले. संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांनी सन २०१३-१४ मधील प्रसारित वाण व शिफारशींच्या अहवालाचे सादरीकरण केले. या बैठकीत श्रीसुगी खरीप-२०१४ आणि विविध कृषि विषयांवर सात डिव्हीडींचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आहे. या बैठकीला विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, कृषि विभागाचे अधिकारी, मोठया संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.किरण कोकाटे यांनी, तर सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय लाड आणि डॉ. भगवान देशमुख व आभार डॉ.शिवाजी गुरव यांनी मानले.

जनुकीय सुधारित पिकांविषयी जागृकता कार्यशाळा संपन्न



कृषी विद्यापीठ व बायोटेक कॉन्सॉर्टियम इंडिया लि., नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील कृषी शास्त्रज्ञांसाठी पुणे येथील यशदाच्या सभागृहात आयोजित जनुकीय सुधारीत पिकांविषयी जागृकता कार्यशाळेचे उदघाटन डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे होते. या प्रसंगी व्यासपीठावर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्यंकटेश्वरलू, कृषि आयुक्त श्री. विकास देशमुख, माजी कुलगुरू डॉ. राजाराम देशमुख, संशोधन संचालक डॉ.राजेंद्र पाटील, डॉ. विभा आहुजा उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शन करताना डॉ. अनिल काकोडकर म्हणाले, लोकसंख्येमध्ये जगात आपल्या देशाचा दुसरा क्रमांक लागतो. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची वाढती गरज लक्षात घेता शाश्वत उत्पादनासाठी जनुकीय सुधारीत (जीएम) तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही. अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी केले. या प्रसंगी डॉ. दिनेशकुमार, डॉ. एस.जे. रहेमान, सोनिया कौशिक, डॉ. आर.एम. सुंदरम्,डॉ. ए.एस. जाधव, डॉ. विद्या गुप्ता या शास्त्रज्ञांची व्याख्याने झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील यांनी केले. या कार्यशाळेत संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक, डॉ.डी.पी. वासकर, डॉ. उत्तम महाडकर, श्री. जयंत देशमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पवन कुलवाल यांनी तर आभार डॉ. रावसाहेब भारूड यांनी मानले. याप्रसंगी राज्यातून २०० हून अधिक शास्त्रज्ञ उपस्थित होते.

मुल्यांकन समितीची विद्यापीठास भेट

कृषि विद्यापीठाचे मूल्यांकन करण्यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या पाच सदस्यीय आढावा समितीने विद्यापीठाला भेट दिली. या समितीचे अध्यक्ष शेर-ए-काश्मीर कृषि शास्त्र आणि तंत्रज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अन्वर आलम तसेच सदस्य म्हणून डॉ. टी.के. अद्या, डॉ. रेखा दयाल, डॉ. बी.पी. नंदवान आणि सदस्य सचिव म्हणून डॉ. के. पी. त्रिपाठी उपस्थित होते. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, संचालक विस्तार शिक्षण डॉ. भीमराव उल्मेक, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील व कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे या समितीबरोबर होते. या वेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ.अन्वर आलम म्हणाले महात्मा फुले कृषि विद्यापीठाने कृषिच्या प्रत्येक क्षेत्रात अभुतपूर्व काम केलेले आहे. कृषि मधील विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग शेतक-यांचे उत्पन्न वाढण्यासाठी करावा.



या समितीने कृषि विद्यापीठाच्या कृषि महाविद्यालय, पुणे,धुळे, कोल्हापूर, पाडेगाव संशोधन केंद्रास भेट देवून विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरास भेट दिली. यावेळी त्यांनी मुला व मुलींच्या वसतिगृहांना भेटी दिल्या. तसेच प्रक्षेत्रावरील विद्यार्थ्यांच्या प्रयोगांना भेटी देऊन विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला आणि मार्गदर्शन केले. या प्रसंगी विद्यापीठांतर्गत शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. समितीने या प्रदर्शनास भेट दिली. यावेळी सर्व विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

कृषि उद्योजकता, व्यापारातील /व्यवसायातील जागतिक संधी-राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन



राज्यातील चारही कृषि विद्यापीठे, जर्नल ऑफ ॲग्रिकल्चर

रिसर्च ॲण्ड टेक्नॉलॉजी आणि महाराष्ट्र कृषि उद्योजकता विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नाटयगृहात कृषि उद्योजकता, व्यापारातील जागतिक संधी या राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सी.डी. मायी उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे हे होते. विशेष अतिथी म्हणून पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिटयुटचे महासंचालक डॉ. शिवाजीराव देशमुख उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के.ई.लवांदे, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर.जी.दाणी, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता तथा राष्ट्रीय परिसंवादाचे निमंत्रक डॉ. भीमराव उल्मेक आणि जर्नल ऑफ ॲग्रीकल्चर रिसर्च ॲण्ड टेक्नॉलॉजीचे मुख्य संपादक डॉ. एस.डी. गोरंटीवार उपस्थित होते. याप्रसंगी कृषि विद्यापीठे,विविध खाजगी कंपन्या तसेच यशस्वी कृषि उद्योजक यांचे प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शन करताना डॉ.सी.डी.मायी म्हणाले, कृषि विद्यापीठांनी कृषि शिक्षण आणि संशोधनामध्ये अभुतपूर्व कार्य केले आहे. सध्या भारताचे अन्नधान्य उत्पादन २६० मे.टन असून आपला देश अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण झाला आहे. शेतक-यांना उत्पादन तंत्राबरोबरच कृषि प्रक्रिया उद्योगाचे ज्ञान दिले तर शेतक-यांचे उत्पादन वाढून त्यांचा आर्थिक उत्कर्ष साधता येईल. अध्यक्षीय मार्गदर्शन आणि प्रास्ताविक करताना महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे म्हणाले, या दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या विचार मंथनातून कृषि उद्योजकांना आवश्यक कुशल मनुष्यबळ कृषि विद्यापीठांच्या माध्यमातून घडविण्यासाठी, तसेच कृषि पदवीधरांचा यशस्वी कृषि उद्योजक होण्यासाठीचा आत्मविश्वास उंचावण्याचे कार्य निश्चितपणे होणार आहे. याप्रसंगी वसंतदादा इन्स्टिटयुटचे महासंचालक डॉ. शिवाजीराव देशमुख, डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. किसनराव लवांदे, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर.जी. दाणी, वसंतराव नाईक मराठावाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.बी. व्यंकटेश्वरलू यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एस.मगर, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. व्ही.एम. मायंदे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.व्ही.एम.पवार,निर्मल बियाणे कंपनीचे चेअरमन श्री. आर. ओ. पाटील तसेच महाराष्ट्र राज्य औषधी पिके मंडळाचे तांत्रिक सल्लागार डॉ. शंकरराव राऊत उपस्थित होते. याप्रसंगी चारही कृषि विद्यापीठांचे संचालक विस्तार शिक्षण, संचालक संशोधन, अधिष्ठाता, शास्त्रज्ञ, कृषि पदवीधर उद्योजक आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. या परिसंवादामध्ये देशभरातून ७०० हून अधिक शास्त्रज्ञ आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता व परिसंवादाचे निमंत्रक डॉ. भीमराव उल्मेक यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाशवाणी, पुणे केंद्राच्या कु. लविना यांनी केले.

स्वच्छ भारत अभियानाचे उद्घाटन संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे अखिल भारतीय स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी विद्यापीठातील सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. याप्रसंगी राष्ट्रपिता श्री. महात्मा गांधी आणि पूर्व प्रधानमंत्री श्री. लाल बहादुर शास्त्री यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. सुरेश बोरकर, कुलसचिव श्री.सुनिल वानखेडे, डॉ.आण्णासाहेब शिंदे कृषि अभि. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद ढोके, सर्व विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते. याप्रसंगी प्राध्यापक, शास्त्रज्ञ, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे यांनी तर सूत्रसंचालन व आभार सुरक्षा अधिकारी श्री. जे.बी. शिंदे यांनी मानले.

कृषि विद्यापीठात राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा



कृषि विद्यापीठात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा झाला. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी नियंत्रक श्री. विश्वासराव जाधव, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, उद्यानविद्या प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे, जीवरसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजीव नाईक, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. सुरेश थोरात, पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, कृषि किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुभेदार जाधव यांनी प्रतिमांना पुष्प अर्पण केले. यावेळी कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे यांनी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी विद्यापीठातील सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची राष्ट्रीय एकता दौड काढण्यात आली. या राष्ट्रीय एकता दौडेत सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.शरद पाटील यांनी केले.

डॉ.अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियानाची सुरूवात



डॉ.अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियानाची विविध उपक्रमांनी सुरूवात करण्यात आली. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ यांच्या अध्यक्षतेखाली स्वच्छतेच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व इतर विद्यार्थ्यांनी या स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे एक दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयाचा परिसर तसेच वसतिगृह स्वच्छ केले. विद्यार्थ्यांनी मध्यवर्ती परिसरामध्ये प्रभात फेरी काढून नागरिकांना स्वच्छते विषयीचे महत्त्व सांगितले. निबंध, वक्तृत्व, लेख, भितीपत्रके इत्यादी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

पदव्युत्तर महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक सकाळ नाशिक कार्यालयाचे प्रमुख संपादक श्री. उत्तम कांबळे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, सहयोगी अधिष्ठाता(पम)डॉ. भीमराव उल्मेक, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, नियंत्रक श्री. पोपट कर्डिले, उपाध्यक्ष विद्यार्थी परिषद डॉ. राजीव नाईक, विद्यार्थी कल्याण अधिकारी, श्री. शरद पाटील, डॉ. राजेंद्र वाघ, विद्यार्थी परिषद सभापती कु. मुक्ता टेकाळे, निमंत्रक श्री. अभय गायकवाड उपस्थित होते.



प्रमुख मार्गदर्शन करतांना श्री. उत्तम कांबळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी महात्मा जोतीराव फुलेंच्या शेतक-यांवरील कांदब-या वाचा. फुले वाचल्याशिवाय शेतकरी कळणार नाही. शिक्षणाच्या चौकटीबाहेर जाऊन शेतक-यांशी व समाजाशी संवाद साधा. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. भीमराव उल्मेक यांनी करून दिली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कविता, लेख यावरील कृषिगंध या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. पदव्युत्तर महाविद्यालयाचा सन २०१३-१४ साठी सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून श्री. भगवान वालझडे यांना तर पी.एच.डी. चा सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून श्री. प्रमोद मगर यांना मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. अहवाल वाचन कु. मुक्ता टेकाळे यांनी केले. सूत्रसंचालन कु. सुवर्णा केळकर आणि श्री. उल्हास राक्षे यांनी केले व आभार श्री. अमित शिंदे यांनी मानले.

डॉ.अ.शि.कृ.अ. महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात ऋणानुबंध वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व पालक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक पुढारीचे संपादक श्री. संजय आवटे होते. याप्रसंगी



अधिष्ठाता (कृषि) डॉ. भीमराव उल्मेक, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. प्रकाश उंडे, डॉ. रविंद्र बनसोड, विद्यार्थी परिषद सभापती कु. अनिता तराळ आणि स्नेह संमेलन सचिव श्री. सृजन पिसाळ उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणामध्ये कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी डॉ. भीमराव उल्मेक, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शन करतांना श्री. संजय आवटे म्हणाले, समाजात जगत असताना प्रत्येकाने स्वहित न पाहता समाज हिताचा विचार केल्यास समाजामध्ये जागृती झाल्याशिवाय राहणार नाही. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विविध क्रीडा स्पर्धेत, वकृत्व स्पर्धेत, स्पर्धा परिक्षेत यश प्राप्त विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र आणि मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी संपादन केलेली नियतकालिका 'विहान' याचे विमोचन करण्यात आले. विद्यार्थी परिषदेतील विद्यार्थ्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश तुरबतमठ यांनी केले व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. प्रकाश उंडे यांनी करून दिली.

कृषि शिक्षण दिन साजरा



कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयांतर्गत कृषी शिक्षण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अधिष्ठाता (कृषि) डॉ. बी. आर. उल्मेक यांनी भूषविले. अधिष्ठाता (कृषि)डॉ. बी.आर. उल्मेक, यांनी विद्यार्थी व पालकांना कृषि विद्यापीठे, घटक व खाजगी महाविद्यालये, कृषि विज्ञान व कृषि अभियांत्रिकी मध्ये असलेल्या विविध करिअरच्या संधीबाबत मार्गदर्शन केले.या प्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ.पी.ए.तुरबतमठ यांनी कृषी शिक्षण दिन : मार्गदर्शन व चर्चासत्राचे आयोजन करण्यामागील विद्यापीठाचे व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उद्दिष्टाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांमधून विद्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दिलीप गायकवाड यांनी केले तर प्रा.सौ.एम.ए.पटवर्धन यांनी आभार मानले.

कृषि विद्यापीठाची१८ वी कृषि संशोधन परिषदेची बैठक संपन्न



कृषि विद्यापीठाची १८ वी कृषि संशोधन परिषदेची बैठक संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. या प्रसंगी बारामती येथील राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्थाचे संचालक डॉ. पी.एस. मिन्हास, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे संचालक संशोधन डॉ. प्रकाश शिनगारे, आभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाचे प्रतिनिधी डॉ. एस.व्ही.पाठक आणि ऊस विशेषज्ञ डॉ. एस.एम. पवार उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, विद्यापीठाने विकसित केलेले वाण आणि प्रसारीत केलेल्या शिफारशींमुळे शेतक-यांच्या शेतमाल उत्पन्नात किती प्रमाणात वाढ झालेली आहे, याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. यावेळी डॉ. पी.एस मिन्हास यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील यांनी मागील वर्षीच्या संशोधनाचा आढावा, आणि पुढील संशोधनाची रूपरेषाचे सादरीकरण केले. या बैठकीला सर्व सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, सहयोगी संशोधन संचालक, प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.के.जे.कांबळे यांनी तर आभार डॉ. विठ्ठल शेंडे यांनी मानले.

कृषि विद्यापीठाचे पाच वाण, दोन कृषि यंत्रे आणि ५४ कृषि तंत्रज्ञान शिफारशींना मान्यता

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि राज्यातील चारही कृषि विद्यापीठे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे तीन दिवसीय संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीची ४२ वी बैठक संपन्न झाली. या बैठकीचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्याचे कृषि व पणनमंत्री ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी भूषविले. या प्रसंगी प्रमुख उपस्थितीत जलसंपदा मंत्री ना. श्री. सुनिल तटकरे, पालक मंत्री, रत्नागिरी ना. श्री. उदय सामंत, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, अकोला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविप्रकाश दाणी, दापोली विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. किसन लवांडे, परभणी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी.व्यंकटेश्वरलू, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. मारूती सावंत उपस्थित होते.

या तीन दिवसाच्या बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांचे नेतृत्वाखाली शेतपिके वाण प्रसारण व शेतपिके वाण संरक्षण आणि शेतकरी अधिकारी कायदयांतर्गत या कृषि विद्यापीठाच्या नवीन वाण आणि तंत्रज्ञान शिफारशी सादर केल्या व त्यास समितीने मान्यता दिली.

या बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे पाच वाण, दोन कृषि यंत्रे अवजारे आणि ५४ पीक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशींना मान्यता देण्यात आली. यामध्ये गव्हाचा फुले समाधान (एन.आय.ए.डब्ल्यू.१९९४), कारळाचा फुले वैतरणा (आयजीपीएन-८००४), आंब्याचा फुले अभिरूची (सिलेक्शन जीके -पीएम-५), सिताफळाचा फुले पुरंदर (जे. डब्ल्यू.सी. -१) आणि लसणाचा फुले निलिमा (सिलेक्शन १०-३) हे वाण प्रसारीत करण्यात आले. तसेच मानवचलीत फुले ज्वारी काढणी यंत्र आणि मानवचलीत फुले औषधी बिया फोडणी यंत्र प्रसारीत करण्यात आले.

तुरीवरील वार्षिक बैठक संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि भारतीय कृषि संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने तुरीवरील अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्पाची वार्षिक बैठक संपन्न झाली. बैठकीचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. याप्रसंगी व्यासपीठावर नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सहाय्यक महासंचालक(तेलबीया आणि कडधान्ये) डॉ. बी. बी. सिंग, कानपूर येथील भारतीय कडधान्य संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एन. पी. सिंग, प्रकल्प समन्वयक डॉ. आय. पी. सिंग, संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता (कृषि) डॉ. भीमराव उल्मेक, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारूड, कडधान्य प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. विठ्ठल शेंडे आदि मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी केले. डॉ. राजेंद्र पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. एन. पी. सिंग व डॉ. आय. पी. सिंग यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कडधान्य पिकावरील प्रकाशनाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, योजना प्रमुख, माजी शास्त्रज्ञ तसेच देशभरातील कडधान्य पैदासकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ. रावसाहेब भारूड यांनी तर सूत्रसंचालन डॉ. मधुकर बेडीस यांनी केले.

आधुनिक यंत्रे व अवजारांचा वापर कार्यशाळेचे आयोजन



कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय आणि जॉन डिअर कंपनी लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पीक लागवडीसाठी आधुनिक यंत्रे व अवजारांचा वापर या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन कृषि विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. दशरथ ठवाळ, मृद व रसायन विभागाचे प्राध्यापक डॉ. अशोक कडलग, प्रा. व्हि. एल. कानवडे, डॉ. विरेंद्र बरई, प्रा. विक्रम कड उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. किरण कोकाटे म्हणाले सध्या नवोन्मेशाचे युग आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात प्रगती होत आहे. कृषि क्षेत्रात उच्चांकी उत्पादन, हे तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणामुळे शक्य

झाले आहे. मोठ्या यंत्रांव्यतिरिक्त छोट्या शेतकऱ्यांना वापरता येणारे व परवडणारे यंत्रे विकसित करणे गरजेचे आहे. या कार्यशाळेत जॉन डिअर कंपनीचे पंधराहून अधिक अभियंता सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. सचिन नलावडे यांनी केले. आभार प्रा. विक्रम कड यांनी मानले.

शेतकरी प्रशिक्षणवर्ग संपन्न



राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पांतर्गत शेतक-यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांनी भूषविले. याप्रसंगी डॉ. आनंद सोळंके, डॉ.सुभाष भालेकर, डॉ. पंडित खर्डे, डॉ. बबन इल्हे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. राजेंद्र पाटील म्हणाले, कृषि विद्यापीठाने कांद्याचे उन्नत वाण व तंत्रज्ञान विकसित केले आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतक-यांनी कांदा उत्पादन वाढवावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. आनंद सोळंके यांनी केले. सूत्रसंचालन सहसमन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. श्री. रजनीकांत शेवाळे यांनी आभार मानले. या प्रशिक्षण वर्गात पाथर्डी व पारनेर तालुक्यातील १५० शेतकरी उपस्थित होते.

कृषि दिन साजरा



कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव, बुध कृषि विज्ञान मंडळ व बुध विकास सेवा सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने बुध येथे स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कृषि दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कृषि दिनानिमित्त आपत्कालीन परिस्थितीमध्ये करावयाचे पीक नियोजन या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्र, बोरगावचे कार्यक्रम समन्वयक डॉ. विजय तरडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून बुध कृषि विज्ञान मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रभाकर सुर्यवंशी, सेवा सोसायटीचे अध्यक्ष श्री. जगदाळे उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. विजय तरडे म्हणाले, नैसर्गिक साधनसामुग्रीच्या उपलब्धतेनुसार शेतक-यांनी शेतीचे नियोजन करावे.श्री. सुर्यवंशी यांनी कृषि विज्ञान मंडळातर्फे शेतीविषयक राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश बाबर यांनी व आभार श्री. भूषण यादगीरवार यांनी केले. यावेळी बुध, काटेवारी, वेटणे, फडतरवाडी या गावातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

शेतकरी-शास्त्रज्ञ चर्चासत्र संपन्न



कृषी महाविद्यालय कोल्हापूर येथील विभागीय विस्तार केंद्र आणि इंडियन फार्मर्स फर्टिलायझर्स को-ऑपरेटिव्ह लि. अंबप, ता. हातकणंगले यांचे संयुक्त विद्यमाने शिवारफेरी व शेतकरी-शास्त्रज्ञ चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. जी.जी.खोत होते.

याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे म्हणाले, विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञानाचा शेतक-यांनी वापर करावा. शेतीमध्ये शेतक-यांना येणा-या अडचणी संदर्भात प्रत्याभरण त्यांनी शास्त्रज्ञांना दयावे. याप्रसंगी बाबासाहेब देवकर, डॉ. डी.एस.पाटील, डॉ. यु.डी. जगदाळे, एन.एन.टाले, एच.के. ताटे, बी.टी.चव्हाण, सरपंच सौ.उषा माने, उपसरपंच अल्लाबक्ष मुल्ला, श्री.सर्जेराव धनवडे, श्री.प्रदीप साळोखे, श्री. भरत पाटील, श्री. बी. टी. पाटील, श्री. गुरव, बाबासाहेब

तोडकर, श्री. मनोहर पाटील उपस्थित होते. प्रा.व्ही.एम.करडे यांनी सूत्रसंचालन केले.

शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाचे चर्चासत्र संपन्न



कृषि महाविद्यालय, कोल्हापूर, विभागीय विस्तार केंद्र, कोल्हापूर आणि दूधगंगा-वेदगंगा साखर कारखाना यांच्या संयुक्त विद्यमाने मजरे-कासारवाडा, ता. राधानगरी येथे शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाच्या शेतक-यांसाठी हुमणी नियंत्रण चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे तर अध्यक्ष म्हणून सहयोगी अधिष्ठाता, डॉ. जी.जी. खोत होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करतांना संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे म्हणाले की,शेतक-यांनी एकच पीक पध्दती न अवलंबता पिकाची फेरपालट करावी.

याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता, डॉ. जी.जी. खोत आणि डॉ. पी.बी. मोहिते यांनी शेतक-यांना मार्गदर्शन केले. यावेळी हुमणी एकात्मिक व्यवस्थापनासाठी फुले मेटॅरायझम या बुरशीचे शेतक-यांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. ए.ए. पिसाळ, डॉ.यु.डी. जगदाळे, श्री. एन.एन. टाले, श्री. राजेश कावणे, श्री.उदय पाटील, श्री.सागर किल्लेदार, श्री.बाबासाहेब किल्लेदार, श्री. भरत पाटील, शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाचे शेतकरी उपस्थित होते. डॉ. ए. ए.पिसाळ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. व्ही.एम. करडे यांनी सूत्रसंचालन केले.

ज्वारीची वार्षिक आढावा बैठक संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, इक्रीसॅट, हैद्राबाद व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने यशदा, पुणे येथे आयोजित रब्बी ज्वारीचे बिजोत्पादन साखळी या प्रकल्पाच्या पहिली वार्षिक आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थानी कृषि आयुक्त श्री. उमाकांत दांगट तर प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे होते. प्रमुख उपस्थितीत माजी कुलगुरू डॉ. राजाराम देशमुख, महाबीजचे कार्यकारी संचालक डॉ. शालीग्राम वानखेडे,संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, संचालक विस्तार डॉ.एस.एस.अडसूळ, संचालक, गुणनियंत्रण डॉ. जयवंत देशमुख, संचालक, आत्मा श्री. के.व्ही. देशमुख, हैद्राबाद इक्रीसॅट येथील वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. रविंद्र रेडडी उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, ग्राम बिजोत्पादन साखळी प्रकल्पातून कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या रब्बी ज्वारीच्या जाती शेतक-यांपर्यंत मोठया प्रमाणावर जाण्यास मदत होईल आणि बिजोत्पादन प्रकल्प हे महाराष्ट्र राज्याला वरदान ठरेल. अध्यक्षीय मार्गदर्शन कृषि आयुक्त श्री. उमाकांत दांगटयांनी केले.या कार्यशाळेला वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारूड, सहसंचालक, महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, श्री.एस.टी. जाधव, महाबीजचे विभागीय व्यवस्थापक डॉ.एस.एस.जाधव, इक्रीसॅट, हैद्राबादचे, श्री. फुंडकर, प्रमुख बियाणे अधिकारी डॉ. मधुकर धोंडे, कृषि विद्यापीठ, राहुरी व परभणी येथील ज्वारी प्रकल्पाचे शास्त्रज्ञ, सीड कंपन्यांचे प्रतिनिधी व कृषि विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उत्तम चव्हाण व आभार संशोधन संचालकडॉ.राजेंद्र पाटील यांनी मानले.

शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न



कृषि विज्ञान केंद्र, नारायणगांव येथे शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रमुख पाहुणे म्हणून संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे चेअरमन श्री. अनिल मेहेर होते. ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रकाश पाटे, कांदा-लसूण संशोधन केंद्राचे प्रमुख महाप्रबंधक डॉ. डी.आर. साळवी, कृषीभूषण सौ. वनिताताई गुंजाळ, कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. बी. एस.राजपूत आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख

मार्गदर्शन डॉ. किरण कोकाटे यांनी केले.याप्रसंगी चेअरमन श्री. अनिल मेहेर यांनी आपले अध्यक्षीय मार्गदर्शन केले. डॉ. बी.एस. राजपूत यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या मागील वर्षाच्या कामाचा आढावा सादर केला. तसेच इतर विषयी तज्ञांनी चालू वर्षासाठीचे कामाचे आराखडे समितीसमोर सादर केले. सूत्रसंचालन आणि आभार श्री. राहुल घाडगे यांनी केले.

६८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



कृषि विद्यापीठ येथे ६८ वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण प्रसंगी कुलगुरू म्हणाले, गारपीठ पाठोपाठ दुष्काळ परिस्थितीत विद्यापीठाने शेतक-यांसाठी परिस्थितीनुरूप कृषि सल्ला देऊन शेतक-यांना दिलासा दिला आहे. याप्रसंगी संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ. भिमराव उल्मेक, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, नियंत्रक श्री. विश्वासराव जाधव, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय आणि जिल्हा रूग्णालय,अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध बांधकामांचे उद्घाटन कुलगुरूंच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ परिसरामध्ये कुलगुरू, संचालक आणि अधिका-यांच्या हस्ते विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. विहीर पुनर्भरण प्रात्यक्षिकाचे आयोजन या प्रसंगी करण्यात आले होते. या प्रसंगी विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. डॉ. राजेंद्र केंघे यांच्या मार्गदर्शनाखाली एन.सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षा अधिकारी प्रा. जे.बी. शिंदे यांनी केले.

ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतकरी मेळावा संपन्न

विभागीय विस्तार केंद्र, कृषि महाविदयालय, कोल्हापूर अंतर्गत ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम२०१४-१५ मध्ये कार्यरत विद्यार्थ्यांनी मौजे माले, ता. हातकणंगले, कोल्हापूर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले होते. शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन संचालक विस्तार शिक्षण, डॉ.किरण कोकाटे



यांचे हस्ते झाले. यावेळी कोल्हापूर येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.गजानन खोत डॉ.दिनकर पाटील, डॉ.अशोक पिसाळ, डॉ. विजय तरडे, प्रा.एस.जे.पाटील, प्रा.उत्तम कदम प्रा.विलास करडे उपसरपंच श्री.प्रताप पाटील उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना संचालक विस्तार शिक्षण तथा अधिष्ठाता(कृषि) डॉ. किरण कोकाटे म्हणाले, सर्व घटकांनी एकत्रित येऊन कृषि तंत्राचा प्रसार व प्रचार करणे ही आजची गरज आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आत्मा, कृषि विभाग,विदयापीठ व इतर संस्था यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी शास्त्रज्ञांनी शेतक-यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासशेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषि हवामानशास्त्र प्रशिक्षणाचे आयोजन



पुणे येथील कृषि महाविद्यालयातील कृषि हवामानशास्त्र विभागामध्ये पिकांमधील सूक्ष्म हवामानशास्त्र या विषयांवर २१ दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. भिमराव उल्मेक यांनी केले. मार्गदर्शन करतांना डॉ. भिमराव उल्मेक म्हणाले, बदलत्या हवामान परिस्थितीत पिकातील सूक्ष्म हवामानाचा व त्यासंबंधी आवश्यक त्या सूक्ष्म घटकांचा अभ्यास करून त्यानुसार संभाव्य रोग, किडी इ. सर्वंकष घटकांवर आधारीत शास्त्रीय मार्गदर्शन व उपाययोजना सूचविण्याचे कार्य करण्याची गरज आहे. याप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल कारळे, विभाग प्रमुख डॉ. सताप्पा खरबडे व विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, अधिकारी उपस्थित

होते. या प्रशिक्षणासाठी गुजरात, छत्तीसगड, महाराष्ट्र येथील विविध कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ सहभागी झाले होते.

रब्बी उन्हाळी -२०१४ ची कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर येथे विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची रब्बी-उन्हाळी-२०१४ ची बैठक संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थान कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. या बैठकीचे प्रमुख पाहुणे म्हणून मृद व जलसंधारणाचे संचालक श्री. एस.एन.आंबुलगेकर होते. यावेळी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, कार्यकारी परिषद सदस्य श्री. प्रकाश पाटील उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत आत्माचे संचालक श्री. ए.के. हराळ, पुणेचे विभागीय कृषि संहसंचालक श्री. व्ही.बी. इंगळे, कोल्हापूरचे विभागीय कृषि सहसंचालक श्री.एन.टी. शिसोदे, नाशिकचे विभागीय कृषि सहसंचालक डॉ. कैलास मोते, अखिल भारतीय डाळिंब संघाचे अध्यक्ष श्री. प्रभाकर चांदणे, विस्तार शिक्षण परिषदेचे माजी कार्यकारी सदस्य श्री. उदय नान्नजकर, अखिल महाराष्ट्र सीताफळ संघाचे अध्यक्ष श्री. नवनाथ कसपटे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.प्रकाश तुरबतमठ उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे यांनी, प्रमुख मार्गदर्शन श्री.एस.एन. आंबुलगेकर यांनी केले. विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे यांनी तंत्रज्ञानाच्या वापरासाठी आणि अवलंबनासाठी एकात्मिक धोरणाची गरज यावर सादरीकरण केले. संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील यांनी विद्यापीठाने प्रसारित केलेल्या वाणांची, शिफारशींची माहिती दिली.

या बैठकीत पश्चिम महाराष्ट्रातील कृषि विभागाचे कृषि उपसंचालक, कृषि सहसंचालक, प्रकल्प संचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख,सहयोगी संशोधन संचालक, सर्व विभागीय व जिल्हा विस्तार केंद्राचे विस्तार कृषिविद्यावेत्ता, प्रभारी अधिकारी, कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक,पीक विशेषज्ञ व शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्रीसुगी रब्बी-२०१४ चे विमोचन करण्यात आले. या प्रसंगी विभागीय कृषि संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय अमृतसागर यांनी केले, डॉ. डी.व्ही. इंडी यांनी सूत्रसंचालन तर आभार डॉ. जे.डी. जाधव यांनी मानले.

फळे व भाजीपाला प्रक्रिया प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यपीठातील अन्न व तंत्रज्ञान विभागांतर्गत तीस दिवसांचा फळे व भाजीपाला प्रक्रिया प्रशिक्षण वर्गाचे संपन्न झाला.या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन आणि समारोप संचालक, विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांचे अध्यक्षतेखाली झाले. यावेळी अधिष्ठाता (कृषि)डॉ. भीमराव उल्मेक, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. सुरेश थोरात, कृषि विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे म्हणाले, कृषि प्रक्रिया उद्योगाला मोठा वाव असल्याने बचत गटाच्या माध्यमातून उत्पादीत प्रक्रियायुक्त कृषि मालाचे मार्केटींग, मॉल मध्ये यशस्वी होऊ शकते. अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक यांनी शेतक-यांना याप्रसंगी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुरेश थोरात यांनी केले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. डॉ. प्रमोद कोटेचा यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तर आभार श्री. सुधीर लांडे यांनी मानले

एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या काटेकोर शेती प्रकल्पातंर्गत जलसंवर्धन आणि संरक्षित लागवड तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उदघाटन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ विद्यापरिषदेचे सदस्य श्री. राजीबकुमार रॉय होते. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण, डॉ. किरण कोकाटे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ. भिमराव उल्मेक, अभियांत्रिकी



महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार आणि प्रा. नरेंद्र फिरके उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे म्हणाले, नैसर्गिक संपत्तीचा हळूहळू-हास होत आहे. नैसर्गिक संपत्तीच्या -हासाचे धोके लक्षात घेता कमी क्षेत्रात जास्त उत्पादन देणाऱ्या तंत्राचे अवलंब करणे गरजेचे आहे. याप्रसंगी संचालक, विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, प्रमुख पाहुणे श्री. राजीबकुमार रॉय यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले. आभार डॉ. एम.जी. शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमास विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, शेतकरी, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संरक्षित शेती शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची स्थापना



विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागातील काटेकोर शेती विकास केंद्र अंतर्गत संरक्षित शेती शेतकरी-शास्त्रज्ञ मंच स्थापना कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून राहुरी तालुका संरिक्षत शेती संघाचे अध्यक्ष श्री. भास्करराव वरघुडे होते. यावेळी संरक्षित शेती शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात या प्रकारचा हा पहिला शेतकरी-शास्त्रज्ञ मंच आहे.

मार्गदर्शन करतांना संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे म्हणाले, बदलत्या हवामानामध्ये जास्त उत्पादन घेण्यासाठी संरक्षित शेती करणे गरजेचे झाले आहे. या संरक्षित शेतीचे तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत जाण्यासाठी विद्यापीठांतर्गत संरक्षित शेती शेतकरी-शास्त्रज्ञ मंच स्थापन करणे हा एक स्तुत्य उपक्रम आहे.या प्रसंगी व्यासपीठावर संचालक संशोधन संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, सहयोगी अधिष्ठाताडॉ. प्रकाश तुरबतमठ, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारूड, आत्माचे उपसंचालक श्री. संभाजी गायकवाड, हिंजवडी येथील अभिनव फार्मर्स ग्रुपचे संस्थापक श्री. ज्ञानेश्वर बोडके, तालुका कृषि अधिकारी श्री. एन.आर.रोकडे, राहुरी तालुका संरक्षित शेती संघाचे सचिव श्री. आर.एन. गायकवाड, श्री. संदीप डेरे, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख संशोधक प्रा.नरेंद्र फिरके उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश तुरबतमठ यांनी केले. याप्रसंगी विविध विभागांचे विभाग प्रमुख, शेतकरी, शास्त्रज्ञ, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार श्री. हेमंत जगताप यांनी मानले.

शेळी पालन प्रशिक्षण वर्ग संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि आत्मा, अहमदनगर यांचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय सुधारित शेळी पालन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर पशुविज्ञान आणि दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ.यशवंत फुलपगारे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद सोळंके, संगमनेरी शेळी संशोधन योजनेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. संजय मंडकमाले उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे म्हणाले, शेळीपालन हे शेतीवर आधारीत किफायतशीर व्यवसाय म्हणून पुढे येत आहे. शेळी ही गरीबांची गाय म्हणून संबोधली गेली आहे. व्यावसायीक शेळी पालनामध्ये पारंपारिक पध्दतीऐवजी शास्त्रीय पध्दतीने व्यवस्थापन केले तर शेळी व्यवसाय फायदेशीर ठरेल.

याप्रसंगी डॉ. यशवंत फुलपगारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आनंद सोळंके यांनी केले. या प्रशिक्षण वर्गासाठी अहमदनगर जिल्हयातील ५० शेतकरी सहभागी झालेले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. योगेश कांदळकर यांनी केले.

कृषि विस्तार प्रशिक्षण वर्ग संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि विस्तार शिक्षण संस्था, आनंद, गुजरात यांचे संयुक्त विद्यमाने विद्यापीठात कृषि विस्तारामध्ये सहभागातून ग्रामीण मूल्यांकन या तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गसंपन्न झाला. या प्रशिक्षण वर्गाचा समारोप कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रशिक्षण वर्गाचे उदघाटन संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांचे हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक, आनंद येथील विस्तार शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. अरूण पटेल, विस्तार शिक्षण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. गोरक्ष ससाणे, प्रगतशील शेतकरी कृषिभुषण श्री. सुरशिंग पवार, उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, विस्तार कार्यात आणि संशोधनात अद्ययावत राहण्यासाठी प्रत्येक शास्त्रज्ञाला आणि विस्तार कार्यकर्त्याला प्रशिक्षण गरजेचे आहे. या प्रसंगी संचालक विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे, अधिष्ठाता(कृषि) डॉ. भीमराव उल्मेक, आनंद येथील विस्तार शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. अरूण पटेल यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण वर्गाचे प्रास्ताविक विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे यांनी केले. यावेळी आनंद येथील प्रशिक्षक डॉ. महेश पटेल, श्री. ए. जी. सुखडीयां, कृषिविद्या विभाग प्रमुख डॉ. दशरथ ठवाळ उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गात विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ५० हून अधिक प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयप्रकाश गायकवाड व आभार डॉ. पंडित खर्डे यांनी मांनले.

पॉलीहाऊस तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र आणि आत्मा अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय सुधारीत पॉलीहाऊस तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद सोळंके, काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख संशोधन डॉ. नरेंद्र फिरके उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. किरण कोकाटे म्हणाले नारायण गावाप्रमाणे राहुरीतील सर्व संरक्षित शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी संरक्षित शेती हब तयार करावा त्यामुळे बाजारपेठ शेतकऱ्यांच्या दारी येईल.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आनंद सोळंके यांनी केले. या प्रशिक्षण वर्गात राहुरीतील ५० हून अधिक संरक्षित शेती शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या सदस्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन आणि आभार डॉ. योगेश कांदळकर यांनी केले.

शेतकरी मेळावा संपन्न

कृषि विद्यापीठांतर्गत डोंगरगण ता. नगर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ.मधुकर धोंडे यांनी भूषविले. यावेळी बियाणे संशोधन अधिकारी डॉ. विजय शेलार, भाजीपाला बिजोत्पादन अधिकारी डॉ. केशवराव कदम, वरिष्ठ बियाणे रोगशास्त्रज्ञ प्रा. सुरेश झांजरे, बियाणे शरीरक्रियाशास्त्रज्ञ डॉ. सुखदेव रणसिंग, बियाणे किटकशास्त्रज्ञ डॉ. उत्तम कदम, बियाणे रोगशास्त्रज्ञ डॉ. संजय गावडे आदि उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. मधुकर धोंडे म्हणाले, राष्ट्रीय बियाणे संशोधन प्रकल्पाच्या संशोधनानुसार बियाणे पाण्यात भिजवून सावलीत वाळवून पेरणी केल्यास उत्पादनात १० ते १५ टक्के वाढहोते. या झिरोकॉस्ट तंत्रज्ञानाचा शेतक-यांनी वापर करावा.

या तंत्रज्ञानाचा अवलंब जास्तीत जास्त शेतक-यांनी करावा या हेतूने या तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक डोंगरगण येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमास डोंगरगण,मांजरसुबा या गावातील शंभरहून अधिक शेतकरी उपस्थित होते. शेतकरी मेळाव्याचे प्रास्ताविक डॉ. सुखदेव रणसिंग यांनी केले तर आभार श्री. कैलास पठारे यांनी मानले.

ज्वारी-हरभरा बिजोत्पादन शेतकरी मेळावा संपन्न



कृषि विद्यापीठांतर्गत बडुले बुद्रुक ता. शेवगांव,जि. अहमदनगर येथे ज्वारी-हरभरा बिजोत्पादन तंत्रज्ञान या विषयावरील शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. मधुकर धोंडे म्हणाले, दर्जेदार व चांगल्या बियाणांची कमतरता भागविण्यासाठी बिजोत्पादन कार्यास चालना देण्याची गरज असून आधुनिक बिजोत्पादन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर शेतकरी बांधवांनी करावा.

यावेळी बियाणे संशोधन अधिकारी डॉ. विजय शेलार, कडधान्य पैदासकार डॉ. मधुकर बेडीस, वरिष्ठ बियाणे रोगशास्त्रज्ञ प्रा. सुरेश झांजरे, बियाणे किटकशास्त्रज्ञ डॉ. उत्तम कदम, बियाणे रोगशास्त्रज्ञ डॉ. संजय गावडे तसेच डॉ. अनिल सुर्यवंशी, डॉ. गणेश बनसोडे व श्री. विवेक शिंदे आदि अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी शेतक-यांना विद्यापीठाची कृषिदर्शनी-२०१४ चे वाटप करण्यात आले. यावेळी शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उत्तम कदम यांनी केले तर आभार श्री. मोहन सागडे यांनी मानले.

आद्यरेखा प्रात्यक्षिकाचे आयोजन



बोरगाव येथील कृषि विज्ञान केंद्राने स्थापन केलेल्या शेतकरी मंडळाच्या माध्यमातून मौजे शिंदेवाडी येथे कोनोविडर या यंत्राच्या साहाय्याने भात शेतीतील तण नियंत्रण या विषयावर चर्चासत्र व आद्यरेखा प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक प्रा. मोहन शिर्के होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्रा. मोहन शिर्के म्हणाले,शेती कामामध्ये मजुरांची कमतरता भासत असल्याने शेतीमध्ये यांत्रिकीकरण गरजेचे आहे. यावेळी विषय विशेषज्ञ प्रा.महेश पाचारणे यांनी कोनोविडरच्या सहाय्याने भात शेतीतील तणनियंत्रणाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. कृषि विज्ञान केंद्रामार्फत शिंदेवाडी येथील शेतकरी मंडळास तणनियंत्रणासाठी दोन कोनोविडर मोफत देण्यात आले. या आद्यरेखा प्रात्यक्षिकास शेतकरी मंडळाचे अध्यक्ष श्री. संजय शिंदे, शेतकरी, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय शिंदे यांनी तर आभार श्री. आबा लाड यांनी मानले.

शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न



कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथे विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कृषि विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे होते. या कार्यक्रमात पुरस्कार प्राप्त शेतकरी श्री. आबा लाड, श्री. अनिल वाघमळे, श्री.आनंद शिंदे, श्री. योगेश पवार यांचा सत्कार संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आला. या बैठकीत माजी कार्यक्रम समन्वयक डॉ. विजय तरडे यांनी विविध उपक्रमाविषयी, सादरीकरण केले. कार्यक्रम समन्वयक प्रा. मोहन शिर्के यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. महेश बाबर यांनी सूत्रसंचालन केले तर श्री. पाचारणे यांनी आभार मानले.

तेलबिया संशोधन केंद्र, जळगांव येथे कृषि विज्ञान केंद्राची शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली. अध्यक्षस्थानी संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे होत. व्यासपीठावर हैद्राबादचे डॉ. चारी आप्पाजी, कृषिभूषण श्री. विश्वासराव पाटील, तेलबिया संशोधन केंद्राचे

डॉ.सुदाम पाटील, कार्यक्रम समन्वयक डॉ. हेमंत बाहेती उपस्थित होते. याप्रसंगी संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे म्हणाले की, जिल्हयातील केळी, कापूस या प्रमुख पिकांची माहिती आकाशवाणीवर, शेतीशाळा घेऊन शेतक-यांपर्यंत पोहचावी. यावेळी केव्हीकेचे समन्वयक डॉ. हेमंत बाहेती यांनी मागील वर्षातील कार्याचा आढावा सादर केला तर २०१४-१५ चा कृती आराखडा केव्हीकेच्या विषय विशेषज्ञ यांनी सादर केला.

हॉर्टसॅप प्रशिक्षण वर्ग संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत फलोत्पादन (डाळिंब) पिकांवरील कीड व रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्पाच्या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे यांचे हस्ते झाले.यावेळी व्यासपीठावर विभागीय कृषि सहसंचालक श्री.विजयकुमार इंगळे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, वनस्पतीरोग शास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश बोरकर, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, उपसंचालक फलोत्पादन श्री. विजय राउत उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. किरण कोकाटे म्हणाले, क्रॉपसॅपच्या धर्तीवर हॉर्टिकल्चर पिकांसाठी हॉर्टसॅप सुरू आहे. अहमदनगर जिल्हयामध्ये हॉर्टसॅपची डाळिंब पिकासाठी अंमलबजावणी होत आहे. हॉर्टसॅपमुळे नगर जिल्हयातील डाळिंब पिकाला संरक्षणआणि डाळिंब उत्पादक शेतक-यांना फायदा होणार आहे. या प्रसंगी विभागीय कृषिसहसंचालक श्री. विजयकुमार इंगळे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या प्रशिक्षण वर्गात जिल्यातील कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कीड सर्वेक्षक, मास्टर ट्रेनर्स, डाटा ऑपरेटर अशा शंभरहून अधिक प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात डाळिंबाची लागवड, छाटणी, बहार व्यवस्थापन, रोग व कीड नियंत्रण आणि सर्वेक्षण, डाटा एन्ट्री इत्यादी विषयांवर सखोल मार्गदर्शन झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सी.डी. देवकर यांनी तर आभार डॉ. के.एस.रघुवंशी यांनी मानले.

संरक्षित शेती प्रशिक्षण वर्ग संपन्न

महात्मा फुले कृषि विद्यापीठातील डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या काटेकोर शेती विकास केंद्रामार्फत संरक्षित शेती शेतकरी-शास्त्रज्ञ मंचासाठी हरितगृहातील भाजीपाला व फुले यांचे विक्री व्यवस्थापन याविषयांवर एक दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे अध्यक्षस्थान संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर संचालक, संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. प्रकाश तुरबतमठ, काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख संशोधक, प्रा. नरेंद्र फिरके, सह्याद्री फार्मर्स् प्रोड्युसर कंपनीचे संचालक, श्री. विलास शिंदे उपस्थित होते.



अध्यक्षीय मार्गदर्शन करताना संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे म्हणाले, संरक्षित शेतीपद्धतीत कोणत्याही कृषि मालाचे उत्पादन घेताना बाजारपेठेच्या मागणीनुसार आणि शेतक-यांनी एकत्र येऊन गट स्थापन करुन उत्पादन घेतले तर नक्कीच फायदा होईल. कार्यक्रमाचे स्वागत व प्रमुख व्याख्यात्यांची ओळख डॉ. प्रकाश तुरबतमठ यांनी केली. यावेळी संचालक संशोधक, डॉ. राजेंद्र पाटील, सह्याद्री फार्मर्स् प्रोड्युसर कंपनीचे संचालक श्री. विलास शिंदे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास राहुरी तालुक्यातील संरक्षित शेती शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाचे शेतकरी, शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नरेंद्र फिरके, सूत्रसंचालन श्री. हेमंत जगताप आणि आभार श्री. विजय कानडे यांनी मानले.

महात्मा ज्योतिबा फुलेंचा स्मृतिदिन साजरा

कृषि विद्यापीठात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त पुणे येथील प्रबोधन एकपात्री नाट्य परिषद, आर्ट अॅकॅडमीचे अध्यक्ष श्री. कुमार आहेर यांचे महात्मा ज्योतिबा फुलेंच्या जीवनचरित्रावर एकपात्री नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अधिष्ठाता (कृषि) डॉ. भीमराव उल्मेक यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद ढोके, विद्यार्थी



कल्याण अधिकारी श्री. शरद पाटील उपस्थित होते. प्रथम महात्मा ज्योतिबा फुलेंच्या पुतळयाला व प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

महात्मा ज्योतिबा फुलेंवर श्री. कुमार आहेर यांनी एकपात्री नाटय सादर केले. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. भीमराव उल्मेक यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. राजेंद्र पाटील यांनी करून दिली. आभार कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे यांनी मानले तर सूत्रसंचालन विद्यार्थी श्री. उल्हास राक्षे यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे यश

डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या १७ छात्रांनी कॅप्टन डॉ. राजेंद्र केंघे यांच्या मार्गदर्शनाखाली 'सी' प्रमाणपत्र परिक्षेत घवघवीत यश मिळविले. यापैकी ८ छात्रांना प्रथम श्रेणी मिळाली. प्रथम श्रेणी मिळालेल्या सर्व छात्रांना सीडीएस मार्फत भारतीय लष्कराच्या सेवेत जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या पूर्वीही डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे काही छात्र सैनिक भारतीय नौसेना, बीएसएफ, आर्मी येथे काम करत आहेत. कृषि विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल डॉ. तुकाराम मोरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश तुरबतमठ यांच्या सहकार्याने छात्रसेनेचे नवनवीन कार्यक्रम कृषि विद्यापीठ प्रक्षेत्रावर घेतले जातात.

कोल्हापूर कृषि महाविद्यालयाचा मागे वळून पाहताना २०१४



कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे मागे वळून पाहतांना २०१४ हा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. नागेश नलवडे प्राचार्य न्यु कॉलेज कोल्हापूर यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ. गजानन खोत सहयोगी अधिष्ठाता कृषि महाविद्यालय, कोल्हापूर यांनी भूषविले. सुरूवातीस महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

प्रमुख पाहुणे डॉ. नागेश नलवडे मार्गदर्शन करताना म्हणाले, सर्वांनी इतिहास वाचून पुढील दिशा ठरवावी. प्राध्यापकांची शेतकऱ्यांशी नाळ जोडलेली आहे. त्यांनी शेतकऱ्यांना प्रबोधन करून त्यांचे उत्पादन वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करावा. अध्यक्षीय मागदर्शन सहयोगी अधिष्ठाता डॉ. गजानन खोत यांनी केले.

कृषि महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागातील शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याची वर्षभरातील उपक्रम व कार्यक्रमाची माहिती छायाचित्र प्रदर्शनाद्वारे सादर केली. प्राध्यापक, शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थींनी मोठया संख्येने उपस्थित होते. श्री. राजेंद्र भुजबळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

राज्यस्तरीय जैवतंत्रज्ञान दिन साजरा



कृषि विद्यापीठात स्वर्गीय पंडित नेहरु यांची जयंती तसेच राज्यस्तरीय जैवतंत्रज्ञान दिवस साजरा करण्यात आला. या जैवतंत्रज्ञान दिनाचे औचित्य साधुन जी.एम. पिकांच्या प्रक्षेत्रीय चाचणी प्रयोगाचे नियंत्रण करणारी जिल्हास्तरीय समिती (डि.एल.सी.) आणि संस्थीय जैवसुरक्षा समिती (आय.बी.एस.सी.) यांच्या प्रशिक्षणासाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी श्री. अनिल कवडे यांनी केले. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संचालक संशोधन, डॉ. राजेंद्र पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्री. अनिल कवडे म्हणाले कृषि विद्यापिठांमध्येजी. एम. पिकांसंबंधी होत असलेले जैवतंत्रज्ञानाचे संशोधन हे अभिनव स्वरूपाचे असल्यामुळे समाजात संभ्रम होतो, त्यामुळे शेतकऱ्यांना कळेल अशा भाषेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रबोधन करणे गरजेचे आहे.

यावेळी प्रास्ताविक संचालक संशोधन, डॉ. राजेंद्र पाटील यांनी केले. जैवतंत्रज्ञान दिनानिमित्त आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेत, जैवतंत्रज्ञान विभागाचे प्रभारी अधिकारी डॉ. अशोक जाधव, सहयोगी प्राध्यापक डॉ. अनिल काळे व डॉ. पवन कुलवाल यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी जिल्हाअधिकारी श्री. अनिल कवडे यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीच्या सदस्यांची कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर आयोजीत केलेल्या मक्याच्या जी.एम. सनियंत्रित क्षेत्रीय चाचणीची पाहणी केली.या कार्यशाळेत व बैठकीस सर्व समित्यांचे सदस्य उपस्थित होते या बैठकीचे आभार संचालक सशोधन डॉ. राजेंद्र पाटील तर सूत्रसंचालन डॉ. पवन कुलवाल यांनी केले.

कृषि विज्ञान केंद्राच्या प्रशासकीय इमारत व शेतकरी अतिथीगृहाचे उद्घाटन संपन्न



मोहोळ येथील कृषि विज्ञान केंद्राच्या प्रशासकीय इमारत व शेतकरी अतिथी गृहाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर क्षेत्रीय प्रकल्प संचालकडॉ.एन.सुधाकर, संचालक विस्तार शिक्षण, डॉ.किरण कोकाटे, अधिष्ठाता डॉ.भीमराव उल्मेक, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, सोलापूर येथील डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर.के. पाल, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, डॉ. विजय अमृतसागर, कार्यक्रम समन्वयक डॉ.दिनेश नांद्रे, आदि उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, शेतक-यांच्या जीवनात खरी हरितक्रांती कृषि विज्ञान केंद्रामुळे झाली आहे. कमी क्षेत्र असणा-या शेतक-यांनी शेतीला पूरक असा जोडधंदा करावा. कृषि विज्ञान केंद्र त्यांना प्रशिक्षण देईल.

प्रास्ताविकात संचालक विस्तार शिक्षण, डॉ.किरण कोकाटे यांनीकेले. क्षेत्रीय प्रकल्प संचालक डॉ. सुधाकर यांनीमनोगत व्यक्त केले. या प्रसंगी शास्त्रज्ञ, शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. दिनेश नांद्रे यांनी मानले.

शेतकरी गटप्रमुखांचे प्रशिक्षण वर्ग संपन्न

कृषि विद्यापीठ आणि कृषि विभाग,महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त



विद्यमाने कोरडवाहू शेती अभियानांतर्गत शेतकरी गटप्रमुखांचे दोन दिवसाचे प्रशिक्षण वर्ग विद्यापीठात आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपविभागीय कृषि अधिकारी, दिलीप देवरे, व्यवस्थापक कृषि तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान डॉ. आनंद सोळंके, प्रा. डी.पी. पाचारणे उपस्थित होते. मार्गदर्शन करताना डॉ. किरण कोकाटे म्हणाले, रब्बी हंगामातील ज्वारी, हरभरा, गहू व फळबाग व्यवस्थापन करताना पाण्याचे काटेकोर नियोजन, शेतातील बंधारे व वीज यांची योग्य सांगड घालावी. यावेळी उपविभागीय कृषि अधिकारी, दिलीप देवरे यांनी कृषि विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. दोन दिवसाच्या प्रशिक्षण वर्गात शास्त्रज्ञांनी विविध विषयांवर गटप्रमुख शेतक-यांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण वर्गात रायतळे, सानवड व तांदळी वडगांव या गावातील गट प्रमुखांचे शेतक-यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.आनंद सोळंके तर सूत्रसंचालन आणि आभार श्री. दत्तात्रय पाचारणे यांनी मानले.

एक दिवसीय कार्यशाळा संपन्न



कृषि विद्यापीठातील गो संशोधन व विकास प्रकल्पांतर्गत संकरीत गायीमध्ये गर्भधारणा वाढविण्याचे तंत्र याविषयावर पशुधन पर्यवेक्षकांकरीता एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन संचालक, विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे यांचे हस्ते झाले. या प्रसंगी

पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, माजी सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन), डॉ. माधव येवले, डेअरी ॲडव्हायझर, मुंबई डॉ. चंद्रकिरण संत उपस्थित होते.अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. किरण कोकाटे म्हणाले, धवलक्रांतीनंतर दुग्धव्यवसाय हा शेतीला महत्त्वाचा पूरक व्यवसाय म्हणून उदयास आला. दरडोई दुधाची उपलब्धता वाढवयाची असेल तर जनावरांच्या संख्येपेक्षा जनावरांची उत्पादकता वाढविणे महत्त्वाचे आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. यशवंत फुलपगारे यांनी केले.या प्रसंगी डॉ. माधव येवले, व डॉ. चंद्रकिरण संत यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. डॉ. विष्णू नरवडे, डॉ. महेंद्र यादव व डॉ. दिलीप देवकर या शास्त्रज्ञांनी विविध विषयांवर प्रात्यक्षिकासह सादरीकरण केले. या कार्यशाळेसाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून कार्यरत असलेले पशुधन पर्यवेक्षक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल देसले व आभार डॉ. उध्दव भोईटे यांनी मानले.

विस्तार शिक्षण संचालकांची शेतक-यांच्या हाय-टेक शेतीला भेट



जळगांव जिल्हयामधील पारोळा तालुक्यातील चोरवड गावातील पिक बदलासाठी ममुराबाद येथील कृषि विज्ञान केंद्राने केलेले हाय-टेक भाजीपाला प्रयोगाची नुकतीच पाहणी कृषि विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे यांनी केली. यावेळी तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.सुदाम पाटील, कापूस पैदासकार डॉ.संजीव पाटील, डॉ. नरेंद्र देशमुख हे उपस्थित होते.

याप्रसंगी शेतक-यांना मार्गदर्शन करताना संचालक विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे म्हणाले सोलापूर जिल्हयातील शेतक-यांनी अवलंबलेले कृषि विद्यापीठाचे आधुनिक तंत्रज्ञान जळगांव जिल्हयातील चोरवड गावातील शेतक-यांनी आपल्या स्वतःच्या शेतात वापरून तंत्रज्ञान देवाण-घेवाणचा आदर्श घालून दिला आहे.

कृषि विज्ञान केंद्र, ममुराबाद अंतर्गत पारोळा तालुक्यातील शेतक-यांचा सोलापूर जिल्हयातील कोरडवाहू शेती संशोधन केंद्र आणि प्रगतशील शेतक-यांच्या शेतावर अभ्यासदौरा आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शेतक-यांचा बळीराजा कृषि विज्ञान मंडळ, चोरवड या गटाचे उद्घाटन व फलकाचे अनावरण संचालक, विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे यांचे हस्ते झाले.या प्रसंगी बळीराजा कृषि विज्ञान मंडळ, जिजामाता कृषि विज्ञान मंडळाचे सदस्य, शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

बीजोत्पादन प्रशिक्षण तसेच हरभरा बियाणे वाटप कार्यक्रम संपन्न

कृषि विद्यापीठातर्फे आदिवासी उपाययोजनेअंतर्गत वारंघुशी (ता. अकोले) येथे आदिवासी शेतक-यांसाठी बीजोत्पादन प्रशिक्षण तसेच हरभरा बियाणे वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. मधुकर धोंडे होते. यावेळी बीजोत्पादन अधिकारी डॉ. चंद्रकांत साळुंके, भाजीपाला बीजोत्पादन अधिकारी डॉ. केशवराव कदम, वरिष्ठ बियाणे रोगशास्त्रज्ञ प्रा. सुरेश झांजरे, रोगशास्त्राचे सहाय्यक बियाणे संशोधन अधिकारी डॉ. संजय गावडे तसेच डॉ. अनिल सुर्यवंशी, डॉ. गणेश बनसोडे, श्री. विवेक शिंदे, श्री. अविनाश कर्जुल व अकोले पंचायत समिती सदस्य श्री. भरत घाणे आदि उपस्थित होते.



यावेळी हरभरा बिजोत्पादनाविषयी उपस्थित शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये पेंडशेत, चिचोंडी, बारी, जहागिरदारवाडी व वारंघुशी या गावातील आदिवासी शेतक-यांना हरभरा बियाणे वाटप करण्यात आले. मेळाव्याचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय गावडे यांनी केले तर आभार श्री. भरत घाणे यांनी मानले.

केंद्रिय कृषिमूल्य व किंमत आयोगाच्या अध्यक्षांची विद्यापीठास भेट



केंद्रीय कृषिमुल्य व किंमत आयोग, नवी दिल्ली यांच्या पथकाने कृषि विद्यापीठास भेट दिली. या पथकामध्ये आयोगाचे अध्यक्ष डॉ. अशोककुमार विशनदास, सदस्य-सचिव डॉ. शैलजा शर्मा व सदस्य श्री.के. प्रधान यांचा समावेश होता.

कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी सर्वांचे स्वागत केले. पुनर्रचित राज्य शेतमाल भाव समितीच्या तांत्रिक उपसमितीचे अध्यक्ष कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे यांनी राज्यामध्ये केलेल्या कार्याची आयोगाला माहिती दिली. कृषि अर्थशास्त्र विभागांतर्गत बहुव्यापक योजनेच्या कार्याविषयी आयोगाच्या अध्यक्षांनी समाधान व्यक्त केले. या दरम्यान पथकाने अर्थशास्त्र विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या बहुव्यापक योजनेतील अहमदनगर, नाशिक व औरंगाबाद या जिल्हयातील केंद्रांना भेटी देवून शेतकऱ्यांशी संवाद साधला. या अभ्यास दौऱ्या दरम्यान कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, क्षेत्र अधिकारी (१)डॉ. अरूण गवळी, सहा. सांख्यिकी, श्री.बाबासाहेब कांबळे, तसेच कृषि अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. पागिरे, डॉ. पोखरकर व डॉ. पवार आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनाचा ६५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



कृषि विद्यापीठात भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ६५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांचे हस्ते ध्वजारोहणकरण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी कुलगुरूंच्या हस्ते ज्वारी सुधार प्रकल्पाचे कार्यालय, कापूस सुधार प्रकल्पाचे प्रक्षेत्र खळे, कडधान्य सुधार प्रकल्पाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र, ड्राईंग शेड, गवत संशोधन योजनेचे भांडारगृह, पाणी व्यवस्थापन योजनेचे स्वयंचलित खत पाणी सयंत्र या विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे,अधिष्ठाता (कृषि) डॉ. भिमराव उल्मेक, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, नियंत्रक श्री.विश्वासराव जाधव, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद ढोके, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षा अधिकारी डॉ. उत्तम कदम यांनी केले तर डॉ. राजेंद्र केंघे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी



कृषि विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले.प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.एस.झेड. देशमुख होते. यावेळी व्यासपीठावर निर्मिती महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. रेखाताई मोरे, संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील,कुलसचिव श्री.सुनिल वानखेडे, विद्यापीठ अभियंता श्री.मिलींद ढोके, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.शरद पाटील उपस्थित होते.

प्रमुख मार्गदशन करताना प्रा. एस.झेड. देशमुख म्हणाले, त्यांनी भेदभाव न करता सर्वांना समानतेची वागणूक दिली. सर्वधर्मसमभावाची शिकवण त्यांच्या कार्यकाळात त्यांनी रूजविली. अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांची ओळख संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांनी करून दिली. यावेळी डॉ.अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालायाच्या ४५ विद्यार्थ्यांनी रायगडावरून शिवज्योत आणली. या शिवज्योतिचे स्वागत कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे, निर्मिती महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.रेखाताई मोरे, संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांनी केले.याप्रसंगी विद्यार्थी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमार प्रसाद चव्हाण यांनी केले.

जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर कृषि महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय आणि निर्मिती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या महिला दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निर्मिती महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. रेखाताई मोरे आणि प्रमुख



उपस्थितीत कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर येथील ज्येष्ठसमाजसेवीका ॲड. सौ. अपर्णाताई रामतिर्थीकर होत्या. यावेळी व्यासपीठावर सौ. बोरकर, विद्यार्थीनी कु. काजल पाटील, कु. कल्याणी यादव उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शन ॲड. सौ. अपर्णाताई रामतिर्थीकर म्हणाल्या, जगातील सर्व देशांमध्ये कुटुंबव्यवस्था मोडकळीस आल्या आहेत. पण भारत देशातील कुटुंबव्यवस्था ही आजही जगात पहिल्या क्रमांकाची आहे. स्त्रियांनी आपण दिसतो कसे यापेक्षा आपण आहोत कसे याकडे लक्ष दिले तर कुटुंबाची प्रगती होऊन सुखशांती लाभेल.

अध्यक्षीय मार्गदर्शन सौ. रेखाताई मोरे यांनी केले. पदव्युत्तर महाविद्यालयाची कु. प्रियंका वायकर आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाची कु. श्रध्दा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी सर्व विभाग प्रमुखांच्या हस्ते त्यांच्या पत्नींचा सत्कार करण्यात आला आणि विद्यापीठातील कॉलनी प्रतिनिधी महिलांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. अंजली देशपांडे, सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक सौ. नंदा पोखरकर तर आभार सौ. पुष्पा चवई यांनी मानले. या कार्यक्रमास सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, व विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

सामंजस्य करार संपन्न



फळे व भाजीपाला काढणी पश्चात तंत्रज्ञानाचे अत्याधुनिक संशोधन व प्रशिक्षणाला गती मिळावी म्हणून कृषि विद्यापीठाने सरकारी, खासगी भागीदारीतून सह्याद्री फार्मर प्रोड्युसर या कंपनीशी सामंजस्य करार केला.याप्रसंगी कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे,सहयाद्री फार्मर प्रोडयुसर कंपनीचे कार्यकारी संचालक व अध्यक्ष श्री. विलास शिंदे उपस्थित होते. संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील व विलास शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. स्वाक्षरी करारप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे, अधिष्ठाता डॉ. भिमराव उल्मेक, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ कुलसचिव श्री सुनील वानखेडे, डॉ. दादाभाऊ यादव, डॉ. श्रीमंत रणपिसे,डॉ. मधुकर धोंडे, डॉ. दिलीप पवार, डॉ. सुभेदार जाधव, डॉ.सुनील गोरवंटीवार, प्रा.अरूण पाटील, प्रा.विक्रम कड आदी उपस्थित होते.याप्रसंगी सह्याद्री फार्मर प्रोड्युसर या कंपनीचे कार्यकारी संचालक श्री विलास शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र ढेमरे यांनी केले. आभार डॉ. सुरेश थोरात यांनी मानले.

मुल्यमापन कार्यशाळा संपन्न



कृषि विद्यापीठात कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांचे मार्गदर्शनाखाली कृषि संशोधन,शिक्षण व विस्तार विषयक तंत्रज्ञानाच्या मूल्यमापन पध्दती या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे होते. यावेळी व्यासपीठावर संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, हैद्राबाद येथील इक्रीसॅटचे कृषि अर्थशास्त्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एन. नागराज, बेंगलोर येथील कृषि विज्ञान विद्यापीठातील कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एम.जी. चंद्रकांथ, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कृषि अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. थोरात, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ.एस.एस. मोरे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे म्हणाले, सतत बदलत्या हवामानास सामोरे जाऊन देखील देशाने मागील वर्षात अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन घेतले आहे. जगात भात निर्यातीत आपल्या देशाचा प्रथम क्रमांक लागतो. गव्हाचे ९२ मिलीयन टन विक्रमी उत्पादन मिळाले आहे. अन्नधान्य फलोत्पादन,

दुग्धोत्पादनात देश स्वयंपूर्ण झालेला असून याची निर्यात देखील आपण करत आहोत. हे विक्रमी उत्पादन देशातील कृषि विद्यापीठे, संशोधन संस्था, विस्तार यंत्रणा आणि शेतक-यांचे अथक परिश्रमाचे फलित आहे. याचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. प्रास्ताविक संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांनी केले. कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव यांनी या कार्यशाळेचे महत्त्व विषद केले. या एकदिवसीय मूल्यमापन कार्यशाळेमध्ये कृषि तंत्रज्ञानाचे अवलंबन व मूल्यमापन करणे, फलोत्पादन संशोधन गुंतवणुकीवरील परतावा,देशातील सुधारीत तंत्रज्ञानाच्या प्रभावाचे सॉलो डीकॉम्पोझिशन मॉडेल, शेतक-यांच्या जीवनावर कृषि तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम या व इत्यादी विषयांवर अर्थशास्त्र तज्ञांचे व्याख्यान झाले. या एक दिवसीय कार्यशाळेमध्ये विद्यापीठाच्या दहा जिल्हयातील कार्यक्षेत्रामधून सर्व संशोधन केंद्राचे आणि कृषि विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.व्हि.जी. पोखरकर आणि आभार डॉ. एस.डी. गोरंटीवार यांनी मानले.

मागोवा २०१४ चे आयोजन



कृषि विद्यापीठाचा मागोवा-२०१४ आणि छायाचित्र प्रदर्शन या कार्यक्रमाचे उदघाटन आदर्शगाव योजनेचे कार्याध्यक्ष आणि हिवरे बाजारचे माजी सरपंच, श्री. पोपटराव पवार यांचे हस्ते संपन्न झाले. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे, अधिष्ठाता (कृषि) डॉ. भीमराव उल्मेक, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील,विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, नियंत्रक श्री. विश्वासराव जाधव, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, कृषि महाविद्यालय, कोल्हापूरचे डॉ. खोत कृषि महाविद्यालय पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दशरथ ठवाळ, कृषि महाविद्यालय, धुळे व नंदूरबारचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शन करताना श्री. पोपटराव पवार म्हणाले, अति पाणी, अति खते आणि अति औषधांच्या वापरामुळे जमिनी खराब होत चालल्या आहेत. पाण्याचे स्त्रोत सुध्दा खराब होत चालले आहेत. यामुळे शेतकरी शेती जमिनीची विक्री करत आहे. जमिनी विकून चंगळवादी संस्कृतीला चालना मिळत आहे. म्हणून शेतक-यांना तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील लोकांना काटकसरीने पाण्याचा वापर करणे शिकविणे गरजेचे आहे, त्यानंतर भूजल संधारणाचे धडे द्यावेत. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, बदलते हवामान, जैविक अजैविक ताण, अति पाऊस, गारपीट या सर्व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हैराण झाला आहे. शाश्वत उत्पादनासाठी जनुकीय सुधारित (जीएम) तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही.

यावेळी विद्यापीठामधील दहा जिल्हयातील शिक्षण, संशोधन,विस्तार कार्यासंदर्भातील प्रदर्शनाचे प्रमुख पाहुण्याचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्याचे स्वागत, परिचय, प्रास्ताविक, विस्तार शिक्षण संचालनालयाचा गत वर्षाचा आढावा संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे यांनी सादर केला. अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक यांनी गत वर्षाचा शिक्षणाचा, संचालक संशोधक डॉ. राजेंद्र पाटील, यांनी संशोधनाचा, श्री. मिलींद ढोके यांनी बांधकाम विभागाचा, श्री. सुनिल वानखेडे यांनी प्रशासन विभागाचा आणि श्री. विश्वासराव जाधव यांनी वित्त विभागाचा गतवर्षाचा आढावा सादर केला. या निमित्ताने विद्यापीठाचे लोकप्रिय प्रकाशन 'कृषिदर्शनी २०१५' चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहाही जिल्हयातील अधिकारी,शास्त्रज्ञ, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद सोळंके यांनी तर आभार डॉ. गोरक्ष ससाणे यांनी मानले.

होप प्रकल्पांतर्गत रब्बी ज्वारी चर्चासत्र संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, इक्रीसॅट हैद्राबाद, महाबीज आणि कृषि विभाग यांचे संयुक्त विद्यमाने शेवगाव तालुक्यातील कांबी गावात होप प्रकल्पांतर्गत ग्राम पातळीवर रब्बी ज्वारीचे ४००

हेक्टरवर घेण्यात आलेल्या पीक प्रात्यक्षिक तथा ग्रामबिजोत्पादन, शिवार फेरी व चर्चासत्राचे उद्घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांचे हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर खा.दिलीप गांधी जिल्हाधिकारी श्री. अनिल कवडे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक,विभागीय कृषि सहसंचालक श्री. प्रल्हाद पोकळे, श्री. व्ही.बी. इंगळे, श्री.घोलप, अधिक्षक कृषि अधिकारी श्री. अंकुशराव माने, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. नलगे, महाबीजचे श्री. शिंदे, इक्रीसॅटचे प्रमुख शास्त्रज्ञ श्री. रविंद्र रेड्डी, अखिल भारतीय कृषक समाजाचे अध्यक्ष श्री. बापुसाहेब भोसले, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, प्रांताधिकारी श्रीमती कावडे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारूड, कांबी गावचे संरपंच श्री. सुनिल रजपूत, कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी केले. खा. दिलीप गांधी म्हणाले, शेतीचा विकास झाला तरच ग्रामीण भागाचा व देशाचा विकास होईल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित देश निर्माण करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवे.

जिल्हाधिकारी श्री. अनिल कवडे म्हणाले की, शेतक-यांनी तंत्रज्ञानाचा वापर करताना दुसरीकडे जोडधंदा सुध्दा करायला हवा. विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या प्रसंगी कृषि सहसंचालक श्री. विजय इंगळे, मातृभुमी शेतकरी केंद्राचे संघटक श्री. लहू मडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी रब्बी ज्वारी शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, कृषि विभागाचे अधिकारी, पंचक्रोशीतील एक हजारहून अधिक शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. शरद गडाख व सूत्रसंचालन डॉ. आनंद सोळंके यांनी केले.

होप प्रकल्पांतर्गत रब्बी ज्वारीचे ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम संपन्न



कृषि विद्यापीठ, इक्रीसॅट हैद्राबाद, कृषि विभाग महाराष्ट्र शासन आणि महाबीज यांच्या संयुक्त विद्यमाने नारायणवाडी, तालुका नेवासा येथे होप प्रकल्पांतर्गत ग्रामपातळीवर रब्बी ज्वारीचे पीक प्रात्यक्षिके तथा ग्रामबिजोत्पादन कार्यक्रमाच्या शिवारफेरी व चर्चासत्राचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ.तुकाराम यांनी भूषविले. याप्रसंगी व्यासपीठावरसंचालक संशोधन डॉ.राजेंद्र पाटील, महाबीजचे कार्यकारी संचालक श्री. अरूण उन्हाळे, इक्रीसॅटचे शास्त्रज्ञ डॉ. अशोककुमार, महाबीजचे विभागीय व्यवस्थापक श्री. पुंडकर, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारूड, बीज गुणनियंत्रण अधिकारी श्री. सुखदेव करपे, वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ.शरद गडाख उपस्थित होते. याप्रसंगी रब्बी ज्वारी प्रक्षेत्रावर शिवारफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या शिवारफेरीमध्ये सर्व मान्यवरांबरोबर शेतक-यांनी सहभाग घेतला.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, सतत बदलत्या हवामानात शाश्वत उत्पादनासाठी कृषि विद्यापीठांनी विकसित केलेले आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतक-यांनी करणे गरजेचे आहे. यावेळी प्रास्ताविक संचालक संशोधन डॉ.राजेंद्र पाटील यांनी केले. महाबीजचे कार्यकारी संचालक श्री.अरूण उन्हाळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शेतकऱ्यांनीही आपले अनुभव सांगितले. या कार्यक्रमासाठी रिजनल मॅनेजर,श्री.एस.एम.पुंडकर, कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. उत्तम चव्हाण, डॉ.एम.एस. शिंदे, प्रा.एस.व्ही. निर्मळ, प्रा.उदय दळवी, प्रा. व्ही.आर. पाटील, प्रा. व्ही.एस. पवार, श्री. सोळंकी, डॉ.आनंद चवई, महाबीजचे श्री.सी.एस.शिंदे, श्री.मोरे, श्री. दौंड, श्री.शेख, श्री. पिंगळे, कृषि विभागाचे अधिकारी श्री.सुरेश शेटे, ज्वारी उत्पादक पुरूष व महिला शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ.शरद गडाख यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. उत्तमचव्हाण यांनी केले.

राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा संपन्न



कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या काटेकोर शेती विकास केंद्र, जलसिंचन आणि निचरा अभियांत्रिकी विभाग आणि कृषि व उद्यानविद्यामध्ये प्लास्टीकल्चर तंत्रज्ञानाच्या वापरासंबंधीची राष्ट्रीय समिती (एन.सी.पी.ए.एच.), कृषि मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय

स्तरावरील दोन दिवसीय संरक्षित भाजीपाला पिकांची लागवड याविषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय कार्यशाळेचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील एन.सी.पी.ए.एच. चे कार्यकारी संचालक श्री. क्रिश अय्यंगार उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर संचालक संशोधन, डॉ. राजेंद्र पाटील, वालमतारीचे संचालक डॉ. के.एल्ला. रेड्डी, नारायणगाव येथील भारतीय भाजीपाला उत्पादन संघ श्री. राम गाढवे, डॉ. अ. शिं. कृ. अभि. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख प्रा. नरेंद्र फिरके उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांनी केले.नवी दिल्लीस्थित भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाचे एन.सी.पी.ऐ.एच.चे सहसचिव मा. श्री. क्रिश अय्यंगारयांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले. सदर कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील २५० शेतकरी व कृषि विभागातील आणि कृषि विज्ञान केंद्रातील अधिकारी उपस्थित होते.

आढावा बैठक संपन्न



कृषि विद्यापीठ आणि प्रकल्प संचालनालय, हैद्राबाद यांचे संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व विभागीय विस्तार केंद्रे, जिल्हा विस्तार केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे आणि कृषि विस्तार गटांचे एक दिवसीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, वनस्पती शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.रावसाहेब भारूड, विस्तार शिक्षण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी केले. याप्रसंगी प्रास्ताविक आणि मार्गदर्शन संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटेयांनी केले. या प्रसंगी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राच्या दहा जिल्हयातील सतरा कृषि विज्ञान केंद्रे, चार विभागीय विस्तार केंद्रे, पाच जिल्हा विस्तार केंद्रे, कृषि महाविद्यालयांचे तीन कृषि विस्तार गट, विस्तार शिक्षण विभाग प्रमुख आणि प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र, यांचे गत वर्षातील कार्याचे सादरीकरण झाले.

ऊस+बटाटा आंतरपिक प्रात्यक्षिकास भेट



विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे आणि बटाटा पिकाचे तज्ञ डॉ. जे.टी. नानकर यांनी ऊस+बटाटा आंतरपीक तंत्रज्ञानाच्या प्रात्यक्षिकांना भेटी दिल्या. या भेटीच्या वेळी राष्ट्रीय कृषि विकास योजनेचे प्रमुख समन्वयक डॉ.आनंद सोळंके, सहसमन्वयक डॉ.पंडित खर्डे, शास्त्रज्ञ डॉ. दत्तात्रय पाचारणे, प्रा.मंजाबापू गावडे उपस्थित होते.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना संचालक विस्तार शिक्षण डॉ.किरण कोकाटे म्हणाले, पीक उत्पादन वाढीसाठी विद्यापीठाने शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाचा शेतक-यांनी अवलंब करावा. डॉ.नानकर यांनी बटाटा पिकांबद्दल शेतक-यांना मार्गदर्शन केले.

कृषि विज्ञान केंद्रांची कार्यशाळा संपन्न



कृषि विद्यापीठ आणि विभागीय प्रकल्प संचालनालय विभाग-५, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १६ कृषि विज्ञान केंद्रांच्या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे होते. याप्रसंगी व्यासपीठावर हैद्राबाद येथील विभागीय प्रकल्प संचालनालयाचे विभागीय प्रकल्प संचालक डॉ.एन.सुधाकर, संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, अधिष्ठाता (कृषि) डॉ. भीमराव उल्मेक, हैद्राबाद येथील विभागीय प्रकल्प संचालनालयाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र रेडड्री, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते.

